म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : काव्य
सं.क्र. : ११४५

काव्य

११४५

REFBK-0005494
REFBK-0005494

काव्य सं.
ता.
नोंद नं.

# उपहासिनी

( विडंबन-गीतांचा प्रातिनिधिक संग्रह )

REFBK-0005494

५४९४

संपादक

**दिनकर विनायक देव**

प्रस्तावना-लेखक

**प्रल्हाद केशव अत्रे**

किंमत १॥ रुपया

प्रकाशक —
यशवंत गोपाळ जोशी,
७२३ सदाशिव पेठ, पुणें २.

[ प्रथमावृत्ति १।१२।३६ ]

मुद्रक —
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, ५१३ शनवार पेठ, पुणें २.

दि. वि. देवकृत

# शारदेचीं कर्णफुलें

( स्फुट-काव्यसंग्रह )

# कवन-गोविंद

कै० गो. रा. हिंगणेकर,

यांचा काव्यसंग्रह

( संपादक — दि. वि. देव )

## लवकरच प्रसिद्ध होईल.

माझें

# (१) गद्य-पद्य-विवेक

व

# आधुनिक कवितेचा परामर्श

लेखक -- श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

काव्यचर्चाविषयक पूर्वखंडांत गद्य-पद्यांचें नातें, त्यांचे विषय, काव्याची व्याख्या, कला आणि नीति, आर्थिक क्रांति व तिचे वाङ्मयावरील परिणाम इत्यादींचें सुविस्तृत विवेचन येणार असून उत्तरखंडांत आधुनिक कवींपैकीं दहा-बारा प्रमुख कवींच्या काव्यांचा रसोद्ग्रहणपद्धतीनें घेतलेला परामर्श द्यावयाचा आहे.

# (२) अलका

लेखक — श्री. रा. न. कीर्तने, बी. ए.

यांची स्वतंत्र सामाजिक कादंबरी.

किंमत २ रुपये

जानेवारी १९३७ मध्यें प्रसिद्ध होईल.

पुढील प्रकाशन

# प्रस्तावना

—:※:—

मानवी भावनेचा वेग, तीव्रता व खळबळ तात्काल व्यक्त करण्याचें जर कोणतें मनोहर साधन असेल तर तें काव्य होय. उमलत्या आनंदाचा बहारदार सुगंध व चुरगळलेल्या भावनांचें सुवासिक अत्तर काव्याच्या नाजुक कुप्यांतून सांठवतां येतें. रुणझुणत्या शब्दांच्या सारणींतून वाहणारी काव्याची मंजुळ रसवंती गद्याच्या भव्य व गंभीर सरिताप्रवाहापेक्षांहि अधिक चेतोहर आहे हें कोणीही कबूल करील. तथापि गद्यलेखनाच्या हल्लींच्या गलबल्यांत पद्याच्या पैंजणांचे झंकार रसिकांच्या कानांवर फारसे पडत नाहींत हें मात्र खरें आणि शिवाय प्रस्तुतच्या टीकाकर्कश काळांत तर कोमल काव्यलतांनीं सुकून जाऊन जवळ जवळ मानाच टाकल्या आहेत. काव्याला प्रतिकूल असलेल्या अशा काळांत आज कवितेनें कसें जगावें हा एक प्रश्न आहे. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास कवितेनें आपलें पूर्वींचें अलंकारिक व पाल्हाळिक स्वरूप बदलून गद्य आणि विनोद यांच्या परिसीमेंत अगदीं बरोबरीनें–किंबहुना वेळप्रसंगीं कांकणभर अधिक सरस असा परिवेष धारण करून आपलें जीवन चालू जमान्याच्या धकाधकींत मिळतें करून घेतलें आहे. यावरून तिला आपल्या पूर्वींच्या कार्याचा किंवा उदात्त ध्येयाचा विसर पडला आहे असें समजण्याचें कारण नाहीं.

आज मराठी कवितेनें विनोद, विडंबन, उपरोध, उपहास या विविध रंगांनीं रंगविलेलीं वस्त्रें धारण केलेलीं आहेत. आधुनिक मराठी कवितेचें हें रंगीबेरंगी स्वरूप कित्येकांस प्रथम विदूषकी थाटाचें वाटलें तरी; त्या वेषाबरोबरच तिच्या अंगांत संचारलेल्या चैतन्यानें लोकरंजनाचें कार्य उत्तम तऱ्हेनें करून थोड्या अवधींतच अत्यंत लोकप्रियता संपादन केली आहे हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. लोकानुरंजन हें एक कार्य विनोदी कवितेनें तर साधलेंच पण त्याहीपेक्षां तिचें महत्त्वाचें कार्य म्हणजे वाङ्मयक्षेत्रांतील प्रगट किंवा प्रच्छन्न दोषांवर विनोदगर्भ आणि उपहासयुक्त टीका करणें हें होय. हें कार्य ती यशस्वी रितीनें कसें करूं शकते हें पाहण्यापूर्वीं

तिनें परिधान केलेल्या या गणवेषाचें महत्त्व व स्वरूप काय आहे हें बघणें इष्ट आहे.

संस्कृत आणि मराठी अभिजात साहित्यांत नवरसांपैकीं शृंगार, वीर, करुण इत्यादि रसांना फार महत्त्वाचें स्थान मिळालेलें आहे. नवरसांच्या यादींत हास्याचा अंतर्भाव होत असला तरी हास्यरसाला सुसंस्कृत वाङ्मयांत प्रधानपद कधींच मिळालेलें नाहीं. किंबहुना त्याचा परिपोष करण्यासाठीं बहुधा प्राकृत किंवा कदाचित् ग्राम्य घटनांचा किंवा प्रसंगांचा उपयोग केलेला आढळून येतो. संस्कृत नाटकांमधून विनोदाचा सर्व मक्ता विदूषकाकडे सोपविण्यांत आलेला असून त्याचा आविष्कार मूर्खपणाचें किंवा अज्ञानाचें प्रदर्शन, खाद्यपदार्थांविषयींचा हावरेपणा किंवा चित्रविचित्र पोशाख आणि थिल्लर अंगविक्षेप इत्यादि प्राथमिक साधनांच्या द्वारा केलेला आढळून येतो. विनोदाचा उद्भव जरी प्राचीन काळच्या वाङ्मयांत झालेला असला तरी त्याचा खरा विकास अगदीं अलीकडच्या काळांतील वाङ्मयांत झालेलाच आढळून येतो. इंग्लंडमध्यें अठराव्या शतकांत ॲडिसन, स्टर्न, गोल्डस्मिथ यांनीं अभिजात विनोदाचा पुरस्कार केला. तथापि त्याचा खरा बहार एकोणिसाव्या शतकांतच दरवळूं लागला. मराठी वाङ्मयांतही विनोदाचा नवा अवतार कोल्हटकरांच्या 'सुदाम्याच्या पोह्यां'नींच झालेला दिसून येईल.

हास्याचें पहिलें स्वरूप शब्दनिरपेक्ष आहे. प्रत्येक भावनेची परिस्फुटता मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेंत कशा प्रकारची असेल याचा छडा लावणें मोठें मनोरंजक आहे. भाषानिर्मितीच्यापूर्वीं ज्या स्वरांनीं रानटी माणसाच्या क्षुधा-तृषेच्या भावना व्यक्त होत असत तेच स्वर उच्चाराच्या कमी अधिक आघातांनीं निरनिराळ्या भावनोद्रेकांचे आविष्कार करण्यास उपयोगी पडले असावेत आणि त्या भावनाव्यक्तीस पूर्णता यावी म्हणून अंगविक्षेपांचाही उपयोग झाला असावा. हास्याचें स्वरूप शब्दनिरपेक्ष आहे असें जें वर म्हटलें आहे, त्याचा अर्थ असा, कीं तें जेव्हां मानवी मुखांतून उसळलें तेव्हां शब्दच अस्तित्वांत नव्हते. भाषेची घटनाच त्या वेळीं झालेली नव्हती—'अ' या स्वराच्या जोरदार पुनरुच्चारानेंच हास्य व्यक्त होतें. मात्र हास्याची उत्पत्ति प्रथम जी झाली ती विशुद्ध आनंदाच्या पोटीं झालेली नाहीं. शत्रूवर विजय प्राप्त झाल्यावर त्या आनंदाचें प्रदर्शन करतांना प्राथमिक अवस्थेंतील मनुष्यानें

दिलेला हुंकार म्हणजेच हास्य होय. अरण्यांत आपल्या भक्ष्याचा पाठलाग करून शिकार हातीं लागल्यावर विजयोन्मादांत ज्या रानटी माणसानें "हा, हा" म्हणून आरोळी ठोकली असेल ती जगांतील हास्याची पहिली घोषणा होय. पण ह्या हास्यांतील रानटी ओबडधोबडपणा, सूडाची भावना व क्रौर्याची तीव्रता कालांतरानें नष्ट झालेली आहे. आरंभीं निर्घृण हास्याचें स्वरूप मोठें घातक आणि नाशकारक होतें; परंतु समाजाच्या उत्क्रांतीच्या ओघांत त्या हास्य-विनोदाचे सर्व कांटे झडून जाऊन आज त्यावर मखमलीचें मार्दव आलेलें आहे. वक्रोक्ति, वैधर्म्य व विसंगति यांच्या दर्शनानें मनांत उद्‌भूत झालेल्या सुखसंवेदनांची गोड खदखद म्हणजे आजचें हास्य आहे.

अगदीं प्रथम विनोदाची कल्पना अभिनयाच्याच साहाय्यानें व्यक्त केली जात असे. शब्दांचें साहाय्य तिला नव्हतें. परंतु हळूहळू कलात्मक बुद्धीच्या विकासाबरोबर विजय, क्रौर्य, परपीडनानंद इत्यादि सुष्टदुष्ट भावना व्यक्त करतांना मनुष्यास स्वरांतून शब्दांची व अभिनयांतून चित्ररेखनाची प्राप्ति झाली. मनुष्यास आपलीं मनोगतें सहज आणि संपूर्णतेनें एकमेकांस कळविण्याचीं हीं दोन बहुमोल साधनें इतकीं वाढलीं कीं, आज वाङ्मय आणि चित्र या कला मनुष्याचें प्रत्यक्ष जीवन होऊन बसल्या आहेत. वाङ्मयांतील विनोद किती प्रमाणांत वाढला हें वर सांगितलें आहेच. चित्रकलेंतील विनोद व्यंगचित्रांच्या आजकालच्या प्रगतीवरून दिसून येण्यासारखा आहे. चारदोन रेषांच्या फराट्यांनीं मोठमोठ्या व्यक्तींचे दोष किंवा राजकारणी मुत्सद्द्यांच्या डावपेंचांतील रहस्यें जनतेच्या पुढें उघडीं करून दाखवतां येतात.

यावरून उपहास हा हास्याचा आत्मा आहे हें उघड होतें. हास्याचीं कारणें किंवा आविष्कार करण्याचे प्रकार समाजपरिस्थितीमुळें किंवा सुसंस्कृतीमुळें बदलेले गेले तरी त्यांतील मध्यवर्ती भावना अजूनही आहे तशीच कायम आहे. गळा दाबल्यानें तडफडणाऱ्या शत्रूचे हाल पाहून प्राथमिक माणसाला हसूं येत असेल; तर आजच्या सुधारलेल्या जगांत आपल्या प्रतिपक्ष्याला कोटिक्रमानें निरुत्तर झालेला पाहूनही आपल्याला हसूं येतें. विनोदजन्य हास्याचा प्राण उपहासच आहे. या ठिकाणीं एका महत्त्वाच्या वादाची चर्चा करणें क्रमप्राप्त आहे.

प्रो० जोग यांनीं आपल्या अभिनवकाव्यप्रकाशांत हास्यरसाची चर्चा

करतांना त्याचें स्वरूप संकुचित असून 'हास्य' हा रस-पदवीस योग्य नाहीं असें विधान केलें आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं, " पूर्वीच्या नाटकांतील विदूषकाखेरीज या रसास दुसरीकडे स्थान नाहीं. या रसाचें हें संकुचित स्वरूप काढून टाकून आनंदोत्पादक असे सारे प्रकार यामध्यें अंतर्भूत करावेत. खरें पाहिल्यास हास्याच्या मुळाशीं आनंद हीच भावना आहे. हास्य हें आनंदाचें बाह्य स्वरूप आहे. या आनंदांत सृष्टींतील सुंदर सुंदर वस्तु पाहून होणारा आनंद, उच्च विनोदानें होणारा आनंद, अलौकिक स्वार्थत्यागानें होणारा आनंद, कीर्तिलोभानें होणारा आनंद, उच्च काव्यकृति पाहिल्यानें होणारा आनंद, खेळांत मिळालेल्या यशानें होणारा आनंद इत्यादि अनेक प्रकारचे आनंद अंतर्भूत करून त्याचें व्यापक स्वरूप केल्यास पाश्चात्य मानसशास्त्रांतील Joy या भावनासंघाचा त्यास आधार मिळेल. अर्थात् हास्यरसाचें तेंच नांव कायम ठेवतां येणार नाहीं. त्याबद्दल आनंद किंवा निवृत्ति असें स्थायिभावाचें नांव कल्पून आनंद हेंच रसाचें नांव कायम करण्यास हरकत नाहीं. हास्य हें आनंदाच्या एक अनुभाव म्हणूनच राहील. या रसाचें स्वरूप असें बदलून व्यापक करणें भाग आहे. तरच त्यास रस पदवी मिळेल, नाहीं तर तो नुसता अनुभाव होण्यास योग्य राहील. पण साधारण संकुचित स्वरूपांत का होईना त्यास Joy या भावनेस समान म्हणून आपल्या रसप्रक्रियेंत प्रतिनिधि आहे असें म्हणतां येईल."

प्रो. जोग यांचें हें म्हणणें सकृद्दर्शनीं खरें वाटलें तरी सूक्ष्म दृष्टीनें पाहतां त्यांतील दोष लक्षांत येण्यासारखा आहे. हास्याच्या मुळाशीं आनंद हीच भावना आहे व हास्य हें आनंदाचें बाह्य स्वरूप आहे असें प्रो. जोग यांचें म्हणणें आहे. वास्तविक आनंद ही भावना स्थूल आणि अनेक मनोविकारांच्या पोटीं जन्मास येणारी अतएव मिश्र आहे. आनंदमय चित्तवृत्ति होणें तीसच रस म्हणावयाचें व कोणत्याही रसाचा परिणाम थोड्या फार फरकानें आनंदस्वरूपीच असला पाहिजे हा जो मुख्य सिद्धान्त तो प्रो. जोग यांना मान्य आहे आणि हास्य हें तर केवळ आनंदानेंच उत्पन्न होणारें नाहीं. मूलतः आनंद आणि हास हे समानार्थक शब्द नव्हेत. मनाच्या या दोन सूक्ष्म वृत्ति अगदीं पृथगात्म आहेत. नऊ किंवा दहाही रसांचा साहित्यांत आविष्कार झाला म्हणजे रसिकांस आनंदाची भावना होऊं शकेल; परंतु हास ही भावना

तशी नाहीं. ती फक्त वागङ्गादि विकारदर्शनजन्मा आहे. एऱ्हवीं ती उत्पन्न होणार नाहीं. 'हास्यो हासस्थायिभावः' या उक्तींत हास ही आनंदापेक्षां हास्यरसांतील अधिष्ठित भावना कशी आहे हें दिसून येईल. तोंड, अंग, वेष यांनीं विकृत आकार दर्शविणें, चेष्टा करणें इत्यादि गोष्टींचा मनांत तयार होणारा नर्मविकास म्हणजे हास ही भावना होय. परिहास, उपहास, किंवा विहास हे शब्द ह्या भावनेचे छायार्थ दाखविणारे आहेत. ते सर्वस्वीं आनंदनिरपेक्ष नसले तरी आनंद ही भावना येथें दुय्यम आहे. हास्य हें आनंदाभिव्यक्तीचें बाह्य स्वरूप असलें तरी जेव्हां आपण हास्यरसाविषयीं बोलतों तेव्हां तें आनंदाचें निदर्शक नसून 'हास' या स्थायिभावाचें बाह्यस्वरूप असतें. पाश्चात्य मानसशास्त्रांतील Joy या भावनासंघाच्या बैठकीला समानार्थक प्रतिनिधि पाठविण्याच्या भरीस पडून आपल्या भावनेची ओढाताण करणें योग्य नाहीं. हास ही भावना मर्यादित असली तरी स्वतंत्र व स्थायि आहे. ती आनंद नांवाच्या नवसंशोधित सागरांत बुडाविणें आपल्या रसिकतेस धरून होणार नाहीं. हास या स्वतंत्र मनोव्यापाराची जात त्यामुळें नाहींशी होईल. आतां असा वर्णसंकरच करावयाचा असल्यास ती गोष्ट निराळी. मग चाफेकरांच्या रसशाळेंतील दोनच रस कां मानूं नयेत? वस्तुतः ही हास्यवृत्ति टिकवून धरण्यास प्राचीन कवींनीं विदूषक हें पात्र निर्माण केलें आहे. त्यांनीं आनंद निरनिराळ्या पात्रांकडून निर्माण केलाच आहे. मग विदूषकानें काय केलें हा प्रश्न उरतोच. विदूषकानें हास्य निर्माण केलें कीं आनंद निर्माण केला यांमध्येंच हास्यरसाची पृथगात्मता सहज दिसून येणारी आहे. प्राचीन कवींना विदूषकासारखे सर्व-तंत्र-स्वतंत्र पात्र या रसासाठींच निर्माण करावें लागलें. यावरून ही गोष्ट अधिकच स्पष्ट होणारी आहे. तात्पर्य हास्यरसाचें वैशिष्ट्य 'आनंदाच्या' गल्लतींत मिसळून नाहींसें करणें हें केव्हांही इष्ट नाहीं.

विनोदी कवितेच्या कार्याचा यानंतर विचार करूं. विनोदी काव्यानें लोकानुरंजन होतें हें मागें सांगितलेंच आहे. परंतु तिचें महत्त्वाचें अवतारकार्य म्हणजे विनोदपूर्ण दोषाविष्कार होय. हें काम ती कोणत्या पद्धतीनें व कितपत यशस्वी तऱ्हेनें करते हें पाहिलें पाहिजे.

जुन्या मराठी कवितेकडे या दृष्टीनें पाहिल्यास दोषदर्शनासाठीं विनोद-

गर्भ लेखनपद्धतीचा अवलंब झालेला नाहीं. कांहीं शब्दांवर चमत्कृति किंवा व्युत्पन्नता दर्शविण्यासाठीं कोट्या केलेल्या आढळून येतात. त्यामुळें थोडीफार काय गंमत वाटली असेल तेवढीच. त्या काळच्या धीरगंभीर काळांत तेवढाच विनोद पुरेसा होत असावा. संस्कृत वाङ्मयांतही हाच नमुना. त्यामध्यें दोष दर्शविणाऱ्या कारिका किंवा टीकेवर प्रतिटीका पुष्कळ आढळतील, परंतु या टीकालेखांतून विनोदाऐवजीं मुद्देसूद मतखंडन व कांहीं ठिकाणीं शिवराळपणा आलेला आहे. कोटिक्रम करण्याची हौस मात्र इतर देशांप्रमाणें येथेंही लोकप्रिय होती व आहे.

जेव्हां भाषेचा उद्गम आणि विकास झाला तेव्हां विनोदभावनासूचक असे पुष्कळ शब्द अस्तित्वांत आले. त्यांच्या विशिष्ट मांडणीनें किंवा उपयोगानें विनोदगर्भ किंवा उपरोधक कल्पना सहज व्यक्त होऊं लागल्या. इतकेंच काय पण कित्येक शब्द द्व्यर्थी उपयोगांत आणतां आल्यामुळें एकाच वेळीं गंभीरार्थ व विनोदार्थ उत्पन्न करण्याच्या खुब्या प्रचारांत येऊं लागल्या. एकाच शब्दांतून वरवरचा अर्थ व गर्भितार्थ उत्पन्न करून वाटणाऱ्या विनोदास कोटि असें म्हणतात. श्लेषार्थाची ही शाब्दिक गंमत म्हणजे विनोदमंदिराची अगदीं पहिली पायरी आहे. थोडें ऐतिहासिक दृष्टीनें वाङ्मयाकडे पाहतां विनोदाची वाढ एकोणिसाव्या शतकांतील व त्यानंतरच्या काळांतील आहे. जुन्या संस्कृत वाङ्मयांतील विनोद दुर्बल व रूक्ष आहे. मध्ययुगीन पंडितांच्या विनोदाचें स्वरूप बालिश होतें तर तत्कालीन जनतेची विनोदसमीक्षावृत्ति अगदीं प्राथमिक अवस्थेंतच होती. त्या वेळच्या कांहीं पंडितांचा विनोद कळून घ्यावयाचा म्हणजे त्यांच्या दोन पानांच्या पदटीपा अगोदर वाचाव्या लागत तेव्हां कोठें त्यांची एकादी कोटि कळावयाची! कित्येक विनोदमूर्तींचा विनोद तर इतका खोल असावयाचा कीं, त्याचा तळ लागावयाच्या ऐवजीं आपला निकाल लागावयाचा. परंतु अशा केवळ शाब्दिक कोट्यांमध्येंच विनोद समाविष्ट होत नाहीं. मानवी स्वभावांतील विक्षिप्तपणाचें, तऱ्हेवाईकपणाचें किंवा खाचाखोचांचें मार्मिक अवलोकन करून त्यांतील विरोध आणि विसंगति दाखविणें यांत विनोदी लेखकाचें कौशल्य आहे.

विनोद उत्पन्न करण्याचें प्रमुख साधन म्हणजे अतिशयोक्ति होय. हास्याचा अतिशयोक्ति हा एक अलंकार आहे. हा किंवा भाषेचे दुसरे अनेक अलंकार

अलीकडे कोणी वापरीत नाहीं हें खरें; पण त्याला कारणें मात्र फार वेगळीं आहेत. अलीकडील स्त्रियांप्रमाणें कवि आणि लेखक फार नाजूक झाले आहेत. त्यांना हे अलंकार पेलतच नाहींत. खरें पाहूं जातां ही अलंकारांची अलीकडील दरिद्री बेपर्वाई स्त्रियांच्याप्रमाणें लेखकांच्या लेखनसौंदर्यासही कमीपणा आणणारी आहे. अतिशयोक्तीनें हास्य निर्माण करावयाचें झाल्यास आपण एकादें विधान करतांना नेहमींपेक्षां त्यांत अधिक असंभवनीयता किंवा अमापनीयता सहज दिसावी आणि चेष्टेचा स्वर तर प्रामुख्यानें यावा अशी रचना व्हावी. उदाहरणार्थ "माझ्या आठवणीप्रमाणें बरोबर असेल तर कसबा पेठेंत ६३२२३०३ डांस व भवानी पेठेंत दोन अब्ज नऊशें नव्याण्णव चिलटें असावींत." या उदाहरणांतील विधानावरून आंकडे प्रत्यक्ष तयार न करतां किंवा न मिळवितां केवळ स्मृतीवर आपलें बोलणें ठोकून नेणारांचा कसा खुबीदार उपहास झाला आहे हें दिसून येईल.

उपहासप्रधान विनोदी वाङ्मयाच्यासंबंधीं विचार करूं लागलों म्हणजे आपणास असें दिसून येईल कीं, या वाङ्मयास अगोदर लिहून तयार असलेल्या साहित्याचा आधार असल्याशिवाय हें उत्पन्न होऊं शकणार नाहीं. हें वाङ्मय क्वचितच स्वयंभू असूं शकतें. परंतु येवढ्यावरून या वाङ्मयप्रकारास परावलंबी म्हणणें हें अयोग्य आहे. मूळच्या लेखनास जरी या प्रकारामुळें कमीपणा येत नसला तरी त्यावरून बनलेली कृति बांडगुळाप्रमाणें तोडून टाकण्याइतकी त्याज्य नाहीं! खरें पाहिलें असतां कांहीं लोक म्हणतात त्याप्रमाणें अशा वाङ्मयास बांडगुळ वाङ्मय म्हणणें चूक आहे. पुढें जाऊन या वाङ्मयप्रकारास कलमी वाङ्मय किंवा कलमी साहित्य म्हटल्यास अधिक शोभेल असें वाटतें. बांडगुळापेक्षां कलमी रोपट्यांची किंमत कशी अधिक असतें हें विस्तारानें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

अशा कलमी सहकारतरूंचीं साहित्य-फळें म्हणजे विडंबन काव्यें होत. आजवरच्या अनुभवावरून पाहतां गद्यापेक्षां पद्याचें विडंबन अगोदर झालें. गद्याचें विडंबन करणें पद्याइतकें सोपें नाहीं. म्हणून गद्यविडंबनकार थोडे व उशिरा उत्पन्न होतात तसें पद्याचें नाहीं. एकादी छक्कड ऐकल्याबरोबर एकादा सामान्य शब्दजुळव्या कवि विडंबनाची ऐट आणील. कवितेचेंच विडंबन सहज व अगोदर होण्यास दुसरेंही एक कारण आहे. कविता हा लेखन-

प्रकार विडंबनास सौकर्याचा आहे. कवितेचें अंग ( form ) स्वरांचें आणि शब्दांचें अनुकरण करण्यास सहज वाटतें; तसें गद्याचें बाबतींत नाहीं. गद्याच्या विडंबनास पदानुक्षेप किंवा स्वरानुक्षेप साधतां येणें शक्य नसतें. त्या ठिकाणीं लेखकाची सर्वसाधारण लेखनशैली उपहासित करावी लागते. त्याहून उच्च दर्जाचें गद्यविडंबन म्हणजे एकाद्या मूळच्या गोष्टींतील मध्यवर्ती कल्पना व तिचा सांगाडा असा चमत्कारिक साधर्म्यानें फिरवून टाकावयाचा कीं, विडंबन तर नवें वाटावें व मूळची गोष्ट तिच्या अंगा-उपांगांनीं युक्त असूनही पण वेगळ्या अवस्थेंत विनोद आणि विसंगतीच्या संमिश्र कोंदणांत दिसावी. याला इंग्रजींत Burlesque असें म्हणतात. यांतील हास्यास्पद अनुवाद व मांडणी फारच मजेदार असते.

वर दर्शविलेली पद्धत व परिणाम काव्यक्षेत्रांत घडवून आणल्यानें विडंबन काव्यें तयार होतात. सामान्यतः मूळ कवितेमध्यें थोडाबहुत शब्दरचनेंत फरक केला म्हणजे विडंबन काव्य झालें अशी पुष्कळांची समजूत आहे. परंतु तें सर्वस्वी खरें नाहीं. पॅरडी या शब्दाच्या कोशार्थापुरतें पाहिलें तरी वरील रचना अपुरी वाटेल. पॅरडीचा अर्थ Carricature of a poem made by applying its words and ideas with burlesque effect असा आहे. कमीअधिक प्रमाणांत मूळ कवितेप्रमाणें पद्यरचना करून तिच्या गंभीर अभिप्रेत अर्थाचा मात्र नवीन अनुकरणात्मक पद्धतीनें उपहासात्मक विपर्यास करणें म्हणजेच व्यंगगीत किंवा विडंबन काव्य होय. या अनुकरणांत कवीचे ठराविक शब्द, त्याचे व्यक्तिविशेष, ठरीव लकबी, भाषेचे दोष इत्यादींचा समावेश व्हावयास पाहिजे. कवितेचें केवळ हास्यकारक पण मार्मिक दोषानुकरण साधणें हें जसें महत्त्वाचें आहे तसें मूळ कवीचा स्वराघातहि त्यांत अनुरंजित झाला पाहिजे. विडंबन काव्य (Parody) म्हणजे विनोदगर्भी व्यंगदर्शी कला आहे. पण या व्यंगदर्शनांत जितक्या प्रमाणांत विनोद आणि उपहास मिसळला असेल तितक्या प्रमाणांत तें विडंबन अधिक यशस्वी समजलें जाईल. केवळ प्रसिद्ध कवीच्या काव्यांत शब्दापुरती विकृति किंवा अनुकृति करून काव्य तयार करण्यापेक्षां त्याची लोकविलक्षण आणि अनिष्ट भाषासरणी किंवा मतप्रणाली यांचा उपहास साधावयास हवा. शिवाय विनोदाची बैठक उठून दिसावी म्हणून त्यांत अतिशयोक्ति ( over statement ) किंवा अल्पोक्ति

(under statement) यांचेंही थोडेंबहुत तिखटमीठ असावें. सामान्यतः येवढ्या गोष्टी विचारांत घेतल्या म्हणजे विडंबन काव्याचें शारीरशास्त्र तयार झालें असें म्हणावयास हरकत नाहीं.

आतां या विडंबन कवितेचा उपयुक्ततेच्या दृष्टीनें विचार करण्यासारखा आहे. विडंबन ही उपहासात्मक टीका आहे. आणि टीकेचा उद्देश जसा सूत्रबद्ध किंवा कठीण भाग सुगम करून सांगणें आहे तसा दोषांवर हल्ला करणें हाही आहे. अर्थात् ते दोष जाऊन त्यांत सुधारणा घडावी हा हेतुच त्यामध्यें असतो. आमच्या कॉलेजांतील एक आठवण, माझे मित्र रा. गो. गं. पोतदार यांनी एके ठिकाणीं दिली आहे तीच उदाहरणादाखल येथें देतों. आमच्या वर्गांत एक झोंपाळू विद्यार्थी असे. तो रोज आमच्या शेजारीं बसून मोठ्यांदा घोरत असे. त्याचें दिवसां उजेडीं भरवर्गांत घोरणें ऐकून मला फारच गंमत वाटली. पण त्या विद्यार्थ्यास त्याचें विशेष कांहीं वाटत नसे. त्याचा तो निद्रेंतील रुद्र स्वर ऐकून मला लहानपणीं शिकलेल्या '**भीमरूपी**'ची आठवण झाली. तें मारुतिस्तोत्र म्हणून आम्ही त्याची टिंगल करूं लागलों. "**महाबळी प्राणदाता सकळां उठवी बळें**" या ऐवजीं "**महाबळी झोंप घेतां सकलां भिववी बळें**" या विडंबनानें तर तो विद्यार्थी अतिशय खजील होई. शेवटीं वर्गांत झोंप घेणाऱ्या त्या महाबळीची ती खोड अजीबात मोडली. अशा चमत्कारिक संवयी किंवा माना वेळणें, डोळे उडविणें वगैरे खोडी अशा विडंबनाच्या साहाय्यानें हमखास नाहींशा होतात. मात्र विडंबन हें करावयाचें म्हणून तें प्रत्येकास जमेलच असें मला वाटत नाहीं. कांहीं माणसांचा जात्याच स्वभाव विनोदी व व्यंगान्वेषी असतो अशीं माणसें आपण नेहमीं पाहतों. हीं माणसें आपआपल्या मंडळींत आवडतीं असतात. लोकांचे दोष त्यांनीं काढले तरी लोकांना त्यांच्या विनोदवृत्तीमुळें व सद्धेतूमुळें त्यांचा राग येत नाहीं. तेव्हां तात्पर्य येवढेंच कीं, विडंबनासाठीं मनाची किंवा स्वभावाची मूलतः थोडी थट्टेखोर ठेवणच असावयास पाहिजे.

विडंबनाचा उपहास हा आत्मा असल्यामुळें तें कधीं कधीं फार प्रखर भासतें. परंतु अपेक्षित परिणामाच्या दृष्टीनें पाहिलें तर या टीकास्त्राइतकें हुकमी साधन नाहीं. समाजांतील अनिष्ट रूढि, धर्माच्या नांवाखालीं होत

असलेली फसवणूक, प्रतिष्ठितांचा ढोंगीपणा किंवा केवळ पैसे मिळविण्यासाठीं घेतलेलीं विद्वत्तेचीं सोंगें चव्हाटयावर आणावयास विडंबनाचा फार उपयोग आहे. कोणी यास दुधारी शस्त्र म्हणतात. मला तर वाटतें विडंबन हें एका दृष्टीनें मूषकदंशाप्रमाणें आहे. अंगास दंश तर होत असतो परंतु त्यावरच विनोदाची फुंकर लागत असल्यामुळें वेदना होत नाहीं. समाज सामान्यतः आंधळा असतो. कांहीं गोष्टी विशिष्ट काळीं हितावह म्हणून त्यांचा स्वीकार झाल्यावर पुढें त्या निर्जीव व निरुपयोगी होतात. पण एकदां आपल्या म्हणून उराशीं बाळगलेल्या भल्याबुऱ्या गोष्टी अनेक लंगडया सबबींवर तो वेडया-सारखा करीत राहतो. अशा गोष्टींचा उपहास करून त्यांतील निरर्थकता त्यास विडंबनाच्या साहाय्यानें पटवून दिली, कीं तावडतोब तो त्या परंपरेच्या कचाट्यांतून सुटूं शकतो.

साहित्यप्रांतांत तर या छिद्रान्वेषी विनोदकलेचा मोठा उपयोग झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तो कसा झाला आहे हें सांगतांना माझ्या लिहिण्याला थोडासा आत्मश्लाघेचा वास येण्याचा संभव आहे. कदाचित् तो येणारही नाहीं. कारण आतां महाराष्ट्रांतील सर्व वाचकांना माझा आणि विडंबन काव्याचा कसा व कितपत संबंध आहे हें पूर्ण कळून चुकलें आहे; आणि आनंदाची गोष्ट कीं, बहुतेक कोणी माझ्या सद्धेतूबद्दल शंका घेतल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीं काव्यांत क्रांति घडवून आणण्यासाठीं महाराष्ट्रांत परस्पर-प्रशंसा-संघ स्थापन झाले. तेव्हां त्यांचे ते नियम, तीं ध्येयें, त्या मंडळाच्या साप्ताहिक बैठका, तो नाविन्याचा व वैशिष्ट्याचा पोकळ अभिनिवेश, तें एका विषयावर अनेकांनीं काव्य करणें, तें क्षुल्लक गोष्टीसाठीं सुद्धां एकमेकांनीं एकमेकांवर सकाळ संध्याकाळ स्तुतीचा वर्षाव करणें, तसेंच कोणी आपणास मोरोपंत तर कोणी स्वतःला वामनपंडित, तर कोणी शेली–बायरन् समजावें, कोणी आपण समोर असतांना केशवसुतांना कवि म्हणणेंच रास्त नव्हे असें म्हणावें, तर कोणी गोविंदाग्रज केवळ बुद्धीवर जगले—त्यांना हृदयच नव्हतें असा निर्वाळा द्यावा; कोणी नव्या काव्य-प्रकाराच्या खाणी खोदाव्या तर कोणी छंदाच्या आणि शब्दांच्या टांकसाळी घालाव्या; एक ना दोन अशीं निरनिराळीं सोंगें घेऊन ही कविमंडळी वाङ्मयांत धुमाकूळ घालूं लागली. म्हणूनच मला विडंबनाचें हत्यार उचलावें

लागलें. वाङ्मयात्मक टीकेचा एक प्रकार म्हणूनच मीं विडंबनाचा उपयोग त्या वेळीं केला. मी प्रामुख्यानें वापरलेल्या या शस्त्राचा दुरुपयोग इतर मंडळींनीं अवाङ्मयात्मक टीका करतांना केला. त्या दोषाचें खापर माझ्याच माथ्यावर फोडण्यांत येतें. विडंबनाचें शस्त्र वापरणारे सैनिक अज्ञानानें वाटेल त्याला जखमी करूं लागले तर त्याचा दोष शस्त्राच्या कारखानदाराकडे देणें योग्य नाहीं. विडंबन काव्याचें कोलीत मी महाराष्ट्रांतील कवींच्या हातीं दिलें असें जरी क्षणभर मानलें तरी त्यांनीं स्वतांच्या किंवा दुसऱ्यांच्या विड्या शिलगण्याऐवजीं स्वतांचेच हात भाजून घेण्यास प्रारंभ केला तर त्याचा दोष माझ्याकडे येऊं नये असें वाटतें.

विडंबन काव्यप्रकार महाराष्ट्रांत प्रथम कोणी आणला किंवा विनोदी अगर विडंबन काव्याच्या जनकत्वाचा पहिला मान कोणास द्यावयाचा याबद्दल एक वाद उपस्थित झाला होता. माझे मित्र श्री. नाथ निफाडकर यांच्या वाङ्मय मासिकांत प्रो० भा. ल. पाटणकर यांनीं आद्य विडंबक कवि कोण याची संशोधनपद्धतीनें चांगली चर्चा केली आहे. त्यांत विडंबनाचे श्री. लिमये, श्री. ग. स. मराठे, श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. जोशी इत्यादि निरनिराळे आद्यजनक म्हणून उभे करण्यांत आले होते; मलाही एकानें आद्यजनक असल्याचें सुचविलें होतें. परंतु मी हे श्रेय घेण्यास तयार नाहीं हें त्याच वेळीं जाहीर रीत्याच सांगून टाकलें होतें. शेवटीं जुन्यांत जुनें विडंबनात्मक काव्य जें "संगीत हजामत" आज उपलब्ध आहे, त्याचे कर्ते श्री. मंगेशराव तेलंग यांनाच प्रो. पाटणकर यांनीं आद्य विडंबक कवि म्हणून टिळा लावला आणि तेंही योग्य झालें.

एका दृष्टीनें विडंबनास 'हजामती'पासून सुरवात झाली ही गोष्ट योग्यच झाली म्हणावयाची. रानाची तोड झाली म्हणजे वसाहतीचा प्रदेश किंवा शेताची मशागत झाल्यावर शेत जसें पुढील कार्यास उपयुक्त होतें तसें विडंबन काव्याच्या प्रसारास मंगेशरावांनीं केलेल्या हजामतीचा उपयोग झाला असेल. मला मात्र या ऐतिहासिक गोष्टी माहीत नव्हत्या. विडंबनाची स्फूर्ति मला या इतिहासांतून मिळालेली नाहीं. माझ्या काव्याच्या बाबतींत मात्र मी आद्यजनक आहें.

आतां पॅरडी ही दोषदर्शक कला नाहीं असा दुसरा वाद रा. निरंतर यांनीं

उपस्थित केला आहे (ज्योत्स्ना पा. ९३) त्याचा थोडक्यांत विचार करूं. यासंबंधीं साहित्यतोरण या ग्रंथांत त्या पुस्तकाचे संपादक श्री. दि. वि. देव यांनीं केलेली चर्चा अगदीं समर्पक आहे. ते म्हणतात, पॅरडी ही दोषदर्शी नसते किंवा नसावी असें म्हणणें म्हणजे पॅरडीचा एक पंख उपटून टाकण्यासारखें आहे. या पंखतुट्या पाखरानें कितीही चिवचिवाट केला तरी लब्धप्रतिष्ठितांची झोंप संपणार नाहीं. हम्बर्ट वूल्फ यांचा पॅरडीच्या उपयुक्ततेसंबंधींचा अभिप्राय फार खुलासेदार आहे. ते म्हणतातः--

The Parody is only Satire if it be destructive of what it imitates. Of crimes none is in its ultimate effect more pernicious than fustian in literature. For it debauches man in the church of the Spirit. It is a true object of Satire to expose this blasphemy. Parody if overwhelms a hated and hateful original writing performs the same service as that of a successful attack on original sin."

" उपहासात्मक टीकाप्रकारांपैकीं विडंबन हाच एक प्रकार असा आहे कीं, जो अनुकरणसंकेतानें विध्वंसनीय गोष्टी दर्शवितो. वाङ्मयांत दांभिक, अर्थशून्य व अगडबंब भाषा वापरणें या दोषाएवढा दुसरा विघातक दोष आढळणार नाहीं. कारण अशी भाषा अर्थ वा भावना-संवादी नसल्यामुळें कोणताही वाङ्मयप्रेमी अगतिक व कुंठितमति बनतो. वाङ्मयाच्या या पवित्र क्षेत्रांतील ही घाण झटकून टाकण्याचा उपहासात्मक टीकेचा खरा उद्देश असतो. विडंबन काव्य देखील योग्य तऱ्हेनें वापरल्यास तेंच कार्य करतें. ज्या काव्यप्रकारास इंग्रजींत Parody म्हणून म्हणतात, त्यासच समानार्थी शब्द विडंबन काव्य असें आम्हीं वर म्हटलें आहे. परंतु पॅरडी म्हणजे विडंबन नव्हे किंवा उपहास नव्हे असें श्री. निरंतर म्हणतात तें बरोबर नाहीं.

इंग्लिश वाङ्मयांत टीकेच्या निरनिराळ्या प्रकारांत उपहासात्मक टीका Satire हा एक महत्त्वाचा भाग आहे. परंतु या टीकाप्रकाराचे आणखी सूक्ष्म भेददर्शक Lampoon, Burlesque, Allegory आणि Parody असे चार पोटभाग आहेत. लॅंपूनमध्यें व्यक्तिगत टीका असते. कुटाळकी

करण्याचाच फक्त त्यांत हेतु असतो. बर्लेस्कमध्यें नुसता हास्यास्पद अनुवाद व मांडणी केलेली आढळेल. त्यास Satire without tears असें म्हटलें आहे. त्यांत रंजनापेक्षां अधिक हेतु नाहीं. ॲलेगरीमध्यें रूपकात्मक रचना असून विरोध व विसंगति यांवर त्याची उभारणी केलेली असते. त्यांत दोषाविष्करणाचा व उपहासाचा हेतु प्रामुख्यानें असतो. आतां राहिली पॅरडी. पॅरडीचा सरळ अर्थ—Carricature of a poem made by applying words and ideas with burlesque effect असा आहे. कमी-अधिक प्रमाणांत मूळ कृतीबरहुकूम जी गद्य वा पद्य रचना केली जाते व तिच्या गंभीर अभिप्रेत अर्थाचा मात्र नवीन रचनापद्धतीनें उपहासात्मक विपर्यास केला जातो अशा रचनेस विडंबन म्हणावें. ही कार्टर्ली रेव्ह्यूमधील पॅरडीची व्याख्या लक्षांत घेण्यासारखी आहे. तसेंच विडंबन व विटंबना यांतील फरक दाखविणें जरूर दिसतें. विडंबन म्हणजे निरंतर म्हणतात त्याप्रमाणें " विटंबना किंवा वेडावणें दाखविणें " नव्हे. द्रौपदीची विटंबना झाली म्हणजे विडंबन झालें असें नाहीं. लहान मुलें एकमेकांना वेडावण दाखवितात तेव्हां त्यांत खिजविण्याचा हेतु असून शिवाय विनोदही संभवतो. विटंबनेंत परिहास विजल्यना तर नसतेंच पण दुसऱ्यास दिलेल्या अपमानास्पद दुःखाची परिसीमा असते.

या विवेचनावरून वरील चतुर्विध टीकाप्रकारांत कितपत उपहास आहे व पॅरडीस विडंबन म्हटल्यास कांहीं बिघडेल किंवा कसें याचा खुलासा होईल. पॅरडी आणि विडंबन काव्य या दोन्ही शब्दांत मूळ कृतीशीं रचना, स्वराघात व्यक्तिविशेष वगैरेचें अनुकरणासंबंधीं साम्य आहे. तसेंच त्यांचे परिणाम विनोद व उपहास असे एकच दिसून येतात. मग पॅरडी म्हणजे विडंबन किंवा उपहास नव्हे या म्हणण्यांत कांहींच अर्थ उरत नाहीं. पॅरडी या काव्यप्रकारास विडंबन काव्य या शब्दाखेरीज दुसरा समर्पक शब्दच आढळत नाहीं. श्री. निरंतर यांनींही तो सुचविलेला नाहीं. Satire च्या पोटभेदांत विडंबन व उपहास कमी-अधिक प्रमाणांत येतोच. पॅरडीचा स्वतंत्र विशेष लक्षांत घेऊन विडंबन काव्य ही संज्ञा तिला दिल्यास चूक होणार नाहीं. कार्टर्ली रेव्ह्यूमधील व्याख्या पूर्ण घेण्यांत निरंतर यांनीं कुचराई केली नसती तर तीमधील but turning the serious sense of such original

work into ridicule by method of treatment. या खुलाशावरून पॅरडी म्हणजे विडंबन व विडंबनांत उपहास आहेच असें दिसून आलें असतें."

विडंबन काव्याच्या संप्रदायाचे उत्पादक म्हणून माझा नामनिर्देश करतां येत नसला तरी विडंबनाचा प्रसार व प्रचार करण्याचें श्रेय मला देण्यास कोणी कुरकुरेल असें वाटत नाहीं. मराठी भाषेंतील मासिकें व वृत्तपत्रें यांनींही आपआपल्या परीनें हा संप्रदाय वाढविण्यास व फैलाविण्यास बराच हातभार लावलेला आहे. विशेषत: गेल्या पांच वर्षांतील नियतकालिकें चाळलीं तर विडंबन काव्याची केवढी मोठी प्रचंड लाट येऊन गेली असें आपल्या अनुभवास आल्याखेरीज राहणार नाहीं. ह्या काव्यनिष्पत्तीला कोणत्याही प्रकारचें बंधन नसल्यामुळें तिची वाढ बेसुमार व भरमसाट झाली. कोणीही उठावें, हातांशीं सांपडेल ती कविता घ्यावी व त्यांतलेच शब्द इकडे तिकडे फिरवून वेडेंवांकडें विडंबन करावें, असा प्रकार सरसहा दृष्टीस पडूं लागला. विडंबन काव्याच्या ह्या वेड्या पिकामुळें चांगलें विडंबन काव्य तर बाजूलाच राहिलें, पण चांगलें काव्य ठार मारलें गेलें. भिकार, हिणकस व निकृष्ट काव्यनिर्मितीची पर्वणी मात्र या वेळीं अनेक लुंग्यासुंग्या कविब्रुवांनीं साधून घेतली. प्रत्येक प्रसिद्धिलोलुप जुळव्यानें, अंगांत काडीचीही कुवत नसतां आपल्या तुटपुंज्या बुद्धिमत्तेच्या जोरावर चार ओळी खरडण्याची अहमहमिका चालविली आणि कांहीं वृत्तपत्रांनीं त्यांना स्थळ देऊन त्यांना भलतेंच चढवून ठेवलें. महाराष्ट्रांत उत्पन्न झालेल्या ह्या विडंबन-कवींच्या कारखान्यामुळें अस्सल मराठी कविता नेस्तनाबूद होण्याच्या पंथाला लागली व ही परिस्थिति पाहून चांगल्या चांगल्या कवींनीं उद्वेगाच्या भरांत आपल्या दौतींना बुचें ठोकलीं व लाक्षणिक रीत्या आपले हात कलम करून घेतले. आपली सद्दी संपली असें पाहून ते मनांतल्या मनांत धाय मोकलले असतील! चांगल्या कवींना असा जबरीचा काव्यसंन्यास घेण्याची पाळी आणणाऱ्या विडंबकांनीं आतां कवींच्या नांवानें हाकाटी करण्यास सुरुवात केली.

" अरे आला कवी! आतां धावा धावा पळा लपा ॥
पाठीराखे स्मरा। किंवा रामरक्षा तरी जपा ॥ "

अशा प्रकारें कवीचें स्वागत होऊं लागलें!

श्री. दि. वि. देवांनीं हा संग्रह केला नसता तर हें विडंबन काव्य निरनिराळ्या वृत्तपत्रांच्या व मासिकांच्या फाइलींत व कवींच्या चोपड्यांत राहून तसेंच काळाच्या भक्ष्यस्थानीं व विस्मृतीच्या उदरांत गडप झालें असतें. या संग्रहांत मराठींतील आजतागायतची उत्कृष्ट व नमुनेदार विडंबन कविता संग्रहित करण्यांत आलेली आहे. मराठींत अशा प्रकारचा हा पहिलाच संग्रह म्हटला पाहिजे. कपाळावर सत्राशेंसाठ आठ्या असणाऱ्या रडक्या माणसाचाही चेहरा क्षणभर प्रफुल्लित व उल्लसित करण्याचें सामर्थ्य या संग्रहांत आहे. कोणतेंही पान उलगडून पहावें व त्यांत रंगून जावें. ज्या काव्यांचें यांत विडंबन आलें आहे तीं मुळांत वाचकांनीं वाचलेलीं नसलीं तरी रसभंग होण्याची भीति नाहीं. कारण ह्या पुस्तकांतील बहुतेक विडंबनें स्वतंत्रप्राय व विनोदी आहेत. विनोदावर आधारलेल्या शुद्ध विनोदी कवितांचाही ह्या संग्रहांत समावेश केलेला आहे. अर्थात् विडंबनांत विनोदाचाही अंतर्भाव होत असल्यामुळें विनोदी कवितांना येथें स्थान मिळणें अत्यंत उचित आहे. इतकेंच नव्हे, अत्यंत अगत्याचें आहे. ज्या विडंबनाचा आत्मा विनोद नाहीं त्या योगें कुणालाही आनंद होणार नाहीं. विडंबनाचें पर्यवसान केवळ उपहासांत, कुचेष्टेंत किंवा कुचाळींत झालें कीं तें विडंबन अधम स्वरूपाचें होतें. उच्च दर्जाच्या विडंबनांत व्यक्तिद्वेष, कुत्सितपणा किंवा असभ्य टवाळी यांना थाराही नसतो. प्रस्तुत उपहासिनींत अशाच उच्च दर्जाच्या कवितांची निवड करून संपादकांनीं आपली सदभिरुचि प्रकट केली आहे. नुकताच विनोदी काव्यांचा जो एक घाणेरडा संग्रह प्रसिद्ध झाला त्याच्या संपादक-प्रकाशकांची अभिरुचि पाहण्यासारखी आहे !

या संग्रहांत कै. श्री. कृ. कोल्हटकर, न. चिं. केळकर, कै. बोबडे, गोविंदाग्रज, अनंत काणेकर, निशिगंध, मा. त्र्यं. पटवर्धन, डॉ. श्री. व्यं. केतकर, उपाध्ये, दा. भा. पाठक इत्यादि गंभीर विषयावर कविता रचणाऱ्या कवींच्या अंगीं, त्यांच्या गंभीरपणाच्या दडपणाखालीं विनोदबुद्धि कशी दडलेली असते हें पाहावयाचें झाल्यास हा संग्रह उपयोगी पडण्यासारखा आहे. 'बेगमेचें विरहगीत' हें अनंत काणेकरांचें विडंबन काव्य पहा किंवा अज्ञातवासींचा 'फेरीवाला' पहा. त्यांत विनोदाची झांक दिसून आल्याखेरीज राहत नाहीं. केळकरांची सर्वसामान्य वृत्ति परिचयाची असल्यामुळें त्यांचय

विलायतेच्या यात्रेबद्दल फारसें आश्चर्य वाटणार नाहीं. पण ही यात्रा किती गमतीनें त्यांनीं केली आहे तिचें वर्णन करून तिची खुमारी कळणार नाहीं. ती मुळांतूनच वाचली पाहिजे. 'अरे आला कवि !' ही प्रस्तुत संग्रहांतील अगदीं पहिली कविता नागपूरचे 'वागीश्वरी' मासिकाचे उत्पादक कै. बोबडे वकील यांची आहे. बोबड्यांच्या कविता भावगंभीर असल्यामुळें त्यांनीं वाचकांना रामरक्षेचा जप करण्याचा इशारा द्यावा ही घटना कोणाला नवलाची वाटणार नाहीं !

नागपूरचे प्रसिद्ध कवि जयकृष्ण उपाध्ये यांनीं 'चालचलाऊ भगवद्गीता रचून गीतेचें विडंबन केलें आहे. हें विडंबन इतक्या सफाईनें व सदभिरुचीनें केलें आहे कीं, कोणत्याही संस्कृतिवर्धक मंडळाची हें पावित्र्यविडंबन आहे असें म्हणण्याची छाती नाहीं.

जयकृष्ण उपाध्ये आपुली ।
स्मितयुक्त गाईल गीतामाऊली ॥
वैदर्भ शब्दीं जीं गौरविली ।
मोहक केली अत्यंत ॥

या शब्दांत डॉ. श्री. व्यं. केतकरांनीं या गीतेचें गुणगायन केलें आहे.

या संग्रहांत वरील कवीव्यतिरिक्त 'विनोद'कर्ते माधवराव जोशी, ना. गं. लिमये, सं. रा. कर्णिक, सी. का. देव, ह. स. गोखले, राजा बढे, द. वा. हर्णे, पंडित सप्रे, चं. ग. दीक्षित, दि. वि. देव, नंद तेलंग, गो. ल. आपटे, नरेन्‌, बाबुलनाथ, रा. द. ब्रह्मे, पां. गो. लेहोकरे इत्यादिकांची विडंबन–विनोदी काव्यें समाविष्ट झालीं आहेत. यांपैकीं बहुतेक कवि नियत-कालिकांच्या द्वारा वाचकांच्या परिचयाचे झाले असतील. 'मातृपदाविण' ही मूळ कविता वाचकांनीं वाचलेली नसली तरी 'मातृपदावर' या कवितेचें स्वारस्य व माधुर्य वाचकांना चाखतां येईल.

द. वा. हर्णे व राजा बढे यांच्याकडे पाहिल्यास शब्दांचे खेळ खेळून त्यावर हास्यरस निर्माण करण्याकडे त्यांचें लक्ष असल्याचें दिसून येतें. बढे यांची 'मारवाडवासिनी' या कवितेची प्रादेशिक चित्र म्हणून वाखाणणी करतां येईल. त्यांची 'कवीचा संसार' ही कविता विनोदी आहे; पण हा विनोद केवळ शब्दनिष्ठ असल्यामुळें सामान्य वाचकाला तो कितपत रुचेल याची

शंका आहे. माधव-ज्यूलियन यांच्या 'तेथें चल राणी' याचें 'देणें थकल्यावर' हें सरस विडंबन आहे. कवि संराक यांच्या काव्यांत विडंबनापेक्षां विनोदावर भर अधिक आहे. भाषेची सफाई फार थोड्या विडंबनकारांत सांपडते. ना. ग. लिमये यांचें 'बल्लवदूत' व मंगेशराव तेलंग यांचें 'संगीत हजामत' हीं काव्यें एके काळीं फार गाजलीं होतीं. माधवराव जोशी यांनीं खाडिलकरांच्या कांहीं पदांचें सुंदर विकृतानुकरण केलें आहे. नवोदित कवि पंडित सप्रे यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. थोडक्या शब्दांत जास्त अर्थ आणण्याची त्यांची हातोटी फार थोडयांना साधते. आणि विशेष म्हणजे त्यांत मार्मिकता, सूक्ष्म विनोद व उपरोध यांच्या छटा पाहावयास मिळतात. 'शनिवारवाडया'वरची त्यांची एकश्लोकी किती अर्थपूर्ण आहे! वरवर वाचणाराला त्यांतील मार्मिकता—गूढार्थ सहज समजण्यासारखा नाहीं.

एकंदरीनें पाहतां मराठींतील विडंबनकारांच्या काव्याचें प्रातिनिधिक स्वरूप उपहासिनींत पाहावयास सांपडतें. श्री. देव यांनीं हा संग्रह प्रसिद्ध करून विडंबन काव्याला एक प्रकारें स्थायि स्वरूप दिलें आहे. तसेंच अडगळींत पडलेले व विस्मृतीच्या कुहरांत गडप होऊं पाहणारे कित्येक विडंबन कवि त्यांनीं मराठी वाचकांसमोर एकत्रित स्वरूपांत आणून मोठेंच वाङ्मय कार्य केलें आहे. या पुस्तकानें महाराष्ट्र-शारदेच्या काव्यमंदिरांत श्री. देव यांनीं स्पृहणीय भर टाकली आहे यांत शंका नाहीं व त्याबद्दल महाराष्ट्र रसिकांनीं त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

या संग्रहांत कांहीं शुद्ध विडंबनात्मक कविता असल्या तरी शुद्ध विनोदी कविताही कमी नाहींत. मराठींत संपूर्ण विडंबनगीतें उपलब्ध नसल्यामुळेंच कीं काय, संपादकांनीं विनोदी कवितांचा त्यांत अंतर्भाव केला असावा असें वाटतें. 'बालकसाई' ( देवभक्त ), 'संसाराची तऱ्हा' ( दुर्गातनय ), 'शाळेच्या वाटेवर' ( सासवडकर ), 'माझी दौलत' ( गोविंद झोकरकर ), 'चूळभूळ' ( द. वा. हर्णे ) या कविता कवि यशवंतांच्या निरनिराळ्या कवितांचीं विडंबनें आहेत. गिरीशांच्या 'शूर्पणखे'चें 'सुगृहिणी'रूपानें दत्तप्रसन्न कारखानीस यांनीं विडंबन केलें आहे. याशिवाय मेघदूताचें विडंबन ना. ग. लिमये यांनीं 'बल्लवदूत' या नांवानें जें केलें आहे त्यांत असामान्य प्रकारची काव्यशक्ति दिसून येते. केळकरांचें 'विलायतची तयारी' हें

स्वतंत्र विनोदी प्रकरण आहे असें म्हटल्यास चालेल. 'शाहीर' व 'बाबा गप्पीनाथ' या कविता व्यक्तिविषयक असल्या तरी ज्या व्यक्तींना त्या अनुलक्षून आहेत त्यांची ज्या वाचकांना माहिती नाहीं त्यांना त्या नाविन्यपूर्ण अतएव स्वतंत्रच वाटतील. 'डोहाळे', तिनें त्याला परि...', 'कविते करिन तुला मी ठार', 'कवीचा संसार', 'माझा उपास', 'मी कवयित्री' या कविता विनोदी असल्यामुळें मनोवेधक आहेत.

एवंच, रा. देव यांनीं संपादन केलेला हा अभिनव काव्यसंग्रह रसिकांच्या कसोटीला उतरेल यांत शंका नाहीं. वास्तविक हा संग्रह अनेक महिन्यांपूर्वीं छापून तयार असतां केवळ माझ्याच कार्यव्याप्तीमुळें झालेल्या प्रस्तावनालेखनाच्या दिरंगाईनें त्याचें प्रकाशन इतक्या उशिरा होत आहे. या उशिराबद्दल संपादक व प्रकाशक यांची क्षमा मागून हा संग्रह वाचकांच्या हवालीं करतों.

सारस्वत-कॉलनी, पुणें.
ता. ६-११-३६.

प्रल्हाद केशव अत्रे

---

सदर प्रस्तावना लिहितांना मीं या विषयावर पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या अनेक लेखकांच्या स्फुट लेखांचा उपयोग करून घेतला आहे, या कामीं संपादक रा. दि. वि. देव व रा. रा. प्र. कानिटकर यांनीं मला जी मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

## रसिकांस—

उपहासिनी आपले हातीं देतांनां मला यत्किंचितही भय वाटत नाहीं. भय न वाटण्याचें कारण आपणां सर्वांस प्रिय होण्याइतकी गुणवती आहे असा मला विश्वास वाटतो म्हणून नव्हे, तर तिला आपली म्हणणारे ६० स्वयंसैनिक तिच्या व माझ्या पाठीशीं खडे आहेत. आतां हेंही खरें, कीं त्यांना आपल्या आत्यंतिक आपुलकीमुळें आपणांपुढें स्वतःच्या कविता-कन्यकांच्या गुणांची बडेजाव सांगावयास संकोच वाटेल. एकादे वेळीं पित्याच्या भूमिके-वरून आपल्या कन्येच्या ३६ गुणांचें मापही त्यांनीं आपल्या पदरीं बांधलें असतें. परंतु आज मजसारख्या त्रयस्थाकडे ते सोंपविले गेल्यामुळें त्यांना मूग गिळून बसणें भाग आहे. किंबहुना आपल्या मुली सुस्थळीं पडल्या आहेत किंवा कसें याबद्दल त्यांना एक प्रकारची भीतिही वाटण्याचा संभव आहे. कोणाला वाटेल कीं, यांच्या सोनकेळीच्या घडाला गाजराच्या ढिगाशेजारीं बसविलें असेल, तर कोणाला आपल्या मेथीच्या भाजीला विलायती घांसाजवळ ठेविलें जाण्याची धागधूग वाटत असेल. कोणाला आपल्या टोमॅटोच्या राशीशेजारीं पसरलेल्या कोंड्यावर विक्रीस मांडलेल्या अंड्यांप्रमाणें भयंकर वाटूं शकेल. परंतु ही भीति बहुधा कोणासच वाटूं नये अशीच त्यांच्या कवितांची निवड करण्यांत आली आहे. एकजात फटाक्यांचा सर तयार व्हावा असें मी योजिलें आहे. हातीं आलेल्या सर्व कवितांमधून शक्य तों याच दिशेनें निवड करण्याचा प्रयत्न केला आहे. मध्यें बराच काळ गेल्यामुळें यांतून कांहीं फुसकुल्या निघण्याचा किंवा कांहीं सादळल्या जाण्याचा थोडासा संभव आहे. तसेंच हे फटाके मागेंपुढें हातीं आल्यामुळें सराच्या गुंफणीमध्यें लवंगीशेजारीं मोठे असें कांहीं ठिकाणीं झालें आहे. परंतु ते आपआपल्या ठिकाणीं आवाज द्यावयास कुचराई करणार नाहींत अशी आशा वाटते.

१९३३ सालापासून हा काव्यसंग्रह काढण्याचें ठरविलें होतें. तो प्रसिद्ध होतां होतां १९३६ सालचा शेवट हातीं आला आहे. या अक्षम्य विलंबास मात्र तशींच अनेक सबळ कारणें घडलीं आहेत येवढेंच येथें सांगतों. उप-हासिनी पल्लवित होऊं नये म्हणून तिच्या अंकुरछेदनाचाही एकादा बालिश

प्रयत्न झाला असला तरी ती पल्लवितच काय पण पुष्पित व्हावी अशी माझ्या अनेक मित्रांची हार्दिक मनीषा असल्याचें मला पक्कें ठाऊक होतें; आणि म्हणूनच द्रुत नसली तरी विलंबित का होईना ती आपणांपुढें मला आज सादरकरितां आली.

• प्रथम ज्या कवींनीं आपल्या कविता देऊन मला उपकृत केलें आणि माझ्या-कडून इतका उशीर झाला तरी सहानुभावानें वाट पाहिली त्यांची कोणत्याही अडचणींची सबब पुढें न करतां क्षमा मागणें योग्य आहे. ज्यांनीं या संग्रहाचें प्रकाशन केलें ते प्रसिद्ध लघुकथालेखक व उदयोन्मुख प्रकाशक श्री. यशवंत-राव जोशी आणि ज्या मुद्रणालयांत या उपहासिनीची ही अद्यावत् वेषभूषा तयार झाली त्याचे थोर मालक श्री. बापुराव राजगुरु यांचे आभार मानण्याची भाषा लिहूं लागलों, तर ते ती छापणें त्यांचेच हातीं असल्यामुळें छापा-वयाचे नाहींत हें एक व तसें लिहिलें म्हणून विनाकारण एकादा दंड घ्याव-याचे म्हणून या दोघांचींही नांवें या आभारप्रदर्शनांतून मुद्दाम वगळून ठेवीत आहें.

या संग्रहास प्रि. पी. के. अत्रे यांनीं वेळांत वेळ काढून जी सुंदर प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहें. कविता मिळविणें, त्यांची निवड करणें, मुद्रितें तपासणें इत्यादि गोष्टींपासून उपहासिनी प्रसिद्ध होई पावेतों अनेक तऱ्हेचें साहाय्य मोठ्या आस्थेनें आणि आपलेपणानें करणारे माझे मित्र श्री रा. प्र. कानिटकर एम्. ए. यांचे आभार कितीदां मानावेत हेंच मला समजत नाहीं. तसेंच भोरचे प्रसिद्ध टीकाकार कवि श्री. ना. म. भिडे बी. ए., ज्ञानप्रकाशचे सहसंपादक श्री. रा. गो. कानडे व श्री. वि. धों. कुलकर्णी बी. ए., वाङ्मय मासिकाचे संपादक नाशिकचे नाथ निफाडकर, संजीवनीचे संपादक श्री. प्र. श्री. कोल्हटकर बी. ए., श्री. गो. गं. पोतदार एम्. ए. आणि विहारचे संपादक प. वा. वि. जी. नाडकर्णी इत्यादि अनेक थोर मंडळींचे साहाय्य मला मिळालें त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. ज्या वृत्तपत्रांनीं उपहासिनीस प्रसिद्धि दिली त्यांचे मी पुनः एकवार कृतज्ञतापूर्वक आभार मानीत आहें.

— दिनकर विनायक देव

कवि

प. वा. गोविंदराव हिंगणेकर



यांच्या स्मृतीस

**— समर्पण —**

“ जशी पानामागें परभृत करी मंजुल स्वन
जसें वेलीमाजी सुमन करि सौगंधश्वसन
जशी रत्नश्रेणी उदधिमधुनी शोभत पहा
तसा मेघामागें हंसत हिमरागें शशिच हा ”

स्नेहांकित

— दि. वि. देव

# अनुक्रमणिका


| क्रमांक | कवितेचें नांव | | कवि | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ | अरे ! आला कवि | ... | कै. बोबडे | १ |
| २ | विहिणींचा कलकलाट | ... | कै. गोविंदाग्रज | २ |
| ३ | काय करावें ? | ... | ,, | ३ |
| ४ | अध्यक्षपद | ... | कै. गो. रा. हिंगणेकर | ४ |
| ५ | चतुरचोर | ... | ,, | ५ |
| ६ | शुद्धाद्वैत | ... | न. चिं. केळकर | ६ |
| ७ | आम्ही कोण ? | ... | केशवकुमार | ७ |
| ८ | करुणरस | ... | ,, | ८ |
| ९ | एक प्रासंगिक | ... | डॉ. श्री. व्यं. केतकर | १० |
| १० | बाई प्रतिसहकारिते | ... | " चाबूकस्वार " | ११ |
| ११ | वृद्ध भट | ... | माधव-ज्यूलियन | १२ |
| १२ | चालचलाऊ भगवद्गीता | ... | ज. के. उपाध्ये | १३ |
| १३ | फसल्यें बाई | ... | प्रो. वा. गो. मायदेव | १५ |
| १४ | वृद्ध भटजी | ... | गिरीश | १६ |
| १५ | फेरीवाला | ... | 'अज्ञातवासी' | १७ |
| १६ | बेगमेच्या विरहगीताला शिवाजीचें उत्तर | ... | अनंत काणेकर | १९ |
| १७ | प्रेम आणि पतन | ... | ,, | १९ |
| १८ | लग्नघरांतील स्वैंपाकिणींचें गाणें | ... | ,, | २२ |
| १९ | मातृपदावर | ... | दि. वि. देव | २४ |
| २० | उंच झालों तर | ... | ,, | २५ |
| २१ | कवींच्या पानास | ... | ,, | २६ |
| २२ | माझें काव्यगायन | ... | " निशिगंध " | २७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | प्रेम कोणीही करीना | ... | गो. गो. अधिकारी | २९ |
| २४ | चुळबूळ | ... | द. वा. हर्णे | ३१ |
| २५ | बाबा गप्पीनाथ | ... | ,, | ३२ |
| २६ | नायडू सुंदरीस | ... | ,, | ३३ |
| २७ | निर्लज्जपणा | ... | ना. ग. काणे | ३४ |
| २८ | चावटपणा | ... | ,, | ३६ |
| २९ | शनिवारवाडा | ... | पंडित सप्रे | ३७ |
| ३० | दिव्याखालीं अंधार | ... | ,, | ३७ |
| ३१ | उपकार | ... | ,, | ३८ |
| ३२ | समाधान | ... | ,, | ३८ |
| ३३ | कैफियत | ... | 'सुलोचना' | ३९ |
| ३४ | तात्या पंतोजी | ... | द्वा. वि. प्रधान | ४१ |
| ३५ | मी कवयित्री | ... | चं. ग. दीक्षित | ४२ |
| ३६ | कणिका | ... | गोविंद झोकरकर | ४३ |
| ३७ | माझी दौलत | ... | ,, | ४४ |
| ३८ | 'कविता या रद्दी गडे' | ... | भोलेनाथ | ४५ |
| ३९ | शाळेच्या वाटेवर | ... | राजाराम सासवडकर | ४६ |
| ४० | कवीची विनवणी | ... | मोरेश्वर | ४७ |
| ४१ | कॉलेजांत एकटीच असलेली विद्यार्थिनी | ... | नंद तेलंग | ४८ |
| ४२ | बुवांच्या पूजेस | ... | दत्तात्रय कालगांवकर | ५० |
| ४३ | तूं आणि मी | ... | वा. भा. पाठक | ५१ |
| ४४ | संसाराची तऱ्हा | ... | 'दुर्गातनय' | ५१ |
| ४५ | कवीचा संसार | ... | राजा बढे | ५२ |
| ४६ | देणें थकल्यावर | ... | ,, | ५४ |
| ४७ | मारवाडवासिनी | ... | ,, | ५५ |
| ४८ | अतिपरिचयादवज्ञा | ... | कुमुदबांधव | ५६ |
| ४९ | माता— | ... | मा. ना. जोशी | ५७ |
| ५० | सज्ज करुनि— | ... | ,, | ५७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५१ | प्रेमवेड्याचीं विरामचिन्हें | ... | बकुलराय | ५८ |
| ५२ | प्रथमा ते संबोधन | ... | सं. रा. कर्णिक | ५९ |
| ५३ | प्रथमच सासरीं जाणाऱ्या बालिकेस | ... | शं. द. भोंसले | ६० |
| ५४ | तिनें त्याला परि पाहिलेंहि नाहीं | ... | अ. ह. जोशी | ६१ |
| ५५ | आम्ही कोण? | ... | सी. का. देव | ६२ |
| ५६ | लाडक्या लेखिकेस | ... | य. ना. मोघे | ६३ |
| ५७ | तुम्ही कोण? | ... | रा. द. ब्रम्हे | ६४ |
| ५८ | त्याचें काव्यप्रकाशन | ... | ,, | ६५ |
| ५९ | निंदा | ... | वि. ज. सहस्रबुद्धे | ६६ |
| ६० | छत्रीचे उपकार | ... | कै. श्री. कृ. कोल्हटकर | ६७ |
| ६१ | एक काव्यप्रकार | ... | केशवकुमार | ६९ |
| ६२ | बाल-कसाई | ... | शं. कृ. देवभक्त | ७१ |
| ६३ | डोहाळे | ... | कु. संजीवनी मराठे | ७३ |
| ६४ | हा अनाथ भाडेकरी | ... | मा. ना. जोशी | ७४ |
| ६५ | माझा उपास | ... | कु. मालती किर्लोस्कर | ७५ |
| ६६ | अर्थकिंकर | ... | नरेन् | ७६ |
| ६७ | वाग्विवीर | ... | ,, | ७६ |
| ६८ | द्वैपत्न्यरति | ... | ,, | ७७ |
| ६९ | शाहीर | ... | ज. के. उपाध्ये | ७७ |
| ७० | कविते! करिन तुला मी ठार— | ... | ,, | ७८ |
| ७१ | कुठें जासी? | ... | वासुदेवसुत कारेकर | ७९ |
| ७२ | देवाचिये द्वारीं | ... | गो. ल. आपटे | ८१ |
| ७३ | साभार परत | ... | ,, | ८१ |
| ७४ | भोळाशंकर | ... | कुमुदबांधव | ८२ |
| ७५ | रद्दींतील काव्यरत्न | ... | र. गो. सरदेसाई | ८३ |
| ७६ | बल्लवदूत | ... | ना. गं. लिमये | ८५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७७ | सुगृहिणी | ... | दत्तप्रसन्न कारखानीस | ९३ |
| ७८ | सेन्सॉर | ... | व. रा. वैद्य | ९५ |
| ७९ | गाजराची पुंगी | ... | बाबुलनाथ | ९७ |
| ८० | प्रबोधन | ... | पां. गो. लोहोकरे | ९८ |
| ८१ | भो, भो, भो ! | ... | पु. श्री. काळे | ९९ |
| ८२ | विलायतेच्या यात्रेची तयारी | ... | न. चिं. केळकर | १०१ |
| ८३ | कांहीं पानें | ... | ह. स. गोखले | १०९ |
| ८४ | खंड्या नापित | ... | मंगेशराव तेलंग | १११ |
| ८५ | मध्यान्हीची भूपाळी | ... | प्रो. के. ना. वाटवे | ११२ |
| ८६ | कवीचा दरारा | ... | रा. द. सूर्यवंशी | ११३ |
| ८७ | उपहासिनी | ... | ,, | ११४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# उपहासिनी

## अरे ! आला कवि—

— किर्लोस्कर—दिवाळी अंक

अरे ! आला कवी ! आतां धावा ! धावा ! पळा ! लपा ॥
पाठीराखे स्मरा ! किंवा रामरक्षा तरी जपा ॥
कुण्या जन्मांतलीं पापें होतीं देऊनिया दडी ॥
अचानक शिरीं आली नेमकी कविची उडी ॥

* * *

अरे ! धांवा ! पळा भाई ! वळला इकडेच तो ॥
भरली घटका आतां मढीं जीवंत गाडतो ॥

* * *

काय रे दिसतें हातीं ? अरे काव्य ! कवी ! कवी !
पा—णी— त—रि—कु—णि—पाजा, कविता दिसते नवी ॥

* * *

दोस्तांनो ! सहवासाचा झाला आनंद अंतरीं !
जगल्या वांचल्या आतां भेटूं कुठें कधीं तरी ॥

*　　　*　　　*

तूं कोण कवि शार्दूल ! कवि गोगलगाय वा !
कसाहि कोणीहि आम्हां कवि वंद्य जुना नवा ॥
परी केलें तुझें काय ? गेलों वाटेस कां कधीं ?
साडेसाती कशी आली ? कोंवळ्या यौवनामधीं ?

*　　　*　　　*

करता काय कंटाळा ? चोरांना हात दावितों !
समग्र हें महाकाव्य, मासिकांतुनि कोंबतों ॥
असें नाहीं तसें यांच्या मानगुटीस बैसुनी ॥
वाचावयास लावीन काव्य हें मासिकांतुनी ॥

---

# विहिणींचा कलकलाट !

— कै० गोविंदाग्रज

[ ओवी ]

वीरांच्या गर्जना थोर । घुबडांचा आवाज घोर ।
घायाळांचें रडणें अघोर । हेंही त्यांत घातलें ॥ १ ॥
रणवाद्यांचा दणदणाट । हत्यारांचा खणखणाट ।
विजयघंटांचा घणघणाट । एका जागीं मिळविले ॥ २ ॥
दारूकामाचा फडफडाट । घोड्यांचा खडखडाट ।
तोफांचा धडधडाट । यांची त्यांत भर केली ॥ ३ ॥
प्रळय मेघांचा गडगडाट । आणि विजांचा कडकडाट ।
भूमिभंगांचा तडतडाट । भरतीस हे घातले. ॥ ४ ॥

सागराचें खवळणें । दारू पिणाराचें बरळणें ।
आणि मुलांचें ओरडणें । शाळा सुटतां वेळचें ॥ ५ ॥
नाना वाजंत्रीं हीं सारीं । एक केलीं यत्नें तरी ।
त्या कलकलाटाची नये सरी। लग्नांत विहिणी करितात जो ॥ ६॥

---

# काय करावें ?

— कै० गोविंदाग्रज

[ आचरटपणापलीकडे या ओव्यांची फारशी किंमत नाहीं. ]

उन्हाळ्यासाठीं पाणी न ठेवून । नदी वेगें जातां पळून
भक्कम दगडांचें धरण बांधून । तिला अडवितां येतसे
अगदीं आपला नेम धरून । तोफ सुटतां धडधडून
हळूच बाजूला सरून । मारा चुकवितां येतसे
अंतराळीं कडकडून । वीज घरांवरि पडतां तुटून
उंच खांबांत बांधून । पाताळीं सोडितां येतसे
सावकारांनीं वैर धरून । जप्ती आणितां दावा करून
मागील बाकी देऊन । तिला उठवितां येतसे
अगदीं नीट रोंख धरून । म्हैस मार्गीं येतां धांवून
एकदम छत्री उघडून । तिला पळवितां येतसे
जुन्या-नव्याची चोरी करून । भिकार कवि येतां कविता घेऊन
कशीतरी एकदां वाचून । त्रास चुकवितां येतसे
सर्वांस उपाय येत दिसून । परी एका गोष्टीस आहे न्यून
तोंडाळ बायको कडकडून । येतां, काय करावें ?

## अध्यक्ष-पद

— कै० गो. रा. हिंगणेकर

दहा ठायां अध्यक्ष जो जहाला
गमे अध्यक्षचि सर्व तो जगाला
दिव्य दृष्टी लाभते दूरदर्शी
कोण बघतो मग जवळच्या प्रदेशीं ! १
उशीरानें तें डुलत डुलत येणें !
उशीरानें एकटें घरीं जाणें !
कधीं विषयाला नाहिं मुळीं तोटा !
विषय भाषेचा एक अल्प फांटा ! २
वाजि सोडावे रंगणीं अनेक
हात घंटेवरि नृत्य करी एक.
करी टीकेचा शेवटीं खरारा–
कार्य ऐसें निर्मिलें या उदारा ३
उंच जागीं राखिली मऊ खुर्ची
हार देई कल्पना थोरवीची—
माळिदादाच्या कुशल अंगुलीची
फुलांच्या वा समदर्शि साधुतेची ! ४
धन्य लोकीं अध्यक्ष जन्मती जे
शिरीं घ्याया आभारमात्र ओझें !
सभा येती कैक त्या तशा जाती !
साक्ष फोटो काढिले गृहीं देती !

# चतुर चोर

— कै० गो. रा. हिंगणेकर

लुटी करोनी दिवसा ढवळ्या अपरात्रींही कुठें
जमले "हिल"वरि या चोरटे
नाहीं कोणी घातपातकी, स्थळ देखुनि निर्मळ
केलें सांकेतिक कातळ !
कुणी प्रियेचे गुलाब अणिले चोरुनि मिरविति इथें
कुणाचे अश्रुपूर वाहते !
हृदय कुणाचें कुणी चोरिलें पहिलें चुंबन कुणी
लुटीचे वेगवेगळे धनी !
सृष्टिचोर तो कुणी यांतला चोरी पुष्पें-फलें
कुणी चौर्यास अशा त्रासले
कुणी धडाडी दावी भलती, आशावादी खरा
कुणाच्या नजरा त्या अस्थिरा !
वांटे करिती आनंदाचे, घ्यावा कोणी किती !
टाकुनी द्रव्याच्या ऐपती !
चोर असे शिरजोर तयांना बंधन घाली कशी
कविता रज्जू मम अल्पशी !

ग्रंथालय ... क्रमांक 99.7 ... ग्रंथ सं. ...

# शुद्धाद्वैत !

— न. चिं. केळकर

रे माझ्या छकुड्या, सुवर्णतुकड्या, प्रेमी गड्या सौंगड्या, ।
ये धावोनि असाच ये मजकडे चौखूर टाकी उड्या ॥
लोळें स्वर्गसुखीं जरी निशिदिनीं मी लूट वाटे करी ।
थोडेंसें चुकल्यापरीस गमतें कीं तूं न वांटेकरी ॥ १
आधीं आंथरुणावरोनि उठतें आठांनवाच्या पुढें ।
सांगे डॉक्टर कीं प्रभातहिम तें हो नाजुकां वावडें ॥
पेले मांडुनि बैसतें मग चहापानास मेजावरी ।
देतें बैसवुनी समोरच तुझ्या खुर्चीमधें मांजरी ॥ २
जातें पुस्तकसंग्रहालयिं तदा शोधीत कादंबऱ्या ।
ज्या लीलाप्रणयप्रकर्ष कथिती त्या भासताती बऱ्या ॥
वाटे वाण मला तुझीच परि कीं वाचून दावूं कुणा ।
माझ्या पादतलासमीप जरि तूं ध्यायासि ना लोळणा ॥ ३
जातां जात नसे तिपार म्हणुनी मी आडवी होउनी ।
पर्यंकीं भर तास दोन पडतें निद्रेसि आलिंगुनी ॥
माशामच्छर वारितां कर तुझा नाहीं म्हणोनी मला ।
ये ना झोंप तदा सुदीर्घ सखया मी आठवीतें तुला ॥ ४
होतां ऊन्ह कमी क्लबांत निघतें क्रीडार्थ मी जावया ।
माझा ओव्हरकोट बॅट नससी सांगाती तूं घ्यावया ॥
जोडीदार गडी नवा प्रतिदिनीं साजे तसा शोधितें ।
खाके घेउनि तत्करा कशितरी दांपत्य संपादितें ॥ ५
आहे उत्सव शारदीय पडतें रात्रीं कसें चांदणें ।
येताती वनभोजना मज नवीं सप्रेम आमंत्रणें ॥

होडींतूनि मला किती फिरविती कासारपृष्ठावरी ।
हातीं घेउनि कर्णसूत्र[1] वदनें मी वाजवी बांसरी ॥ ६
सप्ताहामधिं बॉल चार झडले श्रीमंत मित्रांघरीं ।
नाचोनी दमलें अतिश्रमभरें वाटे फुटे मी उरीं ॥
होतें मी तुज, परि तूं होसी असोनी वृथा ? ।
द्यावा हात परा नरा युवतिनें नाचांत आहे प्रथा ॥ ७
होता उत्तररात्र मी परतुनी खेदें घरीं येतसें ।
अर्धत्यक्त सुखोपभोग म्हणुनी लागे मनाला पिसें ॥
घेवोनि निजतें समीप कुतरा विश्वासु मोत्या गडी ।
होतां खूण चलाख घालित पहा छायेवरी जो उडी ॥ ८

—

## आम्ही कोण ?

— केशवकुमार

( केशवसुत, क्षमा करा )

'आम्ही कोण ? ' म्हणून काय पुसतां दांताड वेंगाडुनी ?
'फोटो, मासिक पुस्तकांत न तुम्ही कां आमुचा पाहिला ?
किंवा 'गुच्छ', 'तरंग', 'अंजलि' कसा अद्याप ना वाचिला
चाले ज्यावरतीं अखंड स्तुतिचा वर्षाव पत्रांतुनी ?
ते आम्ही –परवाङ्मयांतिल करूं चोरून भाषांतरें,
ते आम्ही–न कुणास देउं अगदीं याचा सुगावा परी !
डोळ्यांदेखत घालुनि दरवडा आम्ही कुबेरा घरीं !
त्यांचें वाग्धन वापरून लपवूं हीं आमुचीं लक्तरें !

१ सुकाणूंची दोरी.

काव्याची भरगच्च घेउनि सदा काखोटिला पोतडी
दाऊं गाउनि आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामधें,
दोस्तांचे घट बैसवून करुं या आम्ही तयांचा 'उदे'
दुष्मानावर एकजात तुटुनी कीं लोंबवूं चामडी !
आम्हांला वगळा गतप्रभ झणीं होतील साप्ताहिकें !
आम्हांला वगळा खलास सगळीं होतील ना मासिकें !

---

## करुणरस

— केशवकुमार

कुठें लिहिल्या कविता न पांच-सात
एकदांच्या छापिल्या मासिकांत
तोंच बोले, 'शाहीर जाहलों मी,
महाराष्ट्र हलवीन रोमरोमीं !'
पुढें सरली कंगाल काव्यकंथा
येरु बोले 'टीकाच लिहिन आतां ?
मस्त झालीं आहेत बडीं धेंडें !
एकएकांचीं फोडतोंच तोंडें !'
हातिं बाळाच्या लागतां कुऱ्हाड
जितें राहिल कां एक तरी झाड
तसें टीकेचें लागतांच वेड
मोठमोठ्यांचा काय पुढें पाड ?
'अमुक लेखक करतोच उसनवारी
तमुक लोळतसे बिछान्यांत भारी !

तमुक ओढतसे रोज विड्या फार
असे टीकेचे चालले प्रहार!
चार-चौघांची परी करुनि चोरी,
येरु सजवी लेखनाची शिदोरी
शिव्या द्यायाही शब्द ना स्वताचे,
कसें वर्णू दारिद्य्र मी तयाचें ?
असो; येरू जाहला सुप्रसिद्ध,
लेखनाची संपली त्यास हद्द !
म्हणे 'आतां होईन पत्रकार
देशभक्तीच्या आखाड्यांत वीर !'
येरु घेई बगलेंत जाड ग्रंथ
आणि सुतक्यासम जाइ मार्गि संथ
धुवट बगळ्यासम दिसे वरुनि शांत,
कोण जाणे परि अंदरकी बात ?
मोठमोठ्यांच्या बसुनि कच्छपांत
बने मुत्सद्दी चार आठवड्यांत
लिहूं लागे गंभीर 'लेखमाला',
'तीन खंडीं' जाहला 'बोलबाला' !
'जाहिराती', 'संस्कार', 'वृत्त', 'पोंचा'—
हातखंडा लिहिण्यांत होय त्याचा
'स्फुटा'वरतीं जों टाकणार हात—
तोंच मागुनि दुर्दैव हाणि लाथ !
'जहालांचा भुरकाच तिखट-जाळ',
येरु बोले, 'मज नको कधीं काळ !'
'मवाळांचा आळणी दूधभात,

बरा आतां बैसेन ओरपीत !'
येरु संन्यासी होइ ( करुनि क्षौर )
बांधि आश्रम रानांत कुठें दूर !
भोंवतालीं जमवुनी चार शिष्ट,
काळ घालवितो " काव्यविनोदांत "
" मनीं आलें तें होइ सर्व पूर्ण "
हेंच येरूला एक समाधान
शांत होई अजुनी न चित्त हाय !
परी धंदा उरला न ! करूं काय?

× × ×

देवा, तो विश्वसंसार राहूं द्या राहिला तरी,
परी कारुण्यमूर्तींला द्याच या मोक्ष लौकरी !

---

## एक प्रासंगिक

— डॉ. श्री. व्यं. केतकर

मातृक्लेश न मुक्त होउनि जशी बी. ए.कडे धावसी
आय्. सी. एस्. तुजला निदान सुभगे बॅरिस्टरा लाभसी
आशा ऐशि मनीं पिता उपजवी तीतें स्वचित्तीं धरी
नाकारी तरुणी स्वतुल्य तरुणा मानी कमी अंतरीं ॥ १ ॥
आशा वागतसे मनीं तरुणिच्या भावी सुखाची नवी
चित्रें काढितसे, तिला न कळतो बाजार कैसा असे
वाटे शिक्षण उच्च पाहुनि घरीं चालून येती वर
अभ्यासा त्यजुनी विवाह करिती बाला तयां दोष दे ॥ २ ॥

९१ अमान्य क्र. १११/३०

होई स्फोट हवेंत जे तरुणिनें किल्ले नवे बांधिले
त्यांचा, आणि कठोर हो मनिं तिच्या कालांतरें जागृती
लग्नाचें जुळतें न पाहुनि तदा धुंदी कमी होतसे
आतां लग्न कसें तरी मम घडो, चित्तीं तिच्या येतसे ॥ ३ ॥
होऊनी विमनस्क काय करणें गेहीं बसोनी तरी
ऐसें वाटुनिया सुशिक्ष सुभगा लागे करूं नोकरी
चिंताक्रांतमना विवाह दुसरे पाहूनि हो घाबरी
कंटाळोनि पुढें 'प्रपोज' करि त्या कोणासही पत्करी ! ॥ ४ ॥

---

## बाई, प्रतिसहकारिते —'चाबूकस्वार'—दिवाळी अंक

---

गासी ऽ व्यर्थचि तूं बाष्कळे ॥ ध्रु० ॥
पडुनि अवर्षण भूमि करपली । ग्रीष्म-उग्रता-वसांतिं आली ।
दिवाणगिरिची पेटे होळी । छायेमाजी जीव तळमळे ॥ १ ॥
वृक्षगण पहा सारा सुकला । झाला पालविचा पाचोळा ।
स्मशान भासे, नव्हे हा मळा । मेला जगला जीवाहि नकळे ॥ २ ॥
आम्रमंजिरी क्वचितचि उरली । उरली ती ही काळी पडली ।
रुक्ष टरफलें तोंडीं बनलीं । आंसव लव तुज केविं मिळे ॥ ३ ॥
स्वभावधर्में जरि तूं गासी । तरि कौतुक तव काय जगासीं ?
आत्मनिष्ठ मधुरता तयासी । गर्व वाहसी फुकट खुळे ॥ ४ ॥
जा सोडुनि हा निष्फळ चाळा । धुंडुनि काढी अपुल्या बाळा ।
पाज, लावि त्या कांहिं जिव्हाळा । मातृपद तरी सहज फळे ॥ ५ ॥
स्वाभिमान हो श्रेष्ठ गुण खरा । रुचि न त्याविना परोपकारा ।
परपिंडानें पुष्ट नच बरा । देह, हें न तुज अजुनि आकळे ॥ ६ ॥

# वृद्ध भट

— माधव ज्यूलियन

कां अुठतां ? थोडें बसा रसिक मण्डळी;
ही त्वरा काय कामाची ? स्वस्थता योग्य या स्थळीं.
सङ्कोच भोजनीं गोड परी थोडका;
होअूं द्या स्वस्थ रे ! कोणी अुठवूंच नये झोड का ?
मज बाकी आग्रह नको, अहो वृद्ध मी,
पक्वान्नें पचवायाची परि शक्ति न झाली कमी.
जीवन्त पहा पोटाग रसग्राहिणी,
किती करी पराक्रम मागेंही तारुण्याच्या दिनीं !
बदलली सृष्टि, अुलटलें दैव आमुचें,
अुलथली प्रयोजनशाही, ही क्रान्ति कुणाला रुचे ?
मी चिवटच पिकलें पान याचनाद्रुमीं,
कां सोडुनि भरलीं पानें अुठतसां, तरुण ना तुम्ही ?
मावळते तारे तुम्ही सकाळीं पहा,
मन्दिरांतील तेजस्वी मी घृतनन्दादीप हा !
पाश्चात्यपाठ पढणारे पोपट खरे
जे निरशनमहिमा गाती, दुष्काळ मागती करें.
श्लोकोत्तर हरहर महादेव ! होअूं द्या
मी पङ्क्तिभेट द्यायाला नच चुकावयाचा अुद्यां.
स्थूलता दिसे मजमधें जरी सम्प्रती,
करण्यांत गनीमी कावा हे पाय न लव कम्पती.
ते गृहस्थ जणुं ओखटें घरिंच जेविती,
स्थळ रुचे मला भट जेथें रस पैजेनें सेविती.

आपुली अन्नपूर्णाच देवता मुळीं,
मुखशूर सद्भटांच्या ती पेटूं न दे घरीं चुली.
भूदेव पुरे जेवनों तरि न भागतों,
जेवूनि पुन्हा जेवाया दाक्षिण्यास्तव लागतों
जाहलें अेकचित हें अुठा कीं तुम्ही !
जरि पडति कष्ट उठतांना तरि धरी मनिं न किन्तु मी.

---

## चालचलाऊ भगवद्गीता

— ज. के. उपाध्ये

पार्थ म्हणे गा हृषीकेशी। या युद्धाची ऐशी तैशी
बेहत्तर आहे मेलों उपाशी। पण लढणार नाहीं !
घोंड्यांत जावो ही लढाई। आपल्या बाच्यानें होणार नाहीं
समोर सारेच बेटे जावाई। बाप, दादे, काके.
काखे झोळी, हातीं भोपळा। भीक मागून खाईन आपला
पण हा वाह्यातपणा कुठला। आपसांत लठ्ठालठ्ठी.
या बेट्यांना नाहीं उद्योग। जमले सारे सोळभोग
लेकांनो ! होऊनिया रोग। मराना कां !
लढाई का असते सोपी ?। मारे चालते कापाकापी
कित्येक लेकाचे संतापी। मुंडकींहि छाटती
मग बायका बोंबलती घरीं। डोई बोडून करिती खापरी
चाल चाल कृष्णा ! माघारीं। सोड पिच्छा युद्धाचा.

अरे, आपण मेल्यावर । घरच्या करतील परद्वार
माजेल सारा वर्णसंकर । आहेस कोठें बाबा !
कृष्ण म्हणे रे अर्जुना ! । हा कोठला बे ! बायलेपणा ?
पहिल्यानें तर टणटणा । उडत होतास लढाया.
मारे रथावरी बैसला । शंखध्वनि काय केला !
मग आतांच कोठें गेला । जोर तुझा मघांचा ?
तूं बेट्या ! मुळचाच ढिला । पूर्वींपासून जाणतों तुला;
परि आतां तुझ्या बापाला । सोडणार नाहीं बच्चमूजी !
अहाहारे ! भागूबाई ! । म्हणे मी लढणार नाहीं;
बांगड्या भरा कीं रडूबाई । आणि बसा दळत !
कशास जमविले आपुले बाप ? । नसता बिचाऱ्यांसि दिला ताप;
घरीं डारडुर झोंप । घेत पडले असते !
नव्हतें पाहिलें मैदान । तोंवर उगाच करी टुणटुण;
म्हणे यँव करीन त्यँव करीन । आतांच जिरली कशानें ?
अरे तूं क्षत्रिय कीं घेड ? । आहे कीं विकिली कुळाची चाड ?
लेका भीक मागावयाचें वेड । टाळक्यांत शिरलें कोठुनी ?
अर्जुन म्हणे 'गा' हरी ! । आतां कटकट पुरे करीं;
दहादां सांगितलें तरी । हेका का तुझा असला ?
आपण कांहीं लढत नाहीं । पाप कोण शिरीं घेई !
ढिला म्हण कीं भागूबाई । दे नांव वाटेल तें.
ऐसे बोलोनि अर्जुन । दूर फेकूनी धनुष्य-बाण,
खेटरावाणी तोंड करून । मटकन् खालीं बैसला !

इति श्रीचालचलाऊ गीतायां प्रथमोऽध्यायः ।

# फसल्यें बाई !

—प्रो. वा. गो. मायदेव

(चाल—भक्ति ग देणी.)

फसल्यें बाई ! सुख कपाळिं माझ्या नाहीं !
लग्नापासुनि साराखि कटकट
'प्रिये, सुंदरी' अशि ही वटवट
अशि कां कोठें असते तरी रित
लाजच नाहीं। सुख कपाळिं माझ्या नाहीं !
सदान्‌कदाचीं लिहिती गाणीं
तींच तींच मज दाविति वाचुनि
आलें काव्य तुझ्या कां ध्यानीं ?
पुसती बाई। सुख कपाळिं माझ्या नाहीं !
आणा खोप्यासाठीं गजरा
म्हणतां खोउनि एक मोगरा
उभी राहविति तिष्ठत मजला
लिहितच कांहीं। सुख कपाळिं माझ्या नाहीं !
अपरात्रीं ही दिवा ढणढणा
कण्हती घेती बेसुर ताना
असा उजगरा काशि ती येना
झोंपच बाई। सुख कपाळिं माझ्या नाहीं !
रोज रोज हे गाणीं म्हणण्या
सांगुनि जाती आजि मी येना
आतुर यांच्या कोण गायना
न कळे कांहीं। सुख कपाळिं माझ्या नाहीं !

# वृद्ध भटजी !

— गिरीश

[ ही कविता म्हणजे श्री० माधव ज्यूलियन्‌च्या 'वृद्ध भट' या कवितेचें विडंबन आहे. ]

[ जाति–पळीपंचपात्री ]

कां उठतां, खालीं बसा तरुण मण्डळी। तरुण मण्डळी
उपचार ठेवितां कां हा, समताच योग्य या स्थळीं
आमंत्रणिं आदर दिसे, न हो थोडका। न हा थोडका
पान्थस्थपणाहुन नाहीं अभिरुची यांत थोर कां ?
भोजनांत आग्रह नको अहो वृद्ध मी। अहो वृद्ध मी
नव पक्वान्नें खायाची जरि हौस न झाली कमी
जठरिंची स्फुर्ति झोंपली क्षुधानन्दिनी। क्षुधानन्दिनी
जाहले पराक्रम मागें किति थोर आमुच्या दिनीं
बदलली सृष्टि संपले दिवस आमुचे। दिवस आमुचे
नवनवीं किती पक्वान्नें ! पूर्वींचें न कोणा रुचे
मी झालों पिकलें पान आणखी तुम्ही। आणखी तुम्ही
खम्बीर वीर खाणारे; दाखवा जरा रुस्तुमी
भिक्षूक उद्यांचे तुम्ही क्षेत्रिचे खरे। क्षेत्रिचे खरे
गा क्रान्तीचीं नव गाणीं घोषवा शब्द 'हर्हरे!'
मज तुमचें भोजनगीत आज ऐकुं द्या। आज ऐकुं द्या
नसणार कदाचित् येथें मी मिष्ट भोजना उद्यां
राहोत पुराणे लोक घरीं स्थिरमति। घरीं स्थिरमती
स्थळ रुचे मला तें जेथें उठतात नित्य पङ्गती
ही जडता जडुं पाहते जेवतां अती। जेवतां अती

वर्धिष्णू यौवन लाभे पुनरपी तुम्हा सङ्गती
माउली अन्नपूर्णाच थोर आपुली । थोर आपुली
अन् बाळें आपण सारीं सोनुलीं तिचीं सानुलीं
जेवणें झोडलीं; पुरा भागलों अतां । भागलों अतां
लागते वामकुक्षी ही आग्रहें फार जेवतां
परि नीज यावया श्लोक मधुर गा जरा । मधुर गा जरा
अन् मुखरस वाहुन जातां, वाटेल लाज निर्झरा !

---

## फेरीवाला —

— अज्ञातवासी

फेऱ्या दारावरी
कवी हा ! घाली वरचेवरी ॥ ध्रु० ॥
प्रभातकाळीं, संध्याकाळीं
भर दिवसा वा वेळिं अवेळीं
बघा कधींही उघडुन जाळी
दिसतो सडकेवरी ॥ १ ॥

पलीकडे वटवृक्षाखालीं
भरती ह्याच्या रोज मैफली
पारंबीची सुकटी जाळी
धरुन उभा तो करीं ॥ २ ॥

तरुण मुली ! तूं त्या खिडकींतुनि
बघूं नको खालीं वाकोनी
गोविल तुजला मोहक वचनीं
सहजहि दिसशिल जरी ॥ ३ ॥

कितिकजणांनीं ह्याच गांवच्या
कविता जाळियल्या जरि याच्या
परि न थांबते ह्याची वाचा
ढंगाहि नाना करी ॥ ४ ॥

विशाल त्याची प्रतिभा दिसते
थंडींतहि नच कधिं कुडकुडते
उन्हांतही ती मुळिं न करपते
भरित सदा तरतरी ॥ ५ ॥

नदीपलिकडे—केव्हां जातो
सुरक्षितच पण परतुन येतो
केव्हां हंसतो, केव्हां रडतो
कुणि न कसा ह्या धरी ॥ ६ ॥

# ‘बेगमच्या विरहगीता*’ला शिवाजीचें उत्तर

— अनंत काणेकर

( गज़ल )

मज पाहुनी तुवां गे । लिहिलेंस बेगमे, तें ।
अडखळत वाचुनीयां । आनंद होइ मातें ।
तें ‘नाथ’ आणि ‘स्वामी’ । मज सर्व कांहीं उमजे ।
इश्की, दमिश्कि, दिल्नूर । कांहींच गे, न समजे !
जरि या मराठमोळ्या । शिवबास बोध व्हावा, ।
तरि फारशी-मराठी । मज कोष पाठवावा. ।

---

# प्रेम आणि पतन

— अनंत काणेकर

कुठल्याशा जागीं देख ।
बिल्डिंग मोडकी एक । पसरली
चाळींत अशा वसणारी ।
पोरगी कुणिशी होती । छबकडी !
जातांना नटुनी, थटुनी ।
कुणि तरुण पाहि ती तरुणी । एकदां

---

*‘बेगमचें विरहगीत’—माधव ज्यूलियन्—शलाका, पान १३.

त्या क्षणीं,
त्याचिया मनीं
तरंगति झणीं,
गोड तरि जहरी। प्रीतीच्या नवथर लहरी। न कळतां
तो ठसा मनावर ठसला।
तो घाव जिव्हारीं बसला। त्याचिया
वेड पुरें लावी त्याला।
चाळींतिल चंचल बाला। बापड्या !
अकलेचा बंधहि सुटला।
संबंध जगाशीं तुटला। त्यापुढें
आशाहि
कोणती कांहीं,
राहिली नाहीं;
सारखा जाळी। ध्यास त्यास तिन्ही काळीं। एक तो
ही त्याची स्थिति पाहुनियां।
चाळींतिल सारी दुनिया। बडबडे
इष्काचा जहरी प्याला।
नशिबाला ज्याच्या आला। हा असा,
धडपडत चाळितुनि फिरणें।
तें त्याचें होतें जगणें। सारखें !
लोकांना न कळत बवणें।
पिउनिया चहाला जगणें। गरमशा
पटत ना
त्याचिया मना
जगीं जगपणा

डाव तो टाकी। मनुजांतुनि दगडाचि बाकी। राहतो
यापरी तपश्चर्या ती।
किती झाली, न तिला गणती। राहिली
सांगती हिताच्या गोष्टी।
हातांत घेउनी काठी। लोक त्या
तो हंसे जरा उपहासें।
मग सर्वेच वदला त्रासें। चिडुनिया
'निष्प्रेम चिरंजीवन तें।
जगिं दगडालाही मिळतें। धिक् तया!
क्षण एक पुरे प्रेमाचा।
वर्षाव पडो काव्यांचा। मजवरी!'
निग्रहें
वदुनि शब्द हे,
अधिक आग्रहें,
सोडि ना चाळे। चाळीचे चढला माळे। तरुण तो
पोरगी आलि मग तेथ।
जोड्यांना धरुनि करांत। फाटक्या
धांवली उताविळ होत।
जोडा झणिं थोबाडांत। मारिला!
तिरमिरुनी खालीं पडला।
परि पडतां पडतां हंसला। एकदां!
तो योग,
खरा हटयोग,
प्रीतीचा रोग,
लागला ज्याला। लागतें पडावें त्याला। हें असें!

# लग्नघरांतील स्वयंपाकिणीचें गाणें

अनंत काणेकर

कुणि नाहीं ग कुणि नाहीं
आम्हांला पाहत नाहीं
झोंपे मंडळि चोहिंकडे
या ग आतां पुढें पुढें
थबकत थबकत
'हूं' 'चूं' न करत
चोरुं गडे, थोडें कांहीं
कोणीही पाहत नाहीं १

या वरच्या माळ्यावरती
धान्याचीं भरलीं पोतीं
जाउं तिथें निर्भय चित्तीं
मारुं पसे वरच्यावरती
उडवुनि जर इकडे तिकडे
दाणे-गोटे द्याल गडे
किंवा चोरुनि घेतांना
वाजवाल जर भांड्यांना
जागी होउन
मग यजमानिण
फसेल सगळा बेत बरें !
चळूं नका देऊं नजरे २

एकादी अपुल्यामधुनी
या धंद्यांत नवी म्हणुनी

लज्जामूढा भीरुच ती
शंकित जर झाली चित्तीं
    तर समजाउनि
    अथवा भिववुनि
धीट तिला बनवा बाई
करूं नका उगिचच घाई ३

आशा ज्या वस्तुचि चित्तीं
तीच हळुच उचला वरती
डब्यांत जर थोडें असलें
घेउं नका बाई, सगळे;
    मिळे म्हणोनी
    उगाच लुटुनी
यजमानिण जरी ती बाला
करूं नका शंकित तिजला ४

जपून असले खेळ करूं
ओटिंत जिन्नस खूप भरूं
लागतां न कोणा वास
'हाय' म्हणुनि सोडूं श्वास
    प्रभातकाळीं
    नामनिराळीं
होउनिया आपण राहूं
लोकांच्या मौजा पाहूं ! ५

## मातृपदावर —

— दि. वि. देव

मज विफल गमे ग जीवित माझें सखे
सुख नसे घरीं दुःख सदा उरीं नीरस जीवन फुकें ॥ ध्रु० ॥

ही चिमणा-चिमणी प्रेमें क्रीडा करी
हा वानर फिरतो घेउनि निज वानरी
ही लतिका मिरवे सुंदरशा तरुवरी
मज हिणविति त्यांचीं प्रेमळ हीं कौतुकें ॥ १ ॥

ही मंडई जैशी भरली माझ्या घरीं
या गोंगाटानें तिडीक भरते शिरीं
प्रणयाची गेली भंगुनि नव बांसरी
पति गृहीं ठरेना जातो भटकत कुठें ॥ २ ॥

मी कुणा कुणा ग कुंची-झबलें शिवूं
मी कुणा कुणा ग निजवूं घालूं जिवूं
मी कुणा कुणा ग दाखवुं काऊ चिऊ
हो निरयदुःखही जंजाळीं या फिकें ॥ ३ ॥

कुणि उपाय सांगा संततिच्या नियमना
प्रिय अधिकच होइन कैसी त्यांच्या मना
कधिं चिरंजीवता येइल संमीलना ?
मी वांझोटी जरि होतें बरवी सुखें ॥ ४ ॥

# उंच झालों तर!

— दि. वि. देव

( एका खुज्या तरुणाचे विचार )

ब्रह्मचाऱ्याच मनांत येउनि जरी मी उंच झालों अजी
स्पर्धेनें मशिं वागतील अवघे हे ताड, या नारळी!
तेव्हां देईन फेंकुनि मम शिडी, होतील द्वारें खुजीं
होई स्वर्गचि ठेंगणा मज, निदानीं हें घराचें अढें!
कोठेंही चुकल्यास गर्दित तुला तेव्हांच मी सांपडे
जैसे सर्व वनस्पतींत कळकीबेटास दृष्टी जडे
किंवा मी भरधाव जात असतां या पायगाडीवरी
तूं मार्गीं मज भेटतां जिवलगा राहिन् उभा भूवरी.
झाली भव्य पांटगणीं जर कुठें जाहीर मोठी सभा
बत्ती लावुनि देशकार्य करण्या मी नित्य आहे उभा!
मागें नम्रपणेंच राहिन जरी सारे पुढें ठाकले
आहे कोण कुठें दिसे मज वरी केल्याविना पाउलें
दैवानें जर उंच होइन असा जाऊनि गिड्डपणा
सांगूं काय तुला मनांतिल सख्या जी गोडशी कल्पना
जेव्हां येइल सांगुनी नव वधू लग्ना उभा राहिन
भटूजीलाहि जुमानतां न वरुनी मी लाडकी न्हाळिन
'देवा मृत्यु नको' असें विनवितों उच्चत्व-लोभामुळें
'देवा जीव नको' असें विनवितों होणें जरी ठेंगणें!

ग्रंथालय

# कवींच्या पानास—

—दि. वि. देव

*[ कै० गोविंदाग्रजांच्या खिडकीसमोर सृष्टीनें ' हालतें पिंपळपान ' ठेविलें होतें. 'विहार' वगैरे साप्ताहिकांतून कवितेसाठीं 'कवींचें पान' राखून ठेवण्यांत येऊन कवींना पालवण्याची युक्ति योजण्यांत आली आहे. तथापि रसिक त्याचा कसा उपयोग करतात हें खालीं दाखविलें आहे. ]

सोवळ्या एकट्या चिमण्या कविच्या पाना
तुज बघुनी वाचक सोडि हाय! शिवता ना ॥ ध्रु० ॥

तुजभवतीं जी ही सृष्टि असे पानांची
कल्पना असे कां तिला तुझ्या जाचाची ?
रस एकच चिंध्या-कचऱ्यामधुनी वाहे
मग दुजाभाव कां रसिकां अंगीं राहे ?

किति निघति मासिकें भूवरी
त्यांतुनि येत कविता रे कितितरी
परि कधीं तया नच कोणी क्षण धरी

जाणीव तुम्हां तरि परस्परांची कां रे ?
कां व्यर्थ जोडुनी घेतां अपुले भारे ?
किति सुंदर माहिरपि या पानांच्या भंवतीं
किति वेषभूषणें वेलपत्तिचीं वरतीं

कुणि तुला सजवुनी करिती पहिलें पान
त्यावरी बैसण्या कविकुळ हो हैराण

समइच्या खालिं अंधार होतसे
मखरांत[1] बसे मार्जार धीटसे
हरि गुहेंत गोष्टी कोल्हा[2] कथितसे
म्हणुनि कां रसिक नच देइ आपुलें ध्यान
मानूनि तुला वा जाहिरातिचें पान
तव भाळिं अक्षरें लिहिलीं तीं पुसती ना
मग शोक वृथा कां सुज्ञा कविच्या पाना
तर करीं कपाळीं पडेल जें जें काव्य
तें तेंच गड्या ना असे तुझें भवितव्य !
किति विटंबनाचीं ओझीं वाहसी
रांगतीं खेळतीं काव्य पाळिशी
अश्रूंचे ओढे नाले वाहसी
कविलिखित संपुनी कोरीं होतिल पानें
तेधवां रसिक तुज धरितिल बहु प्रेमानें

# माझें काव्यगायन

— निशिगंध

[ फर्ग्युसन कॉलेज त्रैमासिकावरून ]

अजुनि आठवे मजला ती स्पष्टपणें वेळ
करित काव्यगायन पहिलें–होत अखेरील ॥ ध्रु० ॥
उभा राहतां मज कोणी 'नांव ध्या' म्हणालें
सहज आणखी तें 'सरला' ! नाम मुखीं आलें
सभास्थान सर्व हंशानें दुमदुमून गेलें
याहुनी सुरेख सलामी कोणती असेल ! ॥ १ ॥

१ हे कवितेच्या भोंवतीं घातलेले सचित्र ठसे होत.
२ या महिरपीमधील कविता समजाव्यात.

लागलों म्हणाया कविता धीर परि धरून
'रुष्ट सुंदरी' हा होता विषय काव्यपूर्ण
सुंदरीसवें श्रोतेही जात ते रुसून
काव्य याहुनी परिणामी दुजें कां मिळेल ! ॥ २ ॥
अभिप्राय येत किती तें अनाहून तेव्हां
'पुरे' म्हणे कोणी, कोणी म्हणतसे 'वहावा'
नवल काय कांहींकांनीं तालही धरावा
दाविती कितीक पसंती काढुनिया हेल ॥ ३ ॥
हळुच कोट अध्यक्षांनीं ओढिला धरून
हळुच कांहिं गोलाकृति तें येतसे वरून
हळुच कुणी घाली छत्री पावलांमधून
विविध होति वीररसाचे यापरीस खेळ ॥ ४ ॥
करित मी मनामधिं तेव्हां पोक्तसा विचार
शीर हें सलामत तर तीं गायनें हजार
नसे काय विपुला पृथ्वी, कालही अपार
कुणीतरी सहधर्मा तो कधींतरि मिळेल ॥ ५ ॥
म्हणूनियां आलों तेव्हां परतुनी गृहाला
काव्य ऐकवीलें तें सहधर्मचारिणीला
गानलुब्ध तीही होई, झोंप ये तियेला
काव्यरसिक तिजसम कोणी जगामधिं नसेल ॥ ६ ॥
अजूनीहि करितों कविता, तें न सुटायाचें,
दावितों म्हणून तिला त्या, तें न चुकायाचें;
किती मौज त्यांत, तुम्हांला तें न कळायाचें
करूनिया प्रयोग पहावा शक्य जरि असेल ! ॥ ७ ॥

ग्रंथ नं. ??

# प्रेम कोणीही करी ना (?) —श्री: गो. अधिकारी

[ कवि 'माधव ज्यूलियन' यांचा एक गझल नुक्ताच ग्रामोफोन कंपनीनें रेकार्ड करून घेतला आहे. त्या गझलची एक ओळ म्हणजे खालील गझलची पहिलीच ओळ होय. ]

[ चाल—गझल ]

प्रेम कोणीही करी ना कां अशी फिर्याद खोटी
एवढी झालीस केव्हां पोर तूं मिष्कील मोठी ?
निर्‌निराळ्या 'पोज'चे फोटो उशाशीं ठेवुनी मी
रोज झोपे हा बिचारा नांव तूझें घेउनी मी
रामकृष्णांना सुखानें दाखवूनी टोपली अन्
मांडुनी तसूबीर तूझी नित्य पूजा गुंफली मीं—
काय हें प्रेमाविणें अन् कां अशी फिर्याद खोटी ?
एवढी झालीस केव्हां पोर तूं मिष्कील मोठी ?
लाडक्या बाले, तुझ्या लागूनि गोडी संगतीची
सोडला अभ्यास सारा, सोडली पर्वा जगाची
वाहिलीं काव्यें पदीं मी गज्जलांच्या अंजलीनें
'काव्य आत्मा हा खुळा' निंदीयलें मातें जगानें—
सोसलीं तीं दूषणें अन् कां अशी फिर्याद खोटी ?
एवढी झालीस केव्हां पोर तूं मिष्कील मोठी ?
नित्य नेमें घेउनी हातांत भारा पुस्तकांचा
चाललों मागून तूझ्या जेवि रामा मुंबईचा
वायु सोसाट्यानि लफ्फेबाज तुझ्या अंचळानें
गाल माझे लाल झाले सोसलें तें मीं मजेनें

काय मीं फिर्याद केली कां तुझी फिर्याद खोटी ?
एवढी झालीस केव्हां पोर तूं मिष्कील मोठी ?
आणि बाबांनीं नये पाहूं मला तूला म्हणोनी
घेतली भांडूनि खोली एक बाजूला बघोनी
तूं दिलेला प्यायलों उष्टा चहा कित्येक वेळीं
चोळिलें मेंथॉल तूझ्या कैक वेळां मीं कपाळीं—
काय हें प्रेमाविणें अन् कां अशी फिर्याद खोटी ?
एवढी झालीस केव्हां पोर तूं मिष्कील मोठी ?
नाटकें नाना तऱ्हेचीं दाविलीं पैसे भरोनी
अन् दिलीं बक्षीस तूंतें पातळें नामी जपानी
चप्पलानें घात केला एकदां रस्त्यांत तूझा
घेतलीं काखेंत तीं मीं मान राखावा म्हणोनी—
काय तें प्रेमाविणें अन् कां अशी फिर्याद खोटी ?
एवढी झालीस केव्हां पोर तूं मिष्कील मोठी ?

---

# चुळबूळ

— द. बा. हर्णे, बी. ए.

[ यशवन्तांच्या 'कुरकूर' नामक कवितेचें विडम्बन. एका सिनेमा-नटीच्या पतीचे विचार पुढें चित्रित केले आहेत. ]

'ती' हवीच माझी मला
असे परि भंवतिं सदा गलबला
नटवर्ग तिच्या सङ्गतीं
जणुं मधुप फुलांभोंवतीं !
हांसणें खिदळणें किती—
तयाचा ओघ न कधिं आटला !

हीं कितीक बोलावणीं
डायरेक्टर करितो 'गुणी' !
परि विचार न करी कुणी
किती हा नाजुक जिव भागला !
ती सौंदर्याची खणी
खुलतसे फिल्म-कोन्दणीं
म्हणुनीच हिची रावणी
कराया जो तो सरसावला !
हें रूप असे आगळें !
मज हेंहि न कां हो कळे ?
परि इतरां मिळतीं फुलें
असोनी दारीं तरु बहरला !
शूटिंग, फिल्म, गायन,
नट, अभिनय अन् नर्तन !
संभाषण ना याविण !
कळेना काय करावें हिला ?
तो खुशाल 'हीरो' हिशीं
करि लगट पहा हो कशी !
मग बोलायाला मशीं
क्षणहि तिज वेळ कुठें राहिला ?
"ही हीरोची नोवरी"
"किति युगल खुले हें तरी !"
बहु कण्ड्या वाऱ्यावरी !
शिरीं मम धोण्डा जणुं घातला !!

# बाबा गप्पीनाथ

— द. वा. हर्णे, बी. ए.

[ जाति–सच्चिदानंद ]

चारू आश्रमीं महान, हा ऋषी रहातसे
ध्यान नेहमीं निमग्न, तत्सदाशिवीं[1] वसे ॥ ध्रु० ॥
हा बटू लहानसा
शोभतो अहा ! कसा ! !
मृच्छकटिक[2]-आननीं, सुरेख चाळिशी दिसे !
हरितवर्ण दुर्वांकुर
आवडे तयास फार
खात अन् जपानची कणीक[3] नेहमीं असे !
अवतरे उमेश-शिष्य
( जाहला पुनीत पुण्य )
चोरुनी गुरुप्रसाद मार्मिकास देतसे !
नियतकालिकीं सदा
स्वल्लिखाण-बोगदा
मडमडायिता अनेन कीं सरस्वती असे !
बालकें तुझ्यावरी
भाळतीं घरोघरीं
नांव हें त्वदीय सार्थ म्हणुनिया मला दिसे !

---

१ सदाशिव—शंकर किंवा पुण्यांतील सदाशिव पेठ.

२ मृच्छकटिक—मूछकट् फॅशन.

३ कणीक—" कणिका " हा पांच पंक्तींचा एक नवीन काव्यप्रकार रूढ झाला आहे.

काव्यचंचु तूं खरा
अखिल रसिक-मर्मरा
बदबदेल कीर्तिचें त्वदीय डोलकें ऋषे !
वृषभ शंख कावळा,
याविना न वेगळा
कथावया कथा मुलांस विषय बा तुला दिसे !
मत्कुणस्य[४] पत्तने
राहशी सुखें मुने !
लोककारणीं सदैव देह हा तुझा असे !

---

## नायडू सुन्दरीस—

— द. वा. हर्णे

(छंद–ओवी)

शाळेतील पाण्डुरक्या, भिन्तीवर शोभे फळा
तैसा शुभ्र वसनांत, खुले तुझा तोण्डवळा !
केशकलापाचा गोड, मागें आन्दुळे शेपटा !
गिण्डोळ्याशीं स्पर्धा करी, रक्त अग्वळाची छटा !
ताज्या झेण्डूंच्या फुलांची, खुले केसांत आवळ,
वास काय घुमतसे ! तयांचा ग ! भंवतालीं !!

---

४ मत्कुणस्य पत्तने—अर्थात् पुणें शहर !
डांस, चिलटं, ढेकूण वगैरेसाठीं पुणें शहर प्रसिद्ध आहेच. याला सबळ पुरावा पुणें शहरच्या असंख्य रोगांवरील रामबाण औषधांच्या जाहिरातींनीं चितारलेल्या भिंती देऊं शकतील.

शालीनता सांठविली, तुझ्या टपोऱ्या डोळ्यांत,
तम्बोरीच्या आकाराचें, नाक भूषण तें वक्र!
पातळशा वस्त्रांतून, शोभे तुझी अंगकान्ती!
धोतरानें आच्छादिली, शिळा जैसी नदीकांठीं।
काय स्वरुपाचें तेज, झळाळतें चोंहीकडे!
कोण्या मञ्जराची छाती, बघायाची तुझ्याकडे !!
अवसेच्या शर्वरीची, जणूं छबी मूर्तीमन्त!
ऐशा रूपसम्राज्ञीची, कोण गाईल ना कीर्त?
कुणी वानो, कुणी निन्दो, दोष देवा तुझ्या माथीं!
पवित्र तूं मजलागीं, जैसी गङ्गा-भागीरथी

---

## निर्लज्जपणा—!

—ना. ग. काणे

[ श्री. 'केशवकुमार' यांचा 'बीभत्सरस' वाचून उठलेले विचारतरंग त्यांसच अर्पण करीत आहे! नक्कल करतांना अस्सलाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्यामुळें केशवकुमार क्षमा करतीलच!! ]

(जाति–दिण्डी)

कुणी कवि सोडोनि स्वपत्नीला
हाय दुर्दैवें गतप्राण झाला!!
पडे तिजवर आकाश कोसळून
म्हणे, "आतां करूं काय तरि जगून?" १
"आत्महत्या!—छे, शक्य अतां नाहीं
पांच पिलांची आणि त्यांत आई!

लग्नग्रंथी पडणार पुन्हा नाहीं
दिवस आतां जातील कसे बाई ? ” २

तोंच स्वप्नीं येऊन म्हणे नाथ,
“ कां न फिरुनी संसार थाटवीत ?
मुलांचेही होतात फार हाल !
सखे, तुजला ते कसे बघवतील ? ” ३

मृतात्म्याचे आज्ञेस अप्रमाण
मानणारी चांडाळ असे कोण ?
‘त्यांचि’ आज्ञा तात्काळ मान्य केली
‘कुंकुमाचा दे रम्य तिलक भालीं !’ ४

दोन वर्षें संसार नीट झाला
पुन्हा दैवानें हाणलाच टोला
दैव मागें लागलें धुउन हात
फिरुनी आज्ञा आणखी त्याच होत ! ५

असो, झाली जरि कितीहि वेळ आज्ञा
कर्वीपत्नी करणार ना अवज्ञा
दिसो कोणा ‘निर्लज्जपणा’ यांत !
‘प्रेमगंगा’ पाझरे अंतरांत !! ६

## " चावटपणा—"

— ना. ग. काणे

[ श्री. केशवकुमार यांच्या 'सखे बोल—बोल' या कवितेचें हें विडंबन आहे, असा वाचकांनीं गैरसमज करून घेऊं नये ! ]

" कां नाथ आज धरिला इतुका अबोला
मीं काय बाइ तुमचा अपराध केला ?
कां जाहलें मुख असें अगदींच म्लान
कां घातलीं तुम्हि अशी गुडघ्यांत मान ?

कां केश हे विखुरले सखया, कपाळीं
केला न काय तुम्हि 'श्मश्रुविधी' सकाळीं ?
घ्या तो चहा झडकरी, नि—उठाच बाई—
आंघोळिला; कशि न हो हपिसास घाई ?"

× × ×

गेली पुढें हंसत ती पसरोनि हात
तों 'प्राणनाथ' उठला चिडुनी क्षणांत
" हो दूर—चावटपणा भलताच काय ?
'बेकार' होउनि ! अजी बसलों ग ! ! हाय ! ! ! "

## शनिवारवाडा

—पण्डित सप्रे

आणि मोडक्या
  बाजारामधिं

खुशाल बसुनी
  या जगतासी

उगा सांगसी
  किंमत अपुली !

संग्रहालय
प्रत
नं.
ता.

---

## दिव्याखालीं अंधार

—पण्डित सप्रे

प्रकाशें अन्तरीं माझ्या
  सखे ! हा दीप प्रीतीचा

परी अंधार गे ! सारा
  तूझीया अंतरामाजीं !

---

## उपकार

—पण्डित सप्रे.

[ इला व्हीलर विल्कॉक्सच्या True charity चें विडम्बन.]

उभा होतों दारांत सुप्रभातीं
तोंच येई कुणि मजकडे भिकारी
चामचंची काढून खिशांतूनी
दिलें ठेवूनि हातांत एक नाणें !
दिनीं दुसऱ्या पुनरपी तेंच होई
येइ दारावरि तोच तो भिकारी !
काय द्यावें मज सुचेनाच कांहीं
म्हणुनि दिधलें मी काव्यग्रन्थ कांहीं !
पुन्हा आला नाहींच तो कदापी !
कुठें गेला?—आलें न तें कळूनी !

---

## समाधान

—पण्डित सप्रे

[ विनायकाच्या 'परापूजा' या कवितेवरून सुचलेली कविता ]

They also serve who only stand and wait. –Milton.

वाटतसे कीं एक तरी कप
द्यावा तुजसी चहा
परी चहाचें दुकान तर तें
तुझ्याच दारामधीं !

गात बसावें गीत तुझें तर,
तुझ्याच वाङ्यामधें
गाण्याची लयलूट सारखी
गायनक्लास करी !
वाटतसे कीं कवन रचावें
तुजवर तर हें पहा
जीव टाकिती पाहुनि तुजसी
कितीक रोज कवी !
काय करूं मग ? सुचे न कांहीं
वाटतसे आतां
स्वस्थ राहुनी तुजसाठीं तरि
काय न ये करितां !

---

## कैफियत

—'सुलोचना'

[ जातिः—भूपति ]

जगिं सार्थचि वदती पुरुष जात बेमान,
लाविति नादिं मग फसवुनि चिरिती मान !
प्रेमाचा लटका मायावी बाजार,
नच सत्य अनुभवा येत कधीं साचार !
मममोहक रूपा मोहित झाली 'स्वारी',
जोडिला स्नेह मजसवें तदा सुखकारी.

अंगिकार माझा स्वेच्छेनें जरि केला,
परि दाद न त्याची प्रथम दिली कोणाला.
दक्षता राखिली, गेलि शेवटीं व्यर्थ,
सहवाससुखाची जधीं वाढली आर्त !

धरिली न ह्यापुढें क्षिती कुणाची बाई,
फिरवीत आपुल्यासवें मला नित राही.
आसनीं, भोजनीं, शयिनिं राहिलें जवळीं,
मजविणें चैन नच तथा कधींही गमली.

निस्सीम मजवरी प्रेम पाहुनी ऐसें,
ठेविलें उल्हसित मीही 'तिकडे' खासें.
ना रुचलें बघण्या दुर्दैवा हें भाग्य,
कलुषित मन करुनी नेत हिरावुनि सौख्य.

कुणि पढविलें तया 'जरि ही सुंदर नार,
विषयुक्त हृदय परि हिचें असे अनिवार !
झणि संग हिचा त्यजि न ही सेवण्या योग्य,
अल्पायु करील तव जीवित मानी सत्य' !
न कळतां विकृति जडूं लागली तनुला,
बोध हा 'स्वताच्या मनास तेव्हां पटला.
कृष्णवर्ण झाले ओष्ठ चुंबुनी मजला;
दुर्गंधि मुखाला, कफाहि उरिं बहु भरला !
बोटावर चढला पिवळट रंग विषारी;
वित्ताची हानी तशीच झाली भारी ?
मानिलें जरी हें सत्य मी न अपराधी;
कां विचार नाहीं केला ह्याचा आधीं ?

गोंविलें प्रीतिनें प्रथम मला करपाशीं,
कां उचित पाडणें अतां असें तोंडघशीं ?
जनतेच्या चरणीं निवेदिला हा कहर
याचितें न्याय, ही 'गोल्डफ्लेक' सीगार.

---

# तात्या पंतोजी

द्वा. वि. प्रधान, एम् बी., बी. एस्.

( मराठी पहिल्या पुस्तकांतील " आईस " प्रणाम करून )

नीज न ये तर पान[१] करावें,
अथवा फटके देत बसावें,
कोण करी हें जीवेंभावें ?
तात्या पंतोजी.

रडवें माझें वदन बघोनी,
अभ्यास न ये हें जाणोनी,
कोण उगे करी मज मारोनी ?
तात्या पंतोजी.

हंसतां मजला पाहुन चिडतो,
छड्या सटासट कितितरि देतो,
परि अंतरिं जो तृप्त न हो, तो
तात्या पंतोजी.

---

१ विडा.

येई पालक तेव्हां जपतो,
सुखवाया मज अतिशय झटतो,
परोपरी करि उपकारा तो
तात्या पंतोजी.

पालक जातां रडलों पाहुनि,
माराया मज येई धावुनि,
गुरकावे कोटाला धरुनि,
तात्या पंतोजी.

स्मरण तुझ्या ममतेचें होई,
तव उपकारा तुलना नाहीं,
कैसा होऊं मी उतराई
तात्या पंतोजी ?

---

## ‘ मी कवयित्री ’

चं. ग. दीक्षित

[ पत्नीच्या अस्वस्थतेचीं कारणें तिचा नाथ तिला विचारतो आहे व ती त्यास प्रसङ्गोपात्त अशीं उत्तरें देऊन त्याला किंचित्काल संभ्रमांत ठेवीत आहे. ]

तुला काय हवें ? औषध ? ‘ छे ! मी न आजारी ! ’
दिसे गालफुगी केवढी ? ‘ तोण्डांत सुपारी ’
असे आम्बट कां तोंण्ड तुझें ? ‘ खातच कैरी ’
खळे ओघ न ? ‘ डोळ्यांत सले काजळ भारी ’

‘कसेंसेंच मला वाटतसे येउन घेरी’
दहींभात पहा कालवतो, ‘येत शिसारी !’
अगे ! थाम्बुन घे[1] चुम्बन, वाटेल हुषारी
‘नको आजच तें; शिल्लक राहिल उधारी.’

पहा ! ढांस उठे, घेई खडिसाखर पत्री
‘मला रोग न, काव्यांत झुरे, मी कवयित्री !’

---

# कणिका

—गोविन्द झोकरकर

“ही प्रीत”—“प्रणय”—ह्या केवळ कविकल्पना !
[ ना हृदयीं माझ्या येईल ही भावना !— ]
मैत्रिणींत करिशी ऐशा तूं वल्गना !
मग रात्रभरीं कां वजि तुवां जाळुनी—
‘पाकिटें’ गुलाबी आज कुणा धाडिलीं ???— १

कविकडे चहाला मित्र कुणी पातले
‘पम्पिला’ कुणी ‘स्टो’ ‘अधण’ कुणीं ठेविलें
नी दूध पहाया कवी आंत धावले–
परि हाय ! कपाटांतुनी निघे मांजर–!
जाहले ‘हिम्पुटी’ चहाभक्त ‘मञ्चर’–!!! २

---

१ औषधाचा “डोस” जसा थांबून थांबून घेतात त्याप्रमाणें.

गोपाळ-मंदिरीं कीर्तनास रात्रिला
येईलच "लैला" म्हणुन् "मज्नु" पातला
(—काढून 'चप्पला' द्वारावरि बाजुला.)
परि आंत ना दिसे, "लैला" ती 'माधवी'—
अन् बाहिर 'चप्पल' दुष्ट कुणी लाम्बवी!!!— ३

---

## माझी दौलत

गोविन्द झोंकरकर

(यशवन्ताच्या 'प्रेमाची दौलत' या उदात्त गीताचें विडम्बन.)

ही तुझी पासुडी म्हणुनि मला बहु प्यारी
प्रीतिची खुमारी समद्याहुनि ग न्यारी—
झाल्यात चिंधड्या तरीहि मजला गोड
(पुरवितें प्रेम पाहिजेल त्याचें कोड!)

ही तुझी बशी ग! म्हणुनि चाटतो सजणी
मज वेड लागलं, म्हणती भाऊ-बहिणी!!
हा तुझाच कंग्वा, कुंकवाचि अन् पेटी
झोंपतो घेउनी रोजच पोटीं-पाठीं

'गंगावन' हें जुनं; तुझ्या डोईचं!—
पिंजारित बसतों होतं हासं माझं!
'ब्लाऊज्' अंगिचा तुझ्या जपुनि ठेविला
ही 'दौलत माझी'—वेडच त्याचं मला

माझिया कोण जी पोटीं(?) येईल
ती तुझ्या येवढी जेव्हां होइल—
हें घालुन तिजला पाहिन डोळे भरुनी
मग खुशाल नरडी दाबा माझी कोणी !!!

———

## कविता या रद्दि गडे* —

भोलेनाथ, कल्याण.

( " डोळे हे जुल्मी गडे—ह्या चालीवर )

कविता या रद्दि गडे । वाचुन मज दावुं नका ॥
कवडेगिरी यांत खरी । अंत उगा पाहुं नका ॥
करुं मी स्वयंपाक कशी । देतां कां कष्ट वृथा ॥
भाजे कर फिरफिरुनी । बोलुं किती ? ××[1] नाहिंच का ॥

वाटे भय कितिक मनीं ।
जमतिल या सर्वजणी ।
हंसतिल त्या काव्य बघुनी ।
अब्रु उगा दवडुं नका ॥ १ ॥

---

* प्रस्तुतची कविता लिहीत असतां 'केसरीं'तील 'कवीचा करूं नको अपमान' ही उपदेशपर कविता आठवली व 'आपल्या हातून सन्मान्य कविवर्यांचा अपमान तर होत नाहीं ना ?' अशी भीति वाटली. परंतु वस्तु-स्थिति तशी नाहीं हें जाणूनच वरील कविता लिहिली.

१ लाज ? आर्य स्त्री नवऱ्याची 'लाज' कशी घेईल ?

# शाळेच्या वाटेवर—

— राजाराम सासवडकर

[ सर्व मास्तरणींबरोबर कवि यशवन्तांची क्षमा मागून– ]

शाळेचा वकुत होईल; । मास्तरणी झरझर चाल ।। ध्रु० ।।

ही पहिली घण्टा झाली । जमलेल्या असतील मुली ।
ना देखुनि तुजला; कोणी । खेळतील छप्पापाणी ।
कुणि फुगडी; कोणी गिरकी ।
कुणि झिम्मा; इर्की दुर्की ।
घालतील धिङ्गाणा कीं ।
घर डोईवर घेतील । मास्तरणी झरझर चाल ।। १ ।।

थोरल्या बाइ येतील । गुपचूप पोरि पळतील ।
तें करारि मुख बाईचं । रागानं होइल लाल ।
वर्गामधिं नसतां जरी ।
" जाईल मार्जि ग तरी " ।
" जाईल तुझी नोकरी " ।
चल उचल अग पाऊल ।। मास्तरणी झरझर चाल ।। २ ।।

# कवीची विनवणी ?

— मोरेश्वर

( चाल—पहा उघडिलें हृदयाला.)

[ रे० टिळक यांची क्षमा मागून ]

पहा झांकिलें हृदयाला !
उघडुनि पाहुं नका त्याला ! ॥ ध्रु० ॥

धीटपणानें कर अपुला
तुम्हीं किती जरि लांबविला
तरी तयानें
माझी कवनें
जरा चिवडणें
सहन न होइल हो मजला !
साफ सांगतों सगळ्यांला ! १

कारण कवनें गातों जीं
खरोखरी असतीं माझीं !
केव्हां स्फुरलीं,
कशीं जुळविलीं,
कोणी लिहिलीं
ठाउक तें माझें मजला !
उठाठेव कां इतरांला ? २

संपादक माझा वाली.
दडपुनि दे कविता कसली !

मम कवनावलि
कुणीं चोरिली
कुठें छापिली
पर्वा त्याची नच मजला !
उदारतेची ती लीला ! ३

वंदा, निंदा, परि दुरुनि !
हातवाइवर या न कुणी !
हात जोडितो,
दाढी धरितों,
पायां पडतों,
सादर ऐका विनतीला,
धुंडुं नका मम गुह्याला ! ४

---

# कॉलेजांत एकटीच असलेली विद्यार्थिनी

— नंद तेलंग

कॉलेज सुरू नव झालें
मन माझें मोहुनि गेलें । किति तरी ।
मीं सारें जग धुंडियलें
फुल कोठें न कळे फुललें । मज तरी ।
स्वर्गांत
दिव्य वृक्षांस
बहर ये खास

असें कल्पिलें, असें कल्पिलें
मन माझें मोहुनि गेलें । किति तरी ।
परि वर्गी एका दिसलें
फूल तें मुलांत दडालें । लहानसें ।

दिसण्यांत
जरी सामान्य
वाटतें धन्य

मुलांना सगळें, गुरूंना सगळें
मन माझें मोहुनि गेलें । किति तरी ।
प्रेमांत तिच्या मी पडलों
एकांतीं तिजला वदलों । जिवलगे ।

तूं गडे
मनाची देवी
पदरिं मज घेई

तुला मीं वरिलें, तुला मीं वरिलें
मन माझें मोहुनि गेलें । किति तरी ।
ती अखेर कोपुनि वदली
(मेघांत वीज कडकडली । मज गमे ।)

तुजपरी
किती रे शंख
तयां निःशंक

नाहिं मीं म्हटलें, नाहिं मीं म्हटलें
मन त्यांचें मोहुनि गेलें । किति जरी ।



ग्रंथ संग्रह

# बुवांच्या पूजेस

— दत्तात्रय काळगांवकर

[ भूमिका—बुवांच्या 'भगतगणांपैकीं' दोन शिष्यिणी हातांत पूजेचें पात्र घेऊन, सकाळच्या प्रहरीं मठांत निघाल्या आहेत. त्या वेळीं एक म्हणते—]

जाहली पुजेची वेळ । चल मठांत ग भरभर ॥ ध्रु० ॥
उठतील 'बुवा' स्नानाला । अंगास लावुं अत्तर ॥
जुळल्यास घालूं जल ऊन । तांब्याभर अंगावर ॥
कुरवण्डि करोनि टाकूं । 'अक्षताच' डोईवर ॥
जरतारि पितांबर देऊं । करुनियां निऱ्या झरझर ॥
बघण्याला डोळाभर ।
फिरवितिल नजर गरगर ।
दृष्टीस न पडलों जर ।
ठेवितील डोळा बाई । वदुं किती चला लवकर ॥ १ ॥

नैवेद्य 'गोड' त्यां देऊं । राखण्या गोड अंतर ॥
देतील कान-मंत्रातें । ठेवुनी न मुळिं अंतर ॥
नर-नारि कार्य-शास्त्रांचें । करितील विवरणें वर ॥
जरि वयोमान सत्तर ।
देखुनी 'बुवा' तत्पर ।
मन्मती गुंगते बरं ।
ध्यानस्थ सखे होतील । 'गो-मुखींत' घालुनी कर ॥ २ ॥
जाहली पुजेची वेळ । चल मठांत ग भरभर ॥

---

## तूं आणि मी

—वा. भा. पाठक, एम्. ए.

मी राष्ट्रभक्त—तूं श्रीमंताची पोर
होणार आपुलें मीलन केविं–?—अशक्य!
तत्रापि 'चित्रमयजगता'मध्यें पोरी
बसुं आपण दोघें शेजारीं शेजारीं!

५४०८

## संसाराची तऱ्हा

—दुर्गातनय

[ कवि यशवंतांची क्षमा मागून ]

तुझी कां ग ऐशी तऱ्हा सदा उफराटी
एक तरी वेणींतील
फूल कौतुकें देशील
वेडावुनि बसलों फोल
मुखांतून पुष्पांजलिच्या वाहतेस राशी
आणियलें पातळ छान
नेसुनियां आनंदानं
सांगितलें येऊं फिरुन
त्याच दिनीं नेसुनि बसशी घरांतिल छाटी
आज गांठुं या 'शो' दहाचा
किती सुंदर तो 'मेट्रो'चा
वाटे तुज बोल फुकाचा

पुराणासि जासि, जैशी उलटलीच साठी
गृह ठेवी टापटिपीनें
सांगितलें तुज हौसेनें
करुनि ठेविसी रागानें
पसरुनियां वस्तू सगळ्या घरामाजि दाटी
तोंडावरि स्मित ना दिसतें
रुसुनि सदा रागें बसते
बोललों जरा कीं होते
लाल जशी मिरची भासे वाढलीच ताटीं
यावें घरिं कामावरुन
स्वागत तूं करिशील हंसुन
जाशी तइं टाळा लावुन
मैत्रिणिच्या घरिं, ती वाटे पतीहून मोठी
कैसा मी झालों अंध
जोडियला हा संबंध
प्रेमाचा मुळिं ना गंध
चुकलों मी तुजशीं बांधुनि जन्माची ही गांठी

---

# कवीचा संसार

— राजा बढे

तीः—हे थंड पहा चुलखंड कुठें लांकडें
कीं तयांत लावूं आतां मी डोक्यांतिल आंकडे ?
संपलीच साखर चहा नसे हो मुळीं
तोः—कीं चहा न माझी येथें अन् साखर जी पेरली

तीः—शिजणार न माझी डाळ जाणतें पुरी
पुरणार कशा वरणाला या हातावरल्या तुरी ?
दांतांच्या करुनी कण्या विनवितें, घरीं
थेम्बही तुपाचा नाहीं घालाया भातावरी

तोः—संताप जिवाचा असा जाहल्यावरी
नवनीत-कोमला काया—मग उणीव कसली तरी ?
भाजीस भोपळा न कां श्रमाचा पुरा
कां फिकीर करिशी कान्ते तूं असून बिंबाधरा ?
चांदणें शुभ्र हें, नव्हे पीठ सांडलें
आयतें मिळालें आतां, आणखी काय राहिलें ?
काळजी कशाची तुला सखे एवढी ?
चालली उतूं ही वेडे, प्रेमाची अपुल्या कढी
कुर्कूर तुझी गोड ही, नव्हे कुर्डई
फुगतांच शोभते कैशी ही आवडती सांडई
तिळपापड कडकडति हे जरा शेकतां
भरपूर शिव्या खायाला आगींत तेल ओततां
चल ऊठ, वाढ मानिनी, भूक लागली,
मांडल्या पहा या माझ्या पोटाच्या पत्रावळी

तीः—हंऽ विनोद हा कविराज जाहला पुरे
व्यवहार शिका अंऽ थोडा कल्पनेंत सारें खरें

तोः—मृदु गालांचा गुलकंद मूळ प्रीतीचें
हे कंद, मूल, फल, खाया आतुर दुजें ना रुचे
खाऊन स्वस्थ झोंपुं या शिळी भाकरी
अन् लाव अतां तोंडाला 'अकलेचा कांदा तरी'

---

# देणें थकल्यावर

—राजा बढे

[ श्री. माधव ज्यूलियनांची सुप्रसिद्ध 'तेथें चल राणी' ही नव्हे. कमरेला दिडकी बांधून हिंडणाऱ्या एका राजाची ती गृहराज्ञी आहे हें वाचकांनीं विसरूं नये. ]

[ जाति—भिल्लीण दिडकी ]

कोठें तरि जाऊं इथुनी शीघ्र निघोनी । अज्ञात ठिकाणीं
भीती न जिथें स्वस्थपणें हो गुजराणी । तेथें चल राणी
देणें थकलें आजहि गेलों न दुकानीं । ये कटुवच कानीं
शोधार्थ घरीं येतिल गे शेठ नि वाणी । तेथें चल राणी
जाण्यास खुला मार्ग न तें धैर्यहि पोटीं । होईल फजीती
जाऊं चढुनी भिंतहि लावून निशाणी । तेथें चल राणी
आणूं कुठुनी गादि उशी कांहिं न आजी ॥ ह्या तुटक्या बाजीं
मी 'मच्छर' तूं नाजुकशी 'मच्छरदाणी' । तेथें चल राणी
दाढी करण्यातें न 'मनी' ये मग कुठुनी । 'स्नो' शुभ्र 'हिमानी'
संसार न हा, ही मुळिं 'मरनेकी निशाणी' । तेथें चल राणी
कोठें तरि जाऊनि लपूं या नि जपूं या । ही कोमल काया
तुज वांचुनियां व्यर्थ गडे ही जिनगानी । तेथें चल राणी
सोडून तुला जाउं कसें वेड जिवातें । बा तुटतें नातें
तव हास्य मना मोहवि बेधुंद जवानी । तेथें चल राणी
व्याकूळ भुकें, पोट किती जात खपाटी । चिंता मनिं मोठी
उपहारगृहीं जावूं असो हिंदु-इराणी । तेथें चल राणी
समजावुं किती धरण्यातें येतिल काका । निर्धास्त अशी कां ?
तुज हात अतां जोडितसे ऊठ भवानी । तेथें चल राणी

# मारवाडवासिनी

—राजा बढे

निळी बुट्याची डोईवरुनी घेउनिया ओढणी
कुठें चालली मंदगामिनी अवगुंठित चांदणी
दो बोटांनीं डोळ्यांपुढला पदर जरा सारुनी
फिरुन् फिरुन् कां चोरुन बघशी बाई बुरख्यांतुनी
नवनित-कोमल कांचन-काया वस्त्रांतरिं दडवुनी
अमोल रत्नें विभूषणांनीं देह तसा मढवुनी
गळ्यांत पेटी, हार, अंगठी बोटीं, शोभे तिला
कुठुनी जागा अंगावरती तिळही ठेवायला
हस्तिदंति पाटल्या, गोठ नव, बंदाहि दंडावरी
अन्य न उपमा सौंदर्याला नवही खंडांतरी
पायीं पैंजण, बिंदि, बिजवरा, नथ नाकीं नव तिला
अंगीं कंचुकी, भव्य लहेंगा कटिवर गुंडाळला
बेहद्द वाढलें उदर पदर ना वरी
श्रृंखला रुपेरी लोळतसे त्यावरी
ती विशाल नाभी वैभव-शोभा खरी
शोधायातें रसिक नजर जंव अचुक वळे कोमला
फसवायातें भंवरा जणुं तो यौवनगंगेंतला
कुठवर बाई उभी राहशी वाट अशी पाहशी
राणाजीतें येतां बघतां क्षणांत कां बिचकशी !
रुमझुम छुमछुम नुपुरनाद तो नाद लावतो मला
झोक बाजुला किल्ल्यांचा, अन् झोंक-नोक निस्तुला

भुजलता गवाक्षांतुनी कधीं पाहणें
मदधुंद मंद पद टाकुनिया चालणें
बेसूर कंठ कोकिळे तुझीं गायनें
दूर पळे आनंद तरीही ऐकवि गे सुंदरी
करुनि टाक 'दिल् बाग् बाग्' मम छेडुनि बागेसरी
मारवाडवासिनी प्रेमला रसिक मनोहारिणी
कधीं भासशी मला भामिनी महिषासुरमर्दिनी
अहा अंगना अनंग कुठुनी पूर्ण अंग व्यापिते
'अर्धांगी' तिज म्हणावयातें जिव्हा चंचल भिते

---

## अतिपरिचयादवज्ञा—

— कुमुद-बान्धव

वेल्हाळे ! कविते ! बळें सुदयिते ! प्रेमें तुला बाहतां
"जा—नाहीं—" लडिवाळ बोल वदसी शृङ्गारभावें अतां
कोणी आळवितां परी कवि नवा जासी कशी त्याकडे ?
किंवा तूं करिसी अती परिचयें माझी अवज्ञा गडे !

---

## माता—

—'विनोद'कर्ते मा. ना. जोशी

माता बसली स्वगृहिं रखडत
घाशित ताट-तव्यासि-पळ्यांसि ॥ माता० ॥ध्रु०॥
गो-मयगोळा, घेउनि हातीं
लिंपित वैल-चुलीशीं भुईशीं ॥ माता० १
अंगडीं, चोळ्या, कुंच्या, दुपटीं,
लुगडीं ही नेत नदीसि धुण्यासि ॥ माता० २

---

## सज्ज करुनि—

—'विनोद'कर्ते मा. ना. जोशी

सज्ज करुनि गादि, उशी वरतिं पहुडतों
पासुडिची करुनि घडी पायिं ठेवितों ॥ ध्रु० ॥
ढेंकुण मग येति पहा
पिसवा त्या चपल महा
रुणझुणती चिलटं अहा
मी बळी जणुं त्या समुहा
मधुनि मधुनि उंदिरही, पाय तोडितो ॥ १ ॥

# प्रेमवेड्याचीं विरामचिन्हें

—बकुलराय

जेव्हां प्रेम करूं विचार असला चित्तांत मीं मांडिला
जी जी दृष्टिंत ये तरूण युवती वाटे हवीशी मला
'ही' वा 'ती' मन गोंधळून भ्रमलें दृष्टी सदा बागडे
तेव्हां स्वल्पविराम मात्र दिसती स्वच्छंद चोहींकडे ॥ १ ॥

आहे काय कुलीन? मंगलमुखी! भोळीच कीं मानिनी?
आईबाप कुठें? कुठें वसतसे? बोलेल कां हांसुनी?
जी ती पाहुनि यापरी भकतसे दृक् सारखी फेकित
प्रेमाची सुरवात मी करितसें तैं प्रश्नचिन्हांकित ॥ २ ॥

एकीला ठरवून योग्य वदलों प्रीती करावी इथें
अर्धा मार्ग क्रमून पाठ पुरवी जाई तिथें ती जिथें
प्रेमाची तिजलाहि खूण पटली पृथ्वीवरी स्वर्ग ये
वाटे अर्धविराम येथ करुनी सोडूनि जाऊं नये. ॥ ३ ॥

दृष्टीला दिसतां द्वितीय युवती 'ती'च्याहुनी सुंदर
सौंदर्यीं परमावधीच तिसरी हो ताण सर्वांवर
माझें प्रेम उचंबळे पुनरपी; कोठें स्थिरेना पण
त्या कालीं मग जाहलें सहजिं तें उद्गारवाची मन! ॥ ४ ॥

एका मागुनि दोन तीन सगळीं गेलीं गळोनी फुलें
हातीं एक न लागलें मज परी माझ्या स्वभावामुळें
प्रीतीची फुलबाग पार वठली! मज्जीव वैतागला
देवा! पूर्णविराम तूंच मजला देशी न कां आजला? ॥ ५ ॥

# प्रथमा ते संबोधन

— सं. रा. कर्णिक

प्रथम दिवशीं आलीस जैं समोर
द्वितीयेची रेखीव चंद्रकोर
जडे तुजवरि मम अद्वितीय भक्ती
मधें तृतिया नच खपे कुणी व्यक्ती.
चतुर* थिल्लर मद्बुद्धि परी झाली
प्रेमरंगाची पंचमी उडाली
रंगढंगाची जधिं कमाल झाली
कितिक मित्रांनीं षष्ठि माझि केली
पुरे म्हणुनी चोरट्या प्रणयलीला
विवाहाचा निश्चयो मनीं केला
सप्तमीला होतांच सावधान
उघड संबोधिन, 'हे प्रिये' म्हणून.

ग्रंथ ता. ठाणें.

—

* 'मद्बुद्धि जरि चतुर तरी थिल्लर झाली' असा कसा तरी अन्वय वाचकांनीं करावा, (त्याशिवाय चतुर्थी हा शब्द ओळींत कसा आणतां आला असता?) व अर्थाच्या तर भानगडींत पडूं नये. कारण प्रेमविषयक सर्व प्रकरणें अनर्थात्मक असतात.

# प्रथमच सासरीं जाणाऱ्या बालिकेस

—शं. द. भोसले

[ चालः—'परिटास'ची ]

बालिके, येशिल ना परतून? ॥ ध्रु० ॥

मूल्यवंत हे दाग-दागिने
अल्प काळिं बिघडून
महिन्यांतूनी एकदां तरी
सासूशीं भांडून
शेजारामधिं हलक्या-सलक्या
चोऱ्या कांहिं करून
तीव्र शिव्यांची शेजाऱ्यांना
लाखोली वाहून
गरम पतीला नरम पाडुनी
मुठींत अन् ठेवून
सप्ताहीं चारदां तयाला
खाणावळ दावून
अखेर काडीमोड करूनी
कायमची तेथून

———

# तिनें त्याला परि पाहिलेंहि नाहीं !

— अ. ह. जोशी

[ जाति—दिण्डी ]

पथीं होउनि अपघात जखम झाली
आणि सायकल्वरुनि ती येत खालीं[1]
तिचा ‘जिवलग’[2] धांवला सांवराया !
तीहि धडपडुनी लागली उठाया !
इराण्याच्या शेजारच्या दुकानीं
जाउनीयां सत्वरीं जला आणी !
स्वीय भिजवोनी रेशमी रुमाल
जखम बान्धीता होय तो दयाळ !
एक तेथें आणुनी स्वयें टांगा
करा देउनिया चढविली शुभांगा
स्वतां बैसुनि चालवी पायगाडी
आणि बुधवारांतुनी मार्ग काढी !
स्वतां पत्ता सांगुनी वाहकाला[3]
घरा आली, उतरली सुधाबाला[4]
हांसुनीया तो तिच्याकडे पाही
तिनें त्याला परि पाहिलेंहि नाहीं !

---

१. ‘पडली’ या शब्दाचें सौम्य रूप.
२. तो स्वतःला तसें समजत होता.
३. घोड्याला नव्हे, टांगेवाल्याला.
४. हा समास जितक्या तऱ्हांनीं सोडवितां येणें शक्य असेल तितक्या तऱ्हांनीं सोडवावा.

# आम्ही कोण ?

—सी. का. देव

[ वरील संवाद वर्गांतील अभ्यासी विद्यार्थी आणि 'सनदी' विद्यार्थी यांजमधील आहे. हा संवाद जाहीर केल्याबद्दल 'सनदी' विद्यार्थी क्षमा करतील. अनुकरणाबद्दल केशवसुतांची क्षमा मागणेंहि जरूर आहे. ]

आम्ही कोण म्हणून काय पुसशी, आम्ही असूं लाडके—
—शाळेचे, दिधली तिनें नित मुभा आम्हांस खेळावया,

वर्गामाजिं हवे तसे विचरतों अभ्यास सोडूनियां,
भिंतींतूनहि आरपार अमुची दृष्टी पहाया शके.

विद्येचे बडिवार सर्व इथले आम्हांपुढें ते फिके
पाणिस्पर्शचि आमुचा शकतसे ग्रंथांस दावावया—

—कूपाचा तळ खोल, जादु वसते ऐशी करांमाजिं या,
फोलें वाचितसां तुम्ही अम्ही चणे वर्गांत खातों सुखें.

शून्यामाजिंच डांबुनी स्थिरविलें कोणी गुणांना बरें ?
हाटाची समता प्रतिक्षणिं वदा वर्गास दे कोण तें ?

ते आम्हीच, सदाकदा कृतितुनी ज्यांच्या मजा पाझरे,
ते आम्हीच वरेण्य, गंमत तुम्हां ज्यांच्यामुळें लाभते.

आम्हांला वगळा स्मशान सगळीं होतील क्रीडांगणें,
आम्हांला वगळा हुषार म्हणुनी तुम्हां न कोणी म्हणे.

## लाडक्या लेखिकेस—

— य. ना. मोघे

तो लेख तुझा गे म्हणुनि दिला छापुनी
एकली गमसि तूं मला लेखिका गुणी
किति कांस लेख साभार परत धाडिले
किति उडवुनि चिंध्या टोपलींत टाकिले

सुप्रसिद्ध लेखक म्हणविती जगिं जे जन
गे तुच्छ त्यांस लेखितें परी मन्मन
विद्वान स्वतःला म्हणोत कुणिही किती
त्याविषयिं लेशहि न मनांत धरितों क्षिती

जरि अशुद्ध कितिही असेल त्वल्लेखन
मी स्वतःच करूनी शुद्ध त्यास घेइन
नांवांत तुझ्या मज अजब जादु भासते
त्याविण वर्गणीदार कसे वाढते ?

द्यायाचें मज दे वचन लेख यापुढें
मज्जिवास ना मुळिं चैन त्याविना पडे
तुजसाठीं काढिन खास अंक कितिकदां
उधळीन त्यांतुनी तुझी लेखसंपदा

फोटोहि तुझा छापावा वाटे मनीं
लाडके—तरी दे असेल तो धाडुनी

# तुम्ही कोण ?

— रा. द. ब्रह्मे

[ 'आम्ही कोण ?' या ठराविक प्रश्नांनीं काव्यांत बराच खेळखंडोबा केलेला असल्यानें, साहजिकच सात्त्विक संतापानें आमच्याविषयीं इतक्या उत्सुकतेनें विचारणारांना 'तुम्ही कोण ?' म्हणून विचारणें अयोग्य होईल काय ? ]

तुम्ही कोण विचारितां तरि असे आम्हांस दर्डावुनी
केल्या का कविता कधीं नच तरी आहे रुची गायनीं[1]
मार्गीं पाहुन बालिका कधिंतरी गेलांत का मागुनी
काव्या खाद्य मिळेल छान असली इच्छा मनीं ठेवुनी
कोठें रानिंवनीं प्रशांत[2] समयीं जातां कधीं हिंडण्या
किंवा जात असां सदा भटकण्या रस्त्यांत टोपीविना
कोठें फूल, तसेंच मूल बघतां वृत्ती कधीं बावरे
अन् टाकांतुन कागदावर त्वरें शाईरुपें ती झरे
आहे ओळख का कुणा लटपटच्या संपादकाची परी
किंवा 'सत्कवि', कारकून, कुठल्या 'कार्यालयाचा' तरी
कांहीं यांतिल गम्य ना जर तुम्हां आहे अशी योग्यता
कां हे बाष्कळ प्रश्न टाकुनि पुन्हा आम्हां तरी त्रासतां ?
— राखा याद मनीं पुन्हा जर कधीं केलीत पृच्छा अशी
कांहीं ना धरतां दया, खिळखिळी होईल तैं बत्तिशी

---

१ गायनीं रुची असल्यास काव्याचा थोडातरी बादरायणी संबंध येतोच.
२ हा प्रशांत समय कधींकधीं भर दुपारींही येण्याचा संभव आहे.

# त्याचें काव्यप्रकाशन

— रा. द. ब्रह्मे

त्याचें एक सुकाव्य पुष्प उमलें सन्मासिकीं जेधवां
मित्रांमाजि सदैव तैं चहुंकडे होई बहू वाहवा
केला आग्रह खूप मित्ररसिकें 'काव्यांजली' काढण्या
झाला स्वर्ग नजीक आणि अपुरी पृथ्वी तदा राहण्या
वाटे खर्च वसूल होउनि जरी कांहीं मिळालें तरी
झालें कार्य फुकें 'महाकवि' तरी होऊं अतां सत्वरी
केला सर्व हिशेब तैं निवडुनी बारा सुकाव्यें स्वतां
झाला मंजुर खर्च साठ रुपये साहित्यकार्यीं तदा
साऱ्या मासिक पुस्तकीं झळकली जाहीर वार्ता भली
कोणी सांगतसे पहा कुठुनियां प्रस्तावना चांगली
आल्या एक हजार छापुन प्रती, उत्कंठ होऊनियां
पाही वाट गिऱ्हाइकास्तव परी, कोणा न येई दया
गेल्या भेट म्हणोनि मात्र चवदा नाहीं म्हणाया परी
आल्या त्या बहुतेक सत्वर तशा साभार साऱ्या घरीं
झाला मास पुरा तरी चुकुनियां कोणी विचारीच ना
कोणा ओळख ना पटे सुकविची ये कींव त्यांची मना
आला एक विचार आपण लुटूं सत्काव्यज्ञानामृत
त्या योगें तरि हे बघूं चुकुनियां होतील कीं जागृत
साऱ्या घेउनियां प्रती जवळच्या चौकांत गेला खुल्या
जो भेटे पथिं त्यास तैं नमुनियां त्या मुक्त हस्तें दिल्या

---

# निंदा

— वि. ज. सहस्रबुद्धे

[ वृत्त—भुजंगप्रयात ]

तुझ्यासारखें गोड वाटे न कांहीं
तुझ्यासारखें श्राव्य कांहींच नाहीं
तुझ्यावीण काल क्रमायास इष्ट
नसे कोणता मार्ग लोकीं वरिष्ठ ॥ १ ॥

सुखाला जगीं तूंच आहेस हेतू
खरी एक विश्रान्तिची साउली तूं
मनोरंजनाचें तुझ्यासारखें तें
मला नाढळे स्थान अन्यत्र कोठें ॥ २ ॥

तुझ्या संगतीचा नसे वीट कोणा
तुझ्यावीण तो काळ कंटाळवाणा
तुझ्या लागले लोक नादीं प्रभूत
वसे मोहिनी दिव्य कांहीं तुझ्यांत ॥ ३ ॥

जशी शिक्षिताला अडाण्यास तैशी
जशी श्रीयुता निर्धनालागिं तैशी
स्त्रियांना जशी पूरुषांनाहि तैशी
प्रिया तूं जगीं सर्व लोकांस होसी ॥ ४ ॥

तुला साधु दोषास्पदा लेखितात
तुझ्यापासुनी दूर ते राहतात
परी कोणि नाहींच निर्दोषपूर्ण
तुला निंदिणें योग्य नाहीं म्हणून ॥ ५ ॥

जिथें चार होतात एकत्र लोक
तिथें येउनी ठाकसी तूं विलोक
तुझ्या स्वागतावांचुनी बैठकीला
कधीं कोणत्या रंग नाहींच आला ॥ ६ ॥

तुझ्यावीण कोणास केव्हां कुणाची
कराया स्तुती ये न निर्भेळ साची
तुझ्यानेंच रम्यत्व ये भाषणांत
तुझें थोर माहात्म्य वाढे कलींत ॥ ७ ॥

तुझी स्वर्ग-मर्त्यादि लोकांत तीन्ही
गती सर्व संचारिणी ये दिसूनी
तुझा त्याग केला खरा ज्या नरांहीं
असे वीर थोडे कुठेंही कदाही ॥ ८ ॥

---

## छत्रीचे उपकार

—कै. श्री. कृ. कोल्हटकर

[ चाल—वीर शिरोमणि सकल धनुर्धर नायक० ]

छत्री गे मानितों तुज खरी मी अपुली माउली;
कृपेची करिसि बरी साउली ॥ ध्रु० ॥

आटपसर कधिं वस्त्र चुण्यांचें नेसुनि येशी सवें,
यष्टिशी सेविसि मज गौरवें.
श्वापद रोंखी मार्गा तेव्हां त्यातें तुज टोंचुनी
लावितों क्षणांत मी पळवुनी

कधिं तिमिर खुंटवी समूळ माझी गती
कधिं खांचा खळगे अवचित पथ रोधिती
सोपान कधीं मज उतरावे लागती
ऐशा संकटिं देउनि टेका रक्षिसि सांधे भली
कृपेची करिसि बरी साउली. १

निज वस्त्रा कधिं रूप झग्याचें देउनि वातावरी
पोहसी; दिससि भव्य किति तरी !
चंद्रा जैसा परिवेष तशी शोभविसी मम मुखा;
दागिना कोण तुझ्यासारिखा ?
मम शिरीं तरंगुनि या रीतीनें सदा
वारिसी रविकरोद्भूत सकल आपदा;
जल बलें निवारुनि विडंबिसी अंबुदा;
निवारितों नच नेतिस तरि नभिं दुर्धर वेगानिलीं;
कृपेची करिसि बरी साउली. २

दैवाच्या दुर्विपाकयोगें अग्नि जईं पेटतो,
नराला सौधावरि गांठितो,
अथवा दुर्गावरी तयाला शत्रु जईं कोंडितो,
भोंवतीं रक्षकगण ठेवितो.
जरि अससी त्याच्या सन्निध तूं देवता
तो क्षणार्धांत करि तुजसह निज मुक्तता
अग्निच्या जिभा अरिशर किंवा तत्त्वतां
पोंचति नच त्या; चुकविसि यापरि महासंकटावलि;
कृपेची करिसि बरी साउली ३

अजुनी माते उपकार तुझा कथण्याचा राहिला,
पूर्विच्याहुनि जो बहु आगळा.
मत्त वृषभ जैं दारुण गर्जत मजवरि ये धावुनी
भिववितों उभारुनी तुज झणीं
मार्गानें भेटति खल जैं मजलागुनी
व्यवधान म्हणोनी मध्यें तुज घालुनी
रक्षितों स्वतांला तद्दृष्टीपासुनी;
भर रस्त्यामधिं निर्मिसि यापरि निवान्त खोली खुली;
कृपेची करिसि बरी साउली. ४

---

# एक काव्य-प्रकार

— केशवकुमार

[ एका सरकारी कचेरीचा एक भाग. धोंडो व गुंडो नामक दोघे कारकून शेजारीं शेजारीं बसलेले असून त्यांच्यासमोर कागदांचा व फायलींचा भयंकर ढीग पडलेला आहे. काम करून करून कारकूनद्वय अगदीं मेटाकुटीला आलेलें आहे. ]

**धोंडो**—( जांभई देत )
काम केव्हां सरे !

**गुंडो**—( निःश्वास सोडून )
—हाय ! केव्हां तें सरेल ?
वाटतें कंबर आतांच मोडेल,
काय रे देवा ही आमुची स्थिती ?
बरें आहे, चालू द्या, ना तरी मिळेल
येथून गचांडी ! छे, तें नको रे बाबा !

( अंगावर कांटा आल्यासारखें करतो. इतक्यांत शिपाई आणखी दोन फायली आणून ठेवतो. )

**धोंडो**—( स्फुदंत )

अंतच न देवा! कां रे या फायलीलागून ?
काम केव्हां सरे ?

**गुंडो**—( निःश्वास सोडून )

—हाय ! केव्हां तें सरेल ?

**धोंडो**—( धीर करून )

बरें तर गुंडो, काढा एक विडी—

**गुंडो**—( घाबरून )

छेः छेः नको रे राजसा असें तूं करूं !

**धोंडो**—( निश्चयानें )

कांहींही म्हटलें तुम्ही जरी आतां
शिलगावतोंच—

( विडी पेटवितो तोंच आंतून साहेब येतो व धोंडोला विडी ओढतांना पाहून त्याच्या पाठींत गुद्दा मारतो. धोंडो पळून जातो.)

**धोंडो**—( पळतां पळतां )

होऊं नये तें झालें !—

**गुंडो**—( स्वगत हंसून )

( व्हावें तेंच झालें!—
एकटाच विडी ओढितो लेकाचा ! )

( वरील वाङ्मय-प्रकाराला मुक्तछंदी काव्य म्हणतात. मेहेरबानी करून हें काव्य वाचतांना वाचकांनीं मूर्च्छित पडूं नये. )

# बाल-कसाई *

— शं. कृ. देवभक्त

[ अलीकडच्या वाढत्या बेकारीच्या काळांत कोणाही पदवीधराच्या तोंडून असे उद्गार निघाल्यास काय नवल ? ]

[ वृत्तः—पाणपोई ]

येइ भाई येथ येई घातला हा " छाप[१] " पाही
धर्म जाती कोणती ती भेद ऐसा येथ नाहीं
संसृतीचा हा हिंवाळा पालवी नाहीं कुठेंही
पाहिले धन्दे करोनी जाहले सारे निकामी.
बांधुनी पायास चाकें घातल्या चक्रा कितीही
नोकरी कोठें मिळेना मानहानी ठायिं ठायीं
दावुनी लालूच खोटी मित्र सारे वञ्चिताती
येवढ्यासाठींच पाटी लाविली दारावरी ही
आद्य जे न्हावी कुणी तद्धोपट्या खुंटावरोनी
आणिल्या वाहून खांदीं वस्तु या त्यांतील पाही
वस्तरे आणीक कैच्या, कङ्गवे तैशा नराण्या,
एकही यांतील माझ्या मालकीची चीज नाहीं.
डोइ, दाढी, बगल किंवा पाहिजे तें घे करोनी
देखतां माझी नवाई होउं दे बंबाळ डोई.
क्षोभतां वृत्ती तुझ्या, संचारतां वेताळ अङ्गीं
ज्या शिव्या देशील दोस्ता तेवढी माझी कमाई

---

* केंसकाप्या.

१ Shop या इंग्रजी शब्दाचें न्हावी लोकांनीं केलेलें मुंडण.

# पातली दिपवाळी राजसे !

— कै. द. भि. रणदिवे

सुटति न अजुनी बाण नयनिचे वेगवान तीव्रसे
पातली दिपवाळी राजसे !

फुलले नाहिंत अजुनि गुलाबी गालाचे अनरसे
पातली दिपवाळी राजसे !

दंतपंक्तिच्या रांगोळींचे उठति न अधरीं ठसे
पातली दिपवाळी राजसे !

उधळिन जिव्हेची फुलबाजी वक्र फुलांचे पसे
पातली दिपवाळी राजसे !

मुरड न मानेच्याहि करंजिस गोडगोडशी बसे
पातली दिपवाळी राजसे !

प्रेमदेवतेच्या प्रेमाचे दिवे न लागति कसे
पातली दिपवाळी राजसे !

कलहकारणा हात नव्या रंगाचा बसला नसे
पातली दिपवाळी राजसे !

सुरम्य रुसव्या रोषणाइचें दृश्य मुखीं नच दिसे
पातली दिपवाळी राजसे !

आपटूबार पायांचे करिति न कर्ण अजुनि बधिरसे
पातली दिपवाळी राजसे !

यांविण व्हावें माझ्याकडुनी लक्ष्मीपूजन कसें ?
पातली दिपवाळी राजसे !

---

## डोहाळे

— कु. संजीवनी मराठे

घेइ हवें काय तें पुसून् । सखेऽग
नको बसूं तूं रुसून् ॥ ध्रु० ॥
ही केळफुलांची माळा
जरि घातलि तुझिया गळां
वास ना येत तुज म्हणून् । सखेऽग
ही दगडफुलांची वेणी
बांधिले तिच्यामाधिं मणी
घालुं का वेणीवरि पिळून् । सखेऽग
ही कंवळी नारळरीप
बांधुनी 'फुलावर'-गुच्छ*
हातांत देउं का आणून् । सखेऽग
तुज उकडे पंखा जरी
नच असेल देइन तरी
बाभूळ-पत्र मी आणून् । सखेऽग
हे धम्मक-लाडू अहा
या चापट-पोळ्या पहा
खायासि देउं का आणून् । सखेऽग
आळा गोटाच नीळा गोटा
पडे पदरीं सागरगोटा
बसा इथें विहिणि तुम्हि रुसून् । पाहतों
मजा अम्हि इथें बसून् ।

* कॉलिफ्लावरचा गड्डा.

## हा अनाथ भाडेकरी !

— मा. ना. जोशी

अरे मालक कसला हरामि गमला निर्दय मारेकरी
मारी घरांत भाडेकरी ॥ ध्रु० ॥

बापजाद्यांनीं बळदें बांधिलीं, त्यावरि तुकडे भरी
लावितो तूप मिशीला वरी

खांब मोडके पोकळ तुळया भृंगराज पोंखरी
धुळीचा पर्वत पटईवरी

अंधेराची शिकस्त, लोंबति जळमटें शिंक्यापरी
पालहि चुकचुक करि भींतरी

उंदिर घुस कंबरभर प्रतिदिन माजघरां पोंखरी
नेला पाताळिं भाडेकरी

घरीं न तोटी, विहीर हिरवी शेवाळानें बरी
पाझरे आळीचें गटारपाणी वरी

ढपला पडला खिळा ठोकला, मालकीण ही बरी
कडाडे वीज गगनोदरीं

भीम बकासुर जरी नांदते सांप्रत तैशा घरीं
वाळते कोळ सुदाम्यापरी

आयुष्याचा काळ कंठितों बाळंतिणिचे परी
सोडिव चक्रगदाधर हरी
हा अनाथ भाडेकरी

———

# माझा उपास

—कु. मालती किर्लोस्कर

[ जाति—शूर्पणखा ]

उपास मज लागला
सखे बाई उपास मज लागला ॥ ध्रु० ॥

कांहींच नसे खायला
केळीं नि खजुर आणिला
अच्छेर दूध प्यायला। सखे बाई ॥ १ ॥

खारका मोजक्या दहा
उकडिले बटाटे सहा
खिस नुसता केला पहा। सखे बाई ॥ २ ॥

वाडगा भरुन लापशी
घेतली पहा गोडशी
वरि खाउनि खिचडी तशी। सखे बाई ॥ ३ ॥

हा उपास मज भोंवला
घाबरा जीव जाहला
दहिंभात म्हणुनि चापला। सखे बाई। ॥ ४ ॥

## अर्थकिंकर

— नरेन्द्र

[ यज्ञांत गुप्त दान करणाऱ्यांना शुभ चिंतून ]

तो मंत्रध्वनि ! यूप तो ! बुकलुनी नीरक्त तें मारण !!
यांहीं सांग समार्चिला सुखविला श्रीयज्ञनारायण.
भासे स्वर्पथ–किंकिणी–क्वणितसे जीतें अजाक्रंदन,
ती लोकीं गुपितार्थ–किंकर–रती देवो सदा रंजन.

---

## वाचिवीर

—नरेन्द्र

[ सनातनी वीरभद्रांची क्षमा मागून ]

जे चौवर्ण विलंघुनी हरिजनोत्कर्षार्थ धाविन्नले,
त्यांतें होरपळूं पहाति बलवद् ग्रामण्य–तेजोज्वलें;
इत्युद्देश धरून जी करि वृथा सन्नाटनालंबन,[1]
लोकीं ती स्फुट वाचिवीर्यपटुता देवो सदा रंजन.

---

१ 'सनातन' शब्दाचा अपभ्रंश.

वाचनालय ११७९ ता. ठाणें.

## द्वैपत्न्यरति

—नरेन्द्र

[ 'मैत्रीचा बहाणा केवळ सवतीचा राणा' अशा नरपुंगवांचें सुयश आठवून ]

'होई ती मज गेहकर्मकुशला भार्या सती गेहिनी,
अन्या साच मदीय जीवित-सखी ही चित्कला–कामिनी.
जी या शब्दिं कुणां न दावि पतिचें मायैक-हृद्-बंधन
ती द्वैपत्न्य-विलोल-कौतुक-रती लोकीं करो रंजन.

---

## शाहीर

— ज. के. उपाध्ये

[ चाल—उद्धवा० ]

या महाराष्ट्र देशांत। उपजलों मीच शाहीर। ध्रु०
राष्ट्रांत नाद घुमवीला। जवळीच अतां उद्धार
यापुढतीं काव्यश्रीला। चढवीन नवा शृंगार
शब्दसंघ फुलविन हर्षें। स्वातंत्र्य तया मिळणार
हलवीन सर्व इतिहास
कांपवीन व्याकरणास
विश्रांति न संगीतास
मेलेले मुडदे म्हणती। उपजलों मीच शाहीर
कवि सर्व इतर ते कवड्या। मी मात्र एक 'कलदार'
कविता त्या म्यांच कराव्या। फिरवाव्या दारोदार
पद्यांतिल कविता कसली। पाहिनाच जी बाजार

निर्लज्ज बनूनि फिरावें
दिसतांच जमाव शिरावें
अपुलेंच काव्य भरडावें
करुं शके कोण मजविण हें । उपजलों मीच शाहीर
रागांची पर्वा कोणा । तालांची वा दरकार
राग ताल दुसऱ्यासाठीं । मी न त्यांत सांपडणार
मी स्वयंभु शंभु वाटोळा । मी असें स्वैर शाहीर
मज हंसतो रसिक नव्हे तो
कवितेंत ताल सुर बघतो
अर्थ वा पाहण्या धजतो
काव्यांत अर्थ जो ठेवी । तो होय कुठुनि शाहीर

---

## कविते ! करिन तुला मी ठार — ज. के. उपाध्ये

[ राग—केदार ]

कविते करिन तुला मी ठार ॥ ध्रु० ॥
पूर्वकवींनीं तुज रस पाजुनि मस्त बनविलें फार
रसबिस आतां मम साम्राज्यीं कांहिं न तुज मिळणार
अलंकारमद-मत्त जहालिस धुंदि उतरितों पार
मोडुनि तोडुनि फेंकुनि त्यांना दृष्टि न दिसुं देणार
पदोपदीं अवसानीं तुझिया करुनी घातक वार
सुवृत्त अथवा सुपदा कशि तूं हेंचि अतां बघणार

पदलालित्यें जनां भुलविलें केले नानाचार
भावाची बहु हांव तुला परि अभाव तुज करणार
नादांतचि रंगुनी गुंगविसि रसिकां करिसी गार
नाद तुझा तो नष्ट कराया समर्थ मी साचार
समृद्ध अर्थें असा मिरविला आजवरी बडिवार
अर्थाचा परि लेश यापुढें तुजला नच मिळणार
कोशावरि तव भार सर्व परि लाविन त्याचें दार
शब्दांच्याचि न कृतिच्या दैन्यें मळविन तव संसार
व्याकरणाच्या अंकीं बसुनी शुद्ध म्हणविशी फार
ठार करुनि परि तया तुझ्यावर ओतिन अशुद्ध धार
अपशब्दांचा असा तुझ्यावर करितों बघ भडिमार
जरी न मेलिस तरि मेल्यापरि होशिल मग बेजार
देश, धर्म वा वीर विभूती तुज न अतां दिसणार
आतां वणवण घुबडासंगें करविन तव संचार
मजलागीं तूं कोण समजशी मी तों कवि कलदार
कलदारचि कां शाहीरांचा फर्स्टक्लास सरदार.

---

# कुठें जासी ?

— वासुदेवसुत कारेकर

[ केशवकुमार व त्यांचे गद्यपद्य भगतगण, क्षमा करा ! ]

" कुठें जासी ?" " व्याख्यान द्यावयाला–
निघालों हा, ठावें न कां तुम्हांला ?
बघुनि चष्मा, हॅट, बूट, सूट, छान,
मनीं समजा, नच मूर्ख पुसा प्रश्न !"

"कुठें तूं रे?" "नुकतीच तार आली,
आमुची 'ती' यायची वेळ झाली;
स्टेशनावरि उतरून घ्यावयाला—
निघालों हा, नातरी हो अबोला!"
"आणि तूं रे?" "त्या तमुक कवीन्द्राचा;
असे स्मृतिदिन साजरा व्हावयाचा
समारंभाची कोण तिथें घाई,
आणि अध्यक्षच तशांतून मीही!"
"कुठें तूं रे?" "जातसें फिरायाला;
तलावाच्या[1] त्या विवक्षित दिशेला;
किती जाती जोडपीं तया वाटें,
गम्य त्यांतिल कळणार ना तुम्हांतें!"
"कुठें तूं रे?" "जातसें नदीकांठा,
दृश्य नामी त्या स्त्रिया अंग धूतां
चित्र काढुनि मासिकीं एक देतों,
असा तरि का खप वाढतो पहातों!"
पुढुनि दिसलें मग मेढें[2] एक येतां
"कुठें बाबा जातोस सांग आतां?"
"वचन देउन फसवीच कुमारी ती,
जीव द्याया जातसें म्हणुनि अंतीं!"

---

१. रंकाळा तलावाचा 'राउंड' तर नव्हे?

२. तोंडावर प्रेतकळा असलेला तो एक जित्या जीवाचा 'जातिवंत' तरुण 'कॉलेजियन्' होता.

## देवाचिये द्वारीं !

— गो. ल. आपटे

( अभंग )

देवाचिये द्वारीं ऊभा क्षणभरी
नजर गहिरी रोंखूनिया ॥
हात जोडियेले नयन मीटले
आणि मग हाले तेथोनीया ॥
हळूच पायांत वहाणा घालोनी
त्वरेनें निघोनी चाललासे ॥

× × ×

अनवाणी होता येतांना बिचारा
देवावरी सारा भार त्याचा !!

---

## साभार परत !

— गो. ल. आपटे

व्याघ्र, हत्ती मारीन खांकुटीला
नाहिं भ्यायाचा केव्हांच यमाजीला !
नाहिं भीती पोलीस शिपायाची
नाहिं भीती प्रत्यक्ष मतापित्याची !

× × ×

परी दिसतां लांबून, पोस्टवाला
भरे धडकी, कांपरें ये जिवाला
हाय ! वाटे, होवोनि नापसंत
'लेख' आला बैसोनि पाकिटांत !!

---

## भोळा शंकर !

— कुमुद-बान्धव

पटला साक्षात्कार मनाला टीकाकार न तूं
प्रळयङ्कर तूं भोळा शङ्कर ! यांत नसे किन्तू
साष्टाङ्ग प्रणिपात आधिं घे—ऐक एक विनती
सदा जागती कृपादृष्टि तव ठेवी मजवरती
त्रिकालदर्शी तृतिय नेत्र तव दिव्य विचित्र महा
जें नाहीं तें दावि नेमकें जादूगार अहा !
शृङ्गी भृङ्गी किती सभोंतीं नाचतात नन्दी
अकाण्ड ताण्डव शिव-ताण्डव कीं प्रळयाची नान्दी
कृष्णसर्प किति सदर्प जहरी गळ्यांत बाळगशी
मस्तक उन्नत ! अर्धचन्द्र तूं सकलां दाखविशी
उग्र परी उपकारक दैवत तूं ! तुज जो भ्याला
नर तो भोळा खुळा बावळा पात्र न जगण्याला
तुझें ध्यान गम्भीर खेळतें नयनीं दिनरात्र
गात गुणांचें स्तोत्र अर्पितों भक्ति-बिल्व-पत्र

---

# रद्दींतील काव्यरत्न

— र. गो. सरदेसाई

[ दिंडी ]

एक दिवशीं कविराज कुणी जाती।
भेटण्याला मित्रास सुप्रभातीं ॥
दिवस थंडीचे— गारठा हवेंत।
नव्या कवितेची ऊब परि खिशांत ॥ १ ॥

काव्य नूतन 'होतांच' कवीराया।
दाखवी तो तें त्वरित मित्रवर्या ॥
पती साध्वीतें एक जसा राहे।
तसा कविला तो रसिक एक लाभे ॥ २ ॥

नव्या काव्याचें गान करुनि दावी।
आणि त्यांतिल माधुर्य तो सुनावी ॥
मान शब्दाप्रति डोलवून मोदें।
तदा नित्यापरि मित्र साथ त्या दे ॥ ३ ॥

काव्य गाउनि कविकंठ सुकुनि गेला।
म्हणुनि मित्रानें चहा मागवीला ॥
आणि चिवड्याचा पुडा सोडुनीयां।
करी आग्रह सप्रेम कविस खाया ॥ ४ ॥

हात चिवड्याला कवी घालणार।
तोंच—
—दंश वृश्चिक करी स्वरें तार—॥
कवी किंचाळे, "कोण कृत्य घोर?" ॥ ५ ॥

—आणि फेकुनि चिवडाहि क्षणीं दूर ।
कागदाच्या कपट्यांत दृष्टि चूर ॥
अश्रु ढाळित मग गद्गद स्वरानें ।
कवी बोले– "हा ! हाय ! मदिय गाणें ! " ॥ ६ ॥

"किती वेंचुनि श्रम रचियलें सुकाव्य ।
मधुर रचना, किति कल्पनाहि भव्य ॥
महत् सायासें छापिलें मासिकांत ।
रद्दिमाजीं जावेंच काय ?—हन्त !" ॥ ७ ॥

भावनेचा ढांसळुनि बांध आणी–।
वाहवीती खळखळा नेत्र पाणी ! ॥
दृश्य बघुनी अति करुण मित्र गेला–।
कळवळूनी, समजावि कवीवर्या ॥ ८ ॥

"शोक मित्रा ! आवरी हा, वृथा रे ।
रद्दिमाजीं जायचें काव्य सारें !
योग्य वस्तू जाणार उचित ठायीं ।
नियम जगताचा बदलणार नाहीं ! ॥ ९ ॥

जशी कवितेमधिं रद्दि फार आहे ।
तेंवि रद्दीमधिं काव्य बहुत राहे ॥
रद्दिमाजीं असतात फार रत्नें ।
हवा शोधाया पोतदार यत्नें ॥ १० ॥

म्हणुनि मित्रा ! लव धरी मनीं धीर ।
आणि आवरि हे करुण नयननीर ॥
दिसे तोंवरि जनतेंत काव्यगोडी ।
मधुर लज्जत चिवड्यांतली न सोडी ! ॥ ११ ॥

---

## बल्लवदूत—

— ना. गं. लिमये, बी. ए., एल्. टी.

[ कवि शिरोमणि कालिदासाच्या आत्म्याची क्षमा मागून ]

( मंदाक्रांता )

आणा कानीं हृदय जन हो ! वृत्त ऐका पुढील
नेत्रांबूतें त्वरित पुसण्या हातिं घ्यावे रुमाल

× × ×

एका पुत्राकडुनि अपुल्या दोष कामांत झाला
तेणें त्याच्या अदय जनका कोप अत्यंत आला;
बोले–" मूढा ! प्रणय करितां नित्य नापास होशी
कांतेचा त्या विरहचि अतां वर्षपर्यंत सोशीं."
शापें गेला थिजुनि, धरण्या आपुली " पाठशाळा "
कंठायाला विरह-दिवसा जातसे तो पुण्याला.
त्याचा होई मुख-शशि फिका, बैसले गाल साच
हातांतोनी हळुहळु गळूं लागलें रिस्ट-वॉच.
वैशाखाच्या सुखद समयीं होति लग्नें सुखांत
रस्त्यांमध्यें विविध फिरती चांदण्याही जिवंत,
ऐशा काळीं कुशल अपुलें स्त्रीप्रती पाठवाया
बोलावीलें सहृदय तयें बल्लवातें क्लबाच्या.
प्रेमार्ताच्या मुळिंहि न मनीं राहतोसे विवेक
आचारीही प्रियजन तया वाटती केंवि देख !!
बोले–" बाबा करमठ, तया राग अत्यंत आला
'मे' मासींही हुकुम करिती येथ ते राहण्याला."

× × ×

आधाशांना बहु सुखविशी देउनी स्वादु अन्न
ऐशी कीर्ती तव; म्हणुनि हा वांचवी दीन मीन.
सोडोनीयां निज-रमणिला या वसंतीं वसेल
मानावें त्या अरसिक पुरा, तो हरीचाच लाल.
खाया प्याया विपुल गमतें योग्य खेडें लहान
राहायाला टुमटुमितसें हें पुणें फार छान;
पाहायाला निवळ, सुभगा योग्य मुंबापुरी ती
जाशी तेथें प्रथमचि अजी घालवायास सुट्टी
झाऱ्याची तूं धरुनि निघसी हातिं ही 'ट्रेड-मार्क'
भेटें माझ्या सखिस, फुलवीं तन्मुखा जेंवि अर्क.
वारंवार स्मरुनि मजला, रक्षिते जीव लोल
ऐसे काढी दिवस वहिनी ती तुझी पीत-गाल.
तेथें गेल्यावरि मज लिही पोंचल्याचें सु-पत्र
विश्वासू तूं, निघ झणिं गड्या तूं पुण्यांतूनि मात्र
आहे मोठा जिवलग तुझा शुक्रवारांत मित्र
तांबोळी त्या पुसुनि पुढतीं मार्ग तूं चाल तत्र.

× × ×

पुणें—

" भांग्या " नामें विदित, नमुनी मारुतीला सकाळीं
तंबाखूचा चघळुनि विडा आण ओठांस लाली;
पाटीवाल्या बघतिल पथीं तूजलागीं कटाक्षीं
सोडावा न स्वपथ तरिही, त्यांजला तूं न लक्षीं.
वर्णायाला पथ शहरिचे पाहिजे कालिदास
जागोजागीं असति विवरें टाळुनी चाल त्यांस.

रात्रीं मार्गीं म्युनिसिपल त्या बत्तिला शोधण्याला–
लागे घ्यावा धरुनि दुसरा दीप हातीं, जनाला.
गुत्त्यामध्यें अवरसम कीं भामिनीच्या सु-ताडी
प्राशोनीयां मज न विसरें, चाखतां और गोडी.
वाटेमध्यें अलिसम नको थांबुं गंधी-दुकानीं
'एक स्वारी' करुनि निघ तूं शीघ्र टांगा करूनी.
ज्यांच्यामध्यें मधुर सुटला केशराचा सुवास
पेढे-बर्फी उठवितिल तीं सुप्तशा नासिकेस
कांद्याचींही उन उन भजीं पाहुनि आननास
येई पाणी धरिशिल तदा खास हॉटेल-कांस,
सौभाग्यातें सतत धरिती, टाळ त्या तूं 'मृगाक्षी'
तांबूलाचा रवंथ करितां बैसती ज्या गवाक्षीं
सज्जामध्यें अडकवुनियां पिंजरा पोपटाचा
पाहाती ज्या हळुच पडदा सारुनीयां चिकाचा
मोतीचौकाजवळ मिळतो फार नामी चहा तो
सोडोनी दे रसिक जरि ही त्यास भारी चहातो
तेथोनी तूं निघ झडकरीं थेट त्या स्टेशनास
घेवोनीयां तिकिट, घुसुनि गांठ तूं थर्ड क्लास.

आगगाडी:—

गाडीमध्यें जरि नव कुणी येइ जागीं बसाया
या झाऱ्यानें बदकुनि तया लाव वीरा! रडाया
गाडीखालीं उतरुं बहुधा प्लॅटफॉर्मीं नकोस
तेणें गाडी रुसुनि तुजशीं, दूर जाईल खास.
रात्रीं झारा जपुनि निज रे, ऊठ तूं सुप्रभातीं
प्रातःकाळीं सततचि नवी देख मुंबापुरी ती.

मोठीं मोठीं सुभग नवहीं मंदिरें ज्या पुरीचीं
जीं पाहातां पडत पगडी आपुल्या मस्तकीची.

× × ×

मुंबई:—

मार्गामध्यें कितिक युवती एकट्या पाहशील
वेण्यायुक्त-प्रचुर-बुचडे बांधिती ज्या सईल.
वामांगीं त्या बहु फिरविती केस, हो वामभांग
ज्या झांकीती विरल मृदुशा पोलक्यांनीं निजांग.
थोडीं मोत्यें गळिं विलसतीं, जाडसें छत्र हातीं,
गालीं खांचा, सुबक दिसते आरशी लोचनीं तीं
नामी बूट स्वपदिं विलसे, उंच टांचा नितान्त
नारी भाषा निज विसरुनी, बोलती इंग्रजींत.

× × ×

मार्गीं कांहीं दिसतिल तुला प्रौढबाळें कुलीन
ज्यांच्या गेल्या भिउनि चिरुटा कीं मिशा त्या पळून !
आमूलाग्रीं बहुत नटलीं बाहुलीं हीं विदेशी
काळ्या रंगें छबि विलसते, ना तरी गोष्ट खाशी
कांहीं लोक स्वकर चुकुनी घालिती अन्य-कोटीं
शेजारीच्या, जप बहु खिसा, त्यांस तूं दावि मुष्टी.
कांहीं शौकी बघशिल सुटामाजिं, तूं अप्टुडेट
दाटीनेंही परि वसति ते दोन वीती घरांत.

मुंबईचीं घरें:—

चाळी तूंतें दिसतिल पुढोनीच भारी सुरेख
देखें बाजू नच, धरिति रे, त्या विडच्या शेण राख.

गेली आहे गजबजुनियां उंच एकेक माडी
दाटीनें तीं खुलत जणुं कीं पारव्यांचीं खुराडीं.
चाळीमध्यें सकल दुनिया सांठली काय वाटे
जाती साऱ्या वसति जवळीं, रंग-भू-चित्र थाटे;
एक्या जागीं किति उरकिती लोक सारे विधी ते
पाहोनी हें नवल गमतें दूरच्या पाहुण्यातें.
शेजाऱ्याचें विदित नच ज्या वर्षवर्षेंहि नांव
तत्रस्थांना स्वपथचि रुचे, अन्य मार्गी न हांव
लक्ष्मीमागें पळति, हृदयीं ठेवुनी भाव पूर्ण.
श्रीविष्णूची घडगत नसे श्रेष्ठ लक्ष्मीच जाण.
साऱ्या चाळी दिसति अलिच्या पोंवळ्याच्या समान
ऐक्याचा या सकल जगता होय आदर्श छान
झोंपेमध्यें शिर भिडतसे, हा ! उशाच्या चुलीला
किंवा लावी चुकुनि नवखा पाय मोरी-तटाला.
जाणोनीया मनुज, महती योग्य काल-स्थलाची
थोड्या जागेमधिंच करिती मुंबई ते 'जिवाची.'
वेळोवेळीं सुटति तिथल्या 'लोकली' त्या धराया—
लक्ष्मीचेही तनय पळती विस्मरोनी स्वकाया.
"राणीमार्गीं" अविरत जणों बद्ध मोटार-माला
जाऊं देई मधुनि न कुणा, मार्ग कीं रोखियेला
राही सेवा करित चपला ट्रामवेच्या मिषानें
हा देखावा नयनिं बघुनी थक्क व्हावें नरानें.
घोड्यासंगें नशिब अपुलें धांवण्या लावती ते
रेसेमध्यें गमाविति किती सान वा थोर हातें !

नाहीं ज्याचा 'शनि, बुध' कधीं नाटकावीण जात
शोकी ऐसे बघशिल, सिनेमा जयां रोज भात.
तेथें घाली हळुहळु जनां बॅकबे थंड वारे
गंडेऱ्यातें मुखिं चघळिती वाळुकेमाजिं पोरें
किल्ले तेथें रचित असतां शेंगदाण्यास खाती
कांहीं नारी–पट सुरधनू देखण्या रोज येती.
"भारी गर्दी सकल दुनियेची वसे येथ घाण
मागें, खालीं, पुढतिं, वरतीं लोक मुंग्यासमान
श्वासोच्छ्वासा मिळत न हवा, सोय मृत्यूस खाशी"
ऐशा शब्दें हिणविति खुळे लोक मुंबापुरीसी.
जागोजागीं उघडिति दुकानें पहा अन्नदाते!
पोळ्या, लाडू, रुचिर गव्हले, शेवया पापडांतें––
वाढोनीयां विसर सकलां पाडिती ते घराचा
वर्णूं वाचें लघुमति किती थाट मुंबापुरीचा?
झाऱ्यासंगें जपुनि पथिं तूं टाळ मोटारलॉरी
केळी-सालीवरि न घसरें फूटपाथीं गटारीं
कासोट्यातें कसुनि करिती घोळका कोळिणी ज्या
त्यांच्यांतूनी सुपथ करूनी मद्गृहा नीट तूं जा.
माझें घर:—
ठाकुर्द्वाराजवळिं विलसे "न्यू विलिंग्टन् सलून"
तेथोनीयां भवन अमुचें उत्तरेलागिं सान.
काळ्या रंगीं बहुत चमके भिल्ल नारीप्रमाणें
दृष्टीला तें दुरुनि पडतें ऐशिया कारणानें.
छोट्या बागेमधिं विलसते बाल ऐशी कण्हेरी
मत्कान्तेनें निशिदिनिं तिला पाळिलें आजवेरीं.

भिंताडाच्या वर बहर तो लागलासे तयाचे—
हातीं येती सहज अगदीं गुच्छ भारी फुलांचे.
दारीं ओटीवर बसतसे आमुचा श्वान मोत्या
भ्यावें त्यातें मुळिं न, बहु हो तो मवाळ प्रकृत्या.

होई मंजुध्वनि हलुनियां बांगड्या पांचसात
ऐशा तालीं शिकवि रमणी यष्टि घेण्या मुखांत
ती या वेळीं तर मजविणें फार आहे विलोल
होई कॉफी सुमधुर कशी साखऱ्यावीण ? बोल,

नाहीं शक्ती मुसळ धरण्या तंडुला कांडण्यास
रांगोळीला विमुखचि असे, वा सडा घालण्यास.
तारुण्यानें मुसमुसुनि ती कोमलांगी विराजे
दंतश्रेणी जणुं विखुरल्या मौक्तिकातुल्य साजे

चावे बाळ्या उगिचाचि, तिचे गालगुच्चेहि घेई
तेणें लाली सुकिसलयशी गालयुग्मांस येई.
आहे भारी कृश तनु तिची, कांहिं गोडी न अन्नीं
नेत्रीं राहे सतत जल तें, नारळीं जेंवि पाणी.

जी अर्धांगी गजगति फिरे अप्टुडेट् चप्पलांहीं
बा आचाऱ्या ! बघशिल अशी सुंदरी लोचनांहीं.
माझ्या दुःखें बहुत झिजते जेंवि कीं शीसपेन
दुःखामध्यें सुखचि म्हणुनी, गोड खाण्यांत मग्न

शोकें वाळे त्वरित गव्हले पापडाच्यासमान
साबूफेनासम जिरतसे, या गळ्याचीच आण !
मोत्यापाशीं बघशिल तिला गोडसें बोलतांना
"मोत्या बाळ्या, स्मरसि अजुनी काय रे मत्प्रियांना ?"

वा जात्याचा मलिन वसनीं घट्ट खुंटा धरोनी
गातांना ती मजविषयिंच्या रम्य ओव्या रचोनी.
काढी ऐसा दिन, परि तिला यामिनी जात नाहीं,
लोळे भूमीवरि, तिज नसे झोंपही मत्कुणांहीं

गाद्या गिर्द्या हुडकित तयांसाठिं भार्या असेल
ग्लासामध्यें करिं धरुनि वा टाकतांना दिसेल.
डावा डोळा, बघुनि तुजला मत्सखीचा लवेल
किंवा तीतें बहु नरवरा ! झोंप आली असेल.

तेव्हां झारा हत्तुनि हळू ऊठवावें तियेस;
जागी होतां पुढिल वच हे सांग तूं सावकाश.
"बाई ! दंत-ब्रश-सम झडाया तुझा नाथ लागे
जर्दाळूच्या सम सुरकुत्या गालिं, त्याच्या वियोगें.

आहे त्याचें कुशल तरिही पाठशाळेंत आज;
'आहे ना गे कुशल तव तें ?' तो पुसे जाण तूज.
लाडानें तूं रुसलिस असें चित्र काढोनि रंगें.
भिंती-पृष्ठीं प्रियतम तुझा प्रेमरागांत रंगे

येती डोळे भरुनिच, भली शिंक तों हाय ! येते.
देवा चित्रांतहि न खपते गे तुझी भेट कान्ते !
तैशी माझ्याजवळ वदला आणखी एक गोष्टः—
"मागें निद्रावशचि असतां नाटकाहूनि थेट—

प्रेमें तो ये, परि दचकुनी तूं तया लोटलेंस
स्वप्नीं वाटे शयनिं शिरला चोर कोणी खवीस !
ही एकान्तामधिल अगदीं खूण ऐकोनि आतां
कान्ते माझें समज कुशल, स्वस्थ हो, सोड चिंता.

ताताज्ञेच्या पुढतिं दुसरा काय आहे उपाय ?
स्वप्नीं भेटूं उभय सखये, जोंवरी शाप होय."
माझें झाल्यावरति सगळें कार्य ज्या आत्मकार्या
लाखों लग्नीं तुजसि जिलब्या लाडु लाभोत खाया
जें जें वाटे रुचिर तुजला, खाद्य तें तेंच भोग
होवो ऐसा न तुज मदिरा-भांग-गांजा वियोग !"

---

ठाणें

## सुगृहिणी

— दत्तप्रसन्न कारखानीस

[ जाति—शूर्पणखा[१] ]

" गेलें तुझ्याविण अडून—रामा[२]! काम गेलें तुझ्याविण
अडून ॥ ध्रु० ॥

किती वाट तुझी मी पाहूं ?
शिव्या किती तुला मी देऊं ?
घेसि सदा न् कदा कां छळून्—रामा० !

भांडीं-कुंडिं हीं पडलीं तशीं
नच चहासही कप-बशी !
धुणिं जातीं सारीं रे कुजून्—रामा० !

---

१. नांव 'सुगृहिणी' परंतु जाति 'शूर्पनखा'—हा विरोधाभासालंकार आहे.
२. मुंबईस घरकाम करणाऱ्या गड्यास 'रामा' असें संबोधिलें जातें.

घरिं दारीं केर सांचला
रामा ! कुठें रे तूं झिंगला ?
जाइ कंबर माझी खचून्–रामा ० !

–आतां येतील मंडइंतुनी
भेंडि, आळू, भाजी घेउनी
अन् तुझा न पत्ता अजून्–रामा ० !

'हपिसाची' वेळ होइल
तरि थंडच माझी चुल
मग जातिल 'ते' कडकडून–रामा ० !

× × × ×

मति बाइचि विस्मित झाली
तोंच 'स्वारी' घरीं पातली
परतली गालोगालीं हंसून्–उपाशी तशीच गेली रुसून्

---

# सेन्सॉर

—व. रा. वैद्य

[ दिंडी ]

कवी उठला सोडुनी झोंप गोड
हातिं घेउन बैसला वही जाड
काव्य खार्डियलें तीस, स, ला, ना, तें,
रसिक नव्हता परि जवळ ऐकण्यातें. १

होति अर्धांगी, परि न चारुगात्रा
कवी नैराश्यें कांठितसे यात्रा
काव्यसंपत्ती एकला विसांवा.
राजहंसीस्तव हंस झुरत जावा ! २

जान कुर्बानी कराया न कोण
तटीं तळमळतो जलावीण मीन.
कुण्या कल्पित आदर्श कामदेला—
मनीं आणुन चालवी लेखणीला ३

काव्य-चित्रांचा तीच विषय झाली
तिच्यावांचुन ना एक ओळ आली
काव्य झालें उत्कृष्ट हर्ष झाला
गात नाचत कवि हर्पीसांत गेला. ४

पत्नि पाही तें वाड उघडलेलें
गीत वाची नुक्तेंच लिहीलेलें
कुण्या सवतीला दिलरुबा जिवाचा
कवी अर्पितसे हार सारसांचा ५

जणों नागिण दुखवली जातिवंता
वाहि लाखोली शिव्याची स्वनाथा
फिरे शेळीच्या सुरी कंठनाळीं
वही निमिषार्धीं कव्हर-मात्र झाली. ६

काव्यमोदें उन्मत्त कवी झाला
आणि सायंतानिं गृहाप्रती आला
वृत्त कळलें तों हदरला मनांत
खचे कंबर भूवरी झेंप घेत ७

"नव्हे भार्या गत-जन्म वैरिणी ही
क्षुधित वाघिण स्वप्रजा खात जाई"
"काय भकतां हं, जीभ आवरा ही !
कोण असली वंचना मनीं साही ? ८

धर्मपत्नी ही नान्दते सजीव
कुण्या सटवीवर ठेवितसा जीव ?
नाहिं असले मी साहणार थेर
मला निर्दाळुन काव्य करा स्वैर ! ९

नका आणूं काव्यांत सुंदरीला
आणि चालूं द्या काव्यनिर्मितीला
थंड झाला कर लावि कपाळाला
नयन-युग्मांतुन अश्रुपूर आला १०

× × ×

कवी अंतरला काव्य-कन्यकांना
आणि अंतरला नियतकालिकांना
त्याच वर्षीं ये खोट पोष्टखातीं
होइ वृत्तांच्या बचत पोष्टखातीं ११

# गाजराची पुंगी*

—बाबुलनाथ

चाले गोंधळ नित्य काय कसला श्रीशारदा-मंदिरीं
जावें जेविं तदा तिथें झडतसे आवाज कांहीं तरी
फुंकी 'शिंग' कुणी सुरू न अगदीं झाली 'तुतारी' कुठें
देई थाप 'डफावरी' बडविलें कोणी न जों 'चौघडे'

शाहीरी सरतां सुरेल 'मुरली' कोणी तरी वाजवी
'पांवा' ऐकुनि 'बांसरी सनइ'ला हाताळताती कधीं !
'सारंगी'स्तव भांडतो 'तुणतुणें' घेऊनि तो गोंधळी
कोणी शाहिर 'बॅंडवादन' करी काढून वृत्तें खुळीं !

पोराचा कुणि वाजवीत बसतो 'घुंगूरवाळा' कुठें
त्याचें पाहुनि तें—कुणी 'खुळखुळा' घेतोच हातामध्यें
काढी 'बोल पिपाणि'चे रडुनिया काव्यांत कोणीतरी
त्याला साथ करावयास दुसरा हातीं 'नगारा' धरी !

कोणी घालित 'शीळ' ती फिरतसे काव्यांत वेड्यापरी
बाधा भूतमयी जडून 'कवडा' त्या 'गर्जनां'ना वरी !
जो जो तो उठतो 'विलाप' करितो—मेलें न कुत्रें जरी
'बोंबाबोंब' तशी—जरी न शिमगा काव्यांत कोणी करी

वेड्यांचा असला जिथें भरुनिया बाजार गेला असे
मी आतां करुं काय स्वस्थ बसुनी ? हो चित्त वेडेंपिसें !

*नुकत्याच प्रसिद्ध (!) झालेल्या "गाजराच्या पुंग्यां"शीं या कवितेचा अर्थाअर्थी कांहींहि संबंध नाहीं. हें आधींच सांगून ठेवलेलें बरें.

वृत्ती गाजरपारखी करुनियां त्यांच्यामध्यें नंतर
जादूच्या पिशवींतुनी नविन मी हें काढितों "गाजर"
पुंगी वाजवितों अतां बनवुनी त्याचीच काव्यांतुन
नाहीं ती जर वाजली तडक मी खाऊनियां टाकिन

---

# प्रबोधन

— पां. गो. लोहोकरे

वेळ न कां गुणिबाळा झाला ? झोंप किती घेशी ?
सूर्य चालला मध्यान्हासी, अजुनि न कां उठशी ?
तव चहा निवुनि बघ केव्हांचा हा गेला !
मंडईहि आली केव्हांची सदनाला
नउ वाजुनि गेले, पिता कचेरिंत गेला
ऊठ रान मोकळें पडे, हो काळ सकळिकांशीं ॥ १ ॥
तुजविरुद्ध चाले फंदफितूरी येथें
ही यमी धाकटी शिरा किती बघ घेते
आईहि तुझी हा ! साह्य अशा कृत्यांतें
ऊठ, ऊठ, अवतारी पुरुषा, वेळ न ये ऐशी ॥ २ ॥
हें पीठ मिठाविण अलग, झुरत विरहानें
दहिंदूध जेथिल्या तिथें खिन्न दुःखानें
ही जयद्रथासम मानि हिंडे डौलानें
ऊठ, झणीं केधवां तयांचा समाचार घेशी ? ॥ ३ ॥

परपोरांच्या आइबापांचा उद्धार
चालुनी, भांडणें व्हावीं वारंवार
तीं तुजविण आतां कोण सख्या करणार ?
ऊठ, ऊठ, कधिं गृह डोक्यावर गुणवंता घेशी ? ॥ ४ ॥

कवण्याहि विशेषणिं आळवुं तुजलागुनी ?
तव सुगुण गावया भाषा दुबळी जुनी
हो जागृत वेगें विघ्नकरा सन्मणी
तव लीला बघण्या उत्सुक म्हणुनी विनवितसें तुजशीं
सूर्य चालला मध्यान्हासी अजुनि न कां उठशी ? ॥५॥

---

## भो, भो, भो !

— पु. श्री. काळे

[ एका कुत्र्याची करुण कहाणी. ]

( शुनीत )

भो, भो, भो ! स्तवितों तुला निशिदिनीं मी श्वानसा श्वान जो,
तो हो अज्ञ, अधीर सर्व वदती मी भुंकतों, शापितों !
माझे 'गुर्गुरु' बोल सद्गुरु तुझ्या ध्यानाविणें येति का ?
अर्थाचा सगळा अनर्थ करिती वानूं किती निंदकां ?

ईशा ! ते तव पाद ठेवुनि मनीं जीं मी पदें चाटितों,
त्या हे 'लांगुलचालनादि' म्हणतां खेदें गळा दाटतो.

प्रेमें हर्षभरें जरा कधिं मधीं पुच्छासि मी हालवी,
'गोंडा घोळितसे' म्हणोनि हंसती कित्येक रागावती !

त्यांच्या क्रुद्ध मुखा बघोनि करितां मी शेपटी खालतीं,
तों हे " घातलि शेपटी " म्हणुनिया बोंबा पुन्हा मारिती !

शत्रूंना पळवी तुटोनि पडतां; सेवा इमानें करी,
जाईना मम शृंखला वरि मिळे तो मार पाठीवरी !

एखादा मज वागवी निजसवें, पार्थी असो वाहनीं;
" थोरांच्या घरचें " असें हिणवितां मी खिन्न होई मनीं.

× × ×

चोरोनी घृत-शर्करादि पचवी तीं मांजरें मूषकें;
आम्ही तृप्त असूं मिळेल 'तुकडा फेंकून' देती सुखें !

कोणी आप्त स्वकीय मार्गे दिसतां मी भुंकतों-हुंगतों,
'शंका' ती 'लघु' ही जराहि करणें भिंतीकडे धांवतों !

नाहीं पाउल तें पुरें पडतसे विष्टेवरी मृत्तिका–
टाकील्याविण; शिस्त जी, वरितसों जी जाणवे शोधकां ?

आम्ही 'भ्याड' जरी तरी गुरगुरूं तोंडावरी–पाठि ना !
वृत्ती जी दिसते तशीच असते मागेंपुढें कांहिं ना !

पुच्छाची समवक्रता जनिं दिसे ती राहते सर्वदा;
आम्ही त्याच गुणें प्रसिद्ध असतों कोणा न ती आपदा !

भो, भो, भो ! अमुची तुझ्या चरणिं ही आहे अतां प्रार्थना !
हे पुच्छा नर-मानवां जगिं झणीं वा शृंग, ती गर्जना !

[आणखी दोन ओळींनीं दोन "शुनीतें" पूर्ण झालीं असतीं; पण आमच्या कुत्र्याची कहाणी थोडक्यांतच संपली असल्यामुळें दुसरें 'शुनीत' अर्धवट ठेवणें भाग आहे. कवीसाठीं कविता असते; कवितेसाठीं कवि नसतो ! निरंकुशाः कवयः !! शिवाय आमच्या कुत्र्यावर जे कुणी कुत्रे भुंकणार आहेत त्यानें आमच्या 'शुनीता'ची समस्या पुरी होणारच आहे !]

५८६८

## विलायतेच्या यात्रेची तयारी — न. चिं. केळकर

"तुम्हा जाणें विलायतेला
शस्त्रांवीण शिकारीला
सहा हजार मैल दूरी
देव तारी त्या कोण मारी
मरण न तरी दुखणें-बाणें
पश्चात्तापाची वेळ न येणें
पहिलटकरणीस सुईण
पूर्वानुभव विशेषगुण
मग मेळविले कोण कोण
प्रवाशा उपयोग म्हणून
तरी लागा तयारीला
वीर तरी केविं जाय ?
जावें लागे सागरान्तरीं
परी सिद्धता असावी
त्याहीसाठीं उपाय करणें
या नांव दूरदर्शित्व
नवख्या प्रवाशा मित्र सुजाण
ऐसा कोणी बोलवा."
आप्त प्राज्ञ विचक्षण
देतों वर्णन यथामति

*　　*　　*

आले मिस्तर फॅशनेबल त्यांजकरितां मांडलें टेबल
कारण विलायतेंत सकळ खातांपितां बोलताती
म्हणती मिस्तर फॅशनेबल खर्च करावा लागेल सढळ
जरी होईल थोडा पाल्हाळ यादी करा वस्तूंची
पांच तऱ्हेचे कोट बेतणें तितकींच हवीं पाटलोणें
वेस्टकोट जाकिटांचें लेणें त्यांत स्वयें समाविष्ट
कापड असावें बहुत उंची ती काय तंबाखूची चंची
म्हणोन त्यांत सदभिरुची न मानोनी चालेल ?
कापड असावें भरदार कापड असावें ऊबदार
कापड असावें मजेदार परी सर्वही लोकरीचें
विलायतेंत कापूस जात परी त्या तेथ कोणि न पुसत
कापशी वस्त्रें विणतात परी तुम्हांकारणें
'पोझिशन' राखणें राहो परंतु तेथें थंडी कोण हो
अब्रूपरी प्राणाचा लाहो तरी कापड लोकरी
कापड होईल सहज पसंत परी कोणता शिंपी बेतीत
सर्व मर्म आहे त्यांत म्हणुनि चिकित्सा करणें लागे
एक नूर अदमी दस नूर कपडा हाच सुधारणेचा निवाडा
म्हणोन चतुर शिलाई निवडा त्यांतूनही इंग्रज
ज्याचें काम त्यानें करावें नेटिव्हांनीं दुरून पहावें
सूट कशाचें पारखावें नाणें इंग्रजांनीं इंग्लंडीं.
'सूटा'ची ही मोठी कटकट परी काय उपयोग येवोनि वीट
विलायती सफरीचा घाट घातला तरी सोसावें
पहिला कपडा दुसरी हजामत दोघांचेंही तेंच महत्त्व
सुधारणेचें सर्वस्व सत्त्व यांतचि असे सांठविलें
लोमशत्रुत्व अंगीं आणा धरा पुरा हजामाचा बाणा

सर्व लपवाव्या खाणाखुणा
सक्षौर श्मश्रू अभिमत
अंगिकाराल तरीच हित
प्रतिप्रभातीं दिसावा चेहरा
सोडुनि आल्या क्षणाहि पुरा
चेहरा असावा तुळतुळीत
आपुलेंच मुख प्रतिबिंबित
आतां वस्तु कोणत्या उरल्या
फॅशनेबलां भल्या भल्या
बूट पाहिजे विलायती
परि रोगणें तुळतुळतीं
बूट लेसेची ब्रह्मगांठ
शिका ती करूनी खटपट
पाटलोणीचीं 'ब्रेसें' हवी
दोन्ही एकदम उजवीं डावीं
स्त्रीस जैसें मंगळसूत्र
नाट्यप्रयोगासी रात्र
पाहतां वीतभर चिंधोटी
न वापराल ही गळोटी
गंगे जातां गंगादास
जो असेल अभिमत विशेष
गळबंदावीण शर्टबटण
जेविं पदराविण स्तन
आतां केशमंडन-विचार
प्रथम करणें संहार

चेहऱ्यावरी केसाच्या
सुधारणावाद्यांचें हें मत
होईल कांहीं इंग्लंडीं
कीं हा बाळ मातेच्या उदरा
झाला असेल नसेल
कीं दुसऱ्यानें पाहतां त्यांत
वाटे त्यास दिसावें
त्या पाहिजे सांगितल्या
वेळीं विरस पडतसे
पेटंट चामड्याचीच ख्याती
तेही कांहीं घ्या सवें
दिसे गोंडस बसे निपट
सर्व विद्या येणें हवी
तींच मुशाफरांचीं जानवीं
खांद्यावरुनी घालतात
पूजासाहित्यीं अभिषेक-पात्र
तेविं पोषाखा नेकटाय
परंतु तियेची प्रतिष्ठा मोठी
तरी म्हणतील रानवट
तमसा-तीरीं आंग्लवेष
तोच अवश्य आदरावा
मानिला असे निषिद्धदर्शन
पतिव्रता कुलवधूचा
थोडक्यांत सांगतों साचार
शेंडी नामक बटीचा

असेल ती हिंदुत्वाची खूण
तेथें मस्तका भूषण
गवती मैदान कापलें
मध्यें भागें दुभंगलें
केशविधान परोपरी
एक शेंडी आणि 'भादरी'
ऋषीशाही बोकडशाही
अन्य प्रकार आणखी कांहीं
सोनेरी सिगार सुंदर केस
लागती आपणा ओढण्यापरिस
विडी ही न बिडी ती समिध
तत्साक्षिक मैत्री प्रसिद्ध
नसेल ओढण्याची चाड
भल्याभल्यांची मैत्री गाढ
जरी असती डोळे बरवे
बिननंबरी भिंगाचे घ्यावे
कांहीं असावे आणिक रंगी
घालितां वाटे लोकांलागीं
रंगी चष्मा डोळां चढे
ते न मात्र उलट बापुडे

परि जातां विलायतेस आपण
वपित केशकलापाचें
तेवीं मस्तक दिसावें भलें
तरी त्या गुण विशेष
करावें रुचिरत्वें तरी
यावीण कांहीं चालेल
नीग्रोशाही टक्कलशाही
परी होईल विस्तार
सिगारपेट्या दहावीस
दुसऱ्यास अधिक द्यावया
क्षणांत होमाग्नि होतो सिद्ध
करितां होते कायमची
तरी सवयीची करावी वाढ
पाडुनि देते ही वल्ली
तरी सांगातीं चष्मे हवे
चष्मा वाढवी सौंदर्य
लांकडी झापडीं दोहीं भागीं
क्षणैक घोडा टांग्याच्या
पाहतां येतें लोकांकडे
आपणासी न्याहाळूं शकती

* * *

असो फॅशनेबल उठले
नंतर समाचारा आले
तेच होवोनि म्हणती सत्वर
परी आधीं भोजनाचार

शेकहँड शिकवोनि गेले
दुसरे मित्र खाद्यगुरू
इतर सर्व राहो विचार
तुम्हां शिकला पाहिजे

वनस्पत्याहाराची प्रौढी मिरवा हिंदुस्थानांत बापुडी
परी मांसाहारीं उडी घातली पाहिजे परदेशीं
चार-पंचमांश जग मांसाहारीच आहे मग
व्यर्थ शुद्धाहाराची रग जिरली पाहिजे सुविचारें
पापपुण्य कोणी पाहिलें केवळ शरीररक्षण पहिलें
सर्व धर्माधिष्ठान भलें शरीर असें मानिती
'जीव जीवाचें जीवन' हें तों प्रसिद्ध मनुवचन
त्यातें अवमानितां जाण धर्मव्यवहार उल्लंघती

मांसाहारीं न मुळीं पाप दोरीस म्हणूं नये साप
सर्व योजना आपोआप परस्पर झाली असे
खाटिकें स्वगृहीं मारिला बबर्जीनें शिजवियला
आपण फक्त मुखीं घातला यांत कैचें पापाचरण
हिंसा म्हणावें कशाला हेंच न कळे मुळिं आम्हांला
ब्रह्मदेवाचा बाप बोलला 'हिंसित पूर्वींच मृत असती'
कांटा म्हणजेच त्रिशूल सुरीचें 'नंदक' खड्ग मूळ
चमचा 'यज्ञस्रुच्'चि केवळ सकल खाद्य पवित्र करी
कढीभाताचें खूळ पुरें हंसतील इंग्रजांचीं पोरें
शरीरप्रकृतीसही बरें म्हणोनि मांस स्वीकारा
खावीं उकड-अंडीं सकाळीं दुपारीं कुक्कुटबाळें कोंवळीं
मातापितर संध्याकाळीं वंशक्षय एका दिवशीं
येणें मागें उरत न कोणी दुःख करावया लागोनी
बोलती सर्व तत्त्वज्ञानी मृत न दुःखी उरला तो
गोमांसासारखें खाद्य नाहीं पोषक जगतीं दुसरें कांहीं
विहित-निषिद्धाची ग्वाही परदेशीं ईश्वरीं सोंपवावी
कोणाची जीभ कोणाची शेपटी एकाचें काळीज दुसऱ्याची ओटी

विविध रुचिर खाद्यवटी मांसाहारीं लाभतसे
परदेशगमन नव्हे ती थट्टा वरतीं पडे कामाचा रट्टा
म्हणोनी तुम्ही तुमचा कोठा पुष्टसमृद्ध ठेवावा
अन्न खावोनि बनविणें मांस यासि जठरा पडत आयास
भक्ष्य-भक्षक दोन्ही समरस त्वरित होती मांसाहारीं

* * *

असो, यावरी आले सभ्य तदुपदेश लाभ अलभ्य
कारण आम्ही जन्मादारभ्य देशी सभ्यताच जाणों
मिस्तर सभ्य मग म्हणती इंग्रजांची सभ्यतेंत ख्याती
म्हणोन शब्दाची व्याख्याव्यासी जाणून ठेविली असावी
सभ्यपणांत हिंदी लोक प्रमुख ऐसा आहेच लौकिक
परंतु स्थलपरत्वें फरक सर्व गोष्टींत पडत असे
अनोळख्याशीं बोलूं नये जरी कोणाचा प्राण जाये
उद्दामपण मिथ्या विनयें झांकोन सर्व काढावें
कोणाकडे डोळे भरून पाहतां सभ्यतेचा खून
होतसे म्हणुनी नेत्रकोण केवळ त्याकडे फिरवावा
आभारप्रदर्शन खिशांत भरोनि घ्यावें दिवसरात
त्याइतुका इतर न होत नित्य खर्च कशाचाही
थँक्यू शब्दें उपकार संपला मग काय देणें तुझ्या बापाला
ऐसाच त्याचा अर्थ झाला हें तों जग जाणतसे
तैसेंच मागा संवग माफी अपकाराची साफसुफी
आपोआप होते फुकीं मग अपराधा काय तोटा
स्त्रियांस सर्वश्रेष्ठ मान त्या येतां द्या उत्थापन
ना तरी तुम्ही देहभान विसरलां ऐसें म्हणतील
जेथें नारींची पूजा करिती देवता तेथें आनंदें रमती

हेंच स्मरोनी सर्व रीती आचरती लोक इंग्लंडीं
स्त्री-पुरुष एकत्र दिसतां शंका-कुशंका मनीं न घेतां
आदरावीं सम उभयतां मग ते असोत कोणीही
स्त्रीची वस्तू पडतां खालीं एकदमचि मारोनि उसळी
परक्यानेंही हातीं दिली तरीच त्यास सभ्य म्हणती
सुंदरगात्री सुंदरवदना ही कोण असे आपली ललना
गौरवपूर्ण उत्तान प्रश्ना करणें हीच सभ्य रीती
परिचित स्त्रीस आपला हात खुशाल द्यावा इतरांदेखत
ती 'शिव्हलरी' 'गलांट्री' होत इतर अर्थ कांहीं नसे
हे शिष्टाचार दिसती विपरीत परंतु ही त्या देशाची रीत
तियेचें शिक्षण द्यावें येथ मग परदेशीं पाय घाला

* * *

तज्ज्ञ मित्र गेल्यामागुती आले 'देशी' मित्र सोबती
तैसेंचि आप्तइष्टांप्रती भेटण्या जाणें प्राप्त झालें
त्यां सर्वांहीं केला उपदेश प्रकृति सांभाळण्याचा विशेष
साधन-सामुग्रीचा आदेश कोणाचाही अवमानवेना
खाद्य आवडे यास काय याचा मानसीं निश्चय
करोनी प्रत्येकीं पाथेय निरनिराळें बांधियलें
कोणी केले लाडू डिंकाचे उपयोगी जे प्रवासाचे
म्हणती टिकाऊ हेंच साचें इतर नासोनी जाईल
कोणी आलेपाक बनविला कोणी नारळ दिधला ओला
कोणी वाळल्या खोबरी भकला आणोनि देती तांतडीनें
कोणी म्हणती लोणचें द्यावें पापड, पोहे, म्हणती न्यावे
खिसमिस, खारका, अवश्य हवें ऐसें सुज्ञ कोणी म्हणती
मुख्य ते भूईमूग राहिले त्याविण इतर कांहीं न भले

तैसेचि फोडोनि गुळाचे भेले
मोठा खडा घ्या म्हणती
होतां होतां माजली गर्दी
पडशी यानेंच भरली अर्धी
इतक्यांत आंत आली वर्दी
वैद्यराज आल्याची
तेव्हां म्हणती वैद्यराज
तुम्हां परदेशीं कामकाज
परी आरोग्याचा इलाज
घेतल्याविण जाऊं नये
देशी प्रकृतीस औषधें देशी
परदेशी मानवतील कैशीं
म्हणोन कांहीं देईन खाशीं
घ्या तीं तुमच्या संग्रहीं
पनवेलचे ते पुराणिक
किंवा झंडूभटजी नामक
वैद्यवर्यांचीं दुकानें संमुख
औषधास हो काय तोटा
हवे ते देशी रोग जुने
किंवा नवे इंग्रजी नमुने
सर्व संहार आपुल्या गुणें
करितील आमुचीं औषधें
अवरोध हेंच असतें जाण
प्रायः सर्व विकारकारण
म्हणून पहिलें त्रिफळाचूर्ण
कुपी भरोनि घ्या जवळी
हिरडा बेहडा आंवळकाठी
जो नित्य घाली निजपोटीं
तया जगजेठी उठाउठीं
शौचास साफ करवील
तैसी मात्रा सूतशेखर
सर्व प्रवाशांचा आधार
वातपित्तांचा संहार
सदा निश्चयें करित असे
खाद्य औषधें झालीं तरी
राहिली सुगंधौषधि सुपारी
तिची आठवण नित्य दुपारीं
झाल्यावीण केविं राहे ?

* * *

इतक्यांत आले उपाध्ये भट
त्यांना लागलीसे चुटपुट
म्हणती ब्राह्मण्यरक्षणाची वाट
काय केली सांग पां ?
प्रायश्चित्ताचा विचार
सावकाश करूं आल्यावर
परी अवश्य न्यावें बरोबर
यज्ञोपवीत मंतरोनी
पवित्र सूत्राची ब्रह्मगांठ
सर्व पातकांचा नायनाट

करिते म्हणोनी खटपट
मग भिक्षुकाचे अड्ड्यावर
आमचे यजमान धर्मावतार
प्रवासीं मनुष्य काय करितो
अभिनिवेश तयारींत दिसतो

माझी सर्व चालतीसे
मी गर्वानें करीन जाहीर
जानवें विलायतेसि नेलें
तें कोण कोणास विचारितो
तेवढा आम्हां ग्राह्य पुरे

* * *

असो. ऐसी सर्व तयारी
देवोनि घेवोनि परोपरी
सन एकोणीस एकोणिशीशीं
'मनोरा' आगबोट खाशी

करोनि गांठली मुंबानगरी
आशिर्वाद लहानथोरां
एप्रिलाच्या उपान्त्य दिवशीं
आम्हां घेवोनी निघाली

---

# कांहीं पानें

— ह. स. गोखले

[ ह्या पानांत कांहीं त्राण नाहीं असें जर कोणाला वाटलें तरच मी त्याला धन्य म्हणेन आणि स्वतःला समजेन.]

(उपजाति)

प्रत्येक झाडावरि पान आहे
वारा तयाला झुलवीत राहे
झुळूक त्याची कधिं लागतांच
थोडें तरी हें मन वेधतेंच !

पत्रावळीचीं जितुकीं सु-पानें
केळीस त्यांमाजि न कोण वाने ?
बेतास मोठ्या उपयुक्त तेंच
फेका परी जेवण संपतांच !

नादिष्ट मारीत सदैव तान
तेणें करी पिंपळपान ताण !
जातां बिचारें अपुलें गळून
गाईल त्याचें मग कोण गान !

कांटे कुणाला कवणास ताठे
आकार ना एक कुणी उभंटे
कुसें कुणाला, कितिकांस दांत
गुणी कुणी तो कुणि घातपात !

सर्वांहुनी सानच चिंचपान
संबंध त्याचा न कुठेंच जाण.
तदंतरात्मा डवरून राहे
डुले खुले वेळिं गळून जाये !

हें शेवटीं पान अतां विड्याचें कापा अर्धीं नाकच नासक्याचें !
लावा चुना कात विनंति हीच होवो न हें तीक्ष्ण तसें कडूच

## खंडु नापित

—मंगेशराव तेलंग
( 'संगीत हजामत' कर्ते )

[ चाल—पांडु नृपति जनक जया० ]

खंडु नापित जनकजया
माता सखू क्षुरितनया
नाऱ्या माद्या बांधव जया
नामें सधन जो ॥ १ ॥
अर्पियले यासि शिरा
तया लोक-क्षौर-करा
कापि केश चराचरा
कंठ चिरियला ॥ २ ॥

ता.
ठाणें.

---

## मध्यान्हीची भूपाळी

— प्रो. के. ना. वाटवे

[ " घनश्याम सुंदरा श्रीधरा " या चालीवर व याच अर्थानें ]
( दुपारीं एकाचे सुमारास वर्ग चालला असतांना निद्रासुख घेत असलेल्या कॉलेजांतील एका मित्रास— )

— १ —

यथेच्छ भोजनकरा, खंबिरा, निद्रादेवीवरा,
उठिं लवकरि प्रियवरा तास, हा आला संपत खरा ॥ ध्रु० ॥
पहिल्या तासा चुकवुनि होते घोरत जे सदनीं
येती सारे मित्र तुझे ते, उमज कांहिं रे मनीं

वाट पहाती द्वारिं सर्वेही, खुणविति तुज हातें
ऊठ फिरुनि का टेंकिसि डोकें, झांपड का येते !
चिवडेवाली तिष्ठे घेउनि पाटी जडसि शिरीं
फळेंहि ताजीं, खमंग चिवडा, आलें, लिंबू वरी
चाल दुसरी—मुक्तता होऊं पाहे । वर्गापासुनियां बरें
अन्या तव सुहृदां । नाखुष होते जे सारे
उठिं लवकरि प्रियसख्या, मिसळ जा, मित्रांमाजीं झणीं
मुख प्रक्षाळुनि 'टिफिन' चालुं दे, शंका नच हो मनीं ॥१॥

— २ —

नाटक रात्रीं, जडान्न भोजन, दुःसह रवि तापे,
चिंता-विरहित हृदय असलिया, मूळ नको झोपे
नाहिं आणिली तुवां आज कां मेंथालाची कुपी !
निद्रानाशा युक्ती आहे अचूक ही सोपी
वायू उडवी बुकें तव पहा; नीट करीं तीं उठे,
मुलें हांसती, बोटें दाविति, लाज जाय तव कुठें ?
चाल दुसरी—निद्रेमाजी ब्रह्मीं । तल्लिन होतो जीव ।
तुज सोडणें कां न । हा अमूल्य अनुभव ।
ऊठ, ऊठ बा, बोलूं किति मी, शिक्षक ते ऐकिती,
लाल लोचनें करुनी बघती, चित्तिं भरे भीती ॥ २ ॥

— ३ —

वर्गामध्यें असे चाललें हॅम्लेट-नाटक बरें
खून ! खून ! हे शब्द नीघती, भूतहि तें वावरे
अशा प्रसंगीं कसा निजशि तूं संवय तुला ही जडे
स्वप्न पडे कां याला ? हा कां हंसतो नी बडबडे ?

घोरुं नको तरि ! गुरुजी तुजला पिटितिल बाहेर
हजिरी झाली सुरू, उठ कीं, म्हण " मी सर, हजर "
चाल दुसरी—घणघण घंटा वाजे । उठे सखा माझा हा ।
लाल डोळे, जांभई येते । विळखे देइ देहा ।
पठणा करितां " भूपाळी "च्या ह्या भावें नच कवीं,
वर्गामाजी झोंप येतसे, सांगे " केशव " सुधी ।। ३ ।।

---

# कवीचा दरारा !

—रा. द. सूर्यवंशी

[ गायक-कवींना 'टाहो-कवी' म्हणून सांगलीच्या एका दीड शहाण्यानें उपहासिलें. गायक-कवीच्या दराऱ्याचें वर्णन करून, सदर उपहासकाला उत्तर देण्याचा येथें मीं अल्पसा प्रयत्न केला आहे. तो काव्य-गायकांच्या भक्तांना बराच बरा वाटेल, अशी कल्पना करून आपल्या ठिकाणीं स्वस्थ बसावयास कांहीं हरकत नाहीं, असें मला वाटतें.

खालीं वर्णिलेल्या परिस्थितींत सांपडलेल्यास याहून अधिक निर्दोष कविता लिहिता येणें शक्यच नाहीं—अशी माझी आपली समजूत आहे. ]

एके दिनीं जाहलें वर्तमान
कोंवळ्या सकाळीं कढे घोर ऊन
पहावें तिथें भोंवरे वादळीचे
पळूं लागले लोळ व्योमीं धुळीचे ।।
घरीं अर्भकांचा उठे कलकलाट
दुधावीण माता तयांच्या मुकाट
गुरूं गोठणीचें त्यजाया धजेना
मुखीं घांस घेणें मुळींही सुचेना ।।

अकालीं भयानें नुरे धीर ज्यांना
लपावें कुठें तें कळेना खगांना !
पिकाच्या रवें वाटला कीं वसंत,
आला अकालीं !—जगीं कैंवि खंत ?"
तल्लास करतां मिळे जाहिरात
"गावांत **टाहो-कवि** आज येत ! !" ॥

---

# उपहासिनी

रसाळ जरि संस्कृतामधिं खट्याळ ही प्राकृतीं.
अभीरु तव कल्पना, मधुर-रोषणा प्रकृती
विसंगतिस दे गती, उघाडि झांपडी नेत्रिंची
रुतो न उपहासिनी रसिक अंतरा, दे रुची

हंसेल तुजला कुणी हंस सुखें तयांलागुनी
प्रियं वद तयासवें, तुज वदे प्रियंवादिनी
म्हणेल तुज कोपुनी कुटिल वा अनार्या कुणी
तयास वद जा तुझीच भगिनी असे मी गुणी

# माझें प्रकाशन—

१ वळवांचे पाऊस ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
*२ पुनर्भेट भाग २ रा ( कथासंग्रह ) किंमत १ रुपया.
*३ पुनर्भेट भाग ३ रा ( कथासंग्रह ) किंमत १। रुपया.
४ कणसाचे दाणे ( कथासंग्रह ) किंमत १ रुपया.
*५ दुर्दैवी जोहरे ( ऐतिहासिक चरित्रें ) किंमत १ रुपया.
६ पैसाचा पैसा ( सचित्र नाटक ) किंमत १ रुपया.
७ जीवन-पथ ( कथासंग्रह ) किंमत १ रुपया.
८ आवडत्या गोष्टी ( ६१ लेखकांचा कथासंग्रह ) किंमत ३ रुपये.
*९ चित्तरंजन किं. १। रुपया.
१० फुलबाग ( कविता ) किंमत १ रुपया.
११ वायफळांचा मळा किंमत २॥ रुपये.
१२ वाहते वारे ( कथासंग्रह ) किंमत १२ आणे.
१३ गारांचा वर्षाव ( कथासंग्रह ) किंमत १। रुपया.
१४ सोनेरी नागीण ( कादंबरी ) किंमत १ रुपया.
१५ हायस्कुल विद्यार्थी ( कादंबरी ) किंमत ८ आणे.
१६ शि. म. परांजपे चरित्र व आठवणी किंमत १ रुपया.
१७ संराक ( विडंबनात्मक कवितांचा संग्रह ) किंमत १ रुपया.
१८ खेड्यांतील स्वाभावचित्रें ( ले. मो. गो. सोमण, बी. ए. ) किंमत १। रुपया.
१९ गुलाबाच्या पाकळ्या ( ले. द. र. कवठेकर ) किं. १। रुपया.
२० रेशमी चिमटे ( ले. वा. जोशी ) किंमत १। रुपया.

---

२१ बोलका सिनेमा ( ले. य. गो. जोशी ) किंमत ८ आणे.
२२ होमकुंड ( ले. य. गो. जोशी ) किंमत २ रुपये.

शिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें ऑर्डरप्रमाणें पाठविलीं जातील.

प्रकाशक—यशवंत गोपाळ जोशी, ७२३ सदाशिव, पुणें २.

---

*मुंबई इलाखा शाळाखात्यांत लायब्ऱ्यांकरितां व बक्षिसाकरितां मंजूर.

चरित्र-माला

विक्रीस तयार

# दुर्दैवी मोहरे

( ऐतिहासिक चरित्रें )

[ सर्जेराव घाडगा व त्रिंबकजी डेंगळा ]

लेखक—वि. गं. लेले

प्रस्तावनालेखक—इतिहाससंशोधक, द. वि. आपटे

किंमत १ रुपया

---

# शि.म. परांजपे चरित्र : व आठवणी

लेखक—ओगले-बर्वे. किंमत १ रुपया.

---

बिहारचे प्रख्यात बंडवाले

# कुँवरसिंह

यांचें चरित्र

लेखक—श्री. गणेश सीताराम जोशी, बी. ए.

शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

किंमत १२ आणे.

REFBK-0005494